नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५५ * अंक १७६ * | * नागपूर * | शुक्रवार, दिनांक २६ सप्टेंबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# ट्रम्प, माणूस की...

सध्याच्या जगात अमेरिकेसारख्या सभ्य देशामध्ये डोनाल्ड ट्रम्प नावाचा माणूस आहे. हा डोनाल्ड ट्रम्प नावाचा बिनडोक इसम कधी काय बडबड करील, हे हल्ली कळेनासेच झाले आहे. अशा अत्यंत फालतू वाचाळ माणसाला अमेरिकेच्या जनतेने अध्यक्ष पदावर कसे बसवले, हा आमच्या समोरचा मोठाच प्रश्न आहे. कारण आपण जे बोलतो त्याचा प्रभाव किंवा प्रतिक्रिया जगभरात उमटतात, हे या महाशयांना कदाचित माहीतच नसावे अमेरिकेतही ट्रम्पच्या वेड्या वाकड्या बोलांनी चांगलाच फरक पडत असतो. चीन सारख्या देशांनी झापले रे झापले की हा ट्रम्प, ट्रम्पच्या म्हणजेच एखाद्या हुकमी एक्क्यापासून चौकटच्या दुर्री सारखा होऊन पटकन शरणागती पत्करतो. तेव्हा जगात या माणसाचे हसे होते, त्याबद्दल आम्ही काय बोलणार नाही. रशिया आणि युक्रेन यांच्यातील लढाई आपण चुटकी सरशी मिटवून टाकू असा या अती आत्मविश्वास असलेल्या माणसाचा दावा होता. रशियाचे व्लादीमिर पूतीन यांना या ट्रम्पने ओळखलेलेच नव्हते. एकाच वेळी ट्रम्प तीन बरोबर एक पुतीन हे सूत्र या ट्रम्पाला अद्यापही समजलेच नाही. तिकडे युक्रेन एकटेपणाने अमेरिका आणि नाटो राष्ट्रांच्या भरवशावर रशिया सोबत लढाई लढत होते आणि पूतीनला प्रसन्न करण्यासाठी युक्रेनच्या राष्ट्रपतींना आपल्या व्हाईट हाऊस मध्ये बोलवून त्यांना टाईट करण्याचा या ट्रम्पने प्रयत्न केला तो अपमान झेलेन्सकी यांनी सहन न करता ताबडतोब अगदी बाणेदारपणे व्हाईट हाऊसला नमस्कार केला. रशियाचे अध्यक्ष आम्ही वर म्हटल्याप्रमाणे पुतीनचेही बाप निघाले. आता ट्रम्प म्हणतात की, लवकरात लवकर रशियाने काबीज केलेली जमीन युक्रेन परत मिळवू शकतो. अरे येडपटा कोणे एकेकाळी रशिया म्हणजे सोवियत संघ होता, युक्रेन सारखी पंधरा-सोळा राष्ट्रे सोवियत संघामधून बाहेर पडली तरी रशियाजवळ कितीतरी मोक्याची ठिकाणे आणि कितीतरी महत्त्वाच्या शक्ती अजूनही रशियाकडे असतीलच. अशा या रशियाला ट्रम्प कागदी वाघ म्हणतात. त्या पलीकडे जाऊन भारताची इकॉनोमी डेड आहे असेही ते म्हणतात, म्हणजेच भारताची इकॉनोमी मृत समजणाऱ्या या माणसाची बुद्धीच मेली आहे की काय असे वाटले तर नवल ते काय. जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश मृत अर्थव्यवस्थेमध्ये चालेल तरी का, हा प्रश्न एकदा या ट्रम्पने स्वतःलाच विचारून पहावा. रशिया भारत आणि चीनला क्रूड ऑइल विकतो. याचा अर्थ रशियाकडे भरपूर प्रमाणात क्रूड ऑइल आहे. हे क्रूड ऑइल विकत घेऊन भारत युद्धाच्या आगीत तेल टाकत आहे, म्हणजेच रशियाला मदत करीत आहे असे हे महाशय म्हणतात. अरे बेट्या ट्रंप्या, रशिया आणि अमेरिका यांच्यातही व्यापार सुरू आहे. रशिया चीनला भारतापेक्षा जास्त क्रूड ऑइल पुरवतो याचाच अर्थ अमेरिका आणि चीन हे सुद्धा रशियाला मदत करतात, असाच होतो ना रे.? हाच डोनाल्ड एखाद्या पागल तुघलका प्रमाणे आधी पंचवीस टक्के नंतर 50 टक्के टेरिफ लावतो. मात्र चीनने जशास तसे उत्तर दिल्याबरोबर या ट्रम्पचा पारा शून्यावर येतो. मात्र आपण ट्रम्पची दादागिरी का सहन करतोय आणि आपल्याकडे कमीपणा घेऊन कापसासारख्या शेतमालाचा आयात कर का कमी करतोय याचे कोडे कोण सोडवणार, हा एक प्रश्न आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या माणसाला दिवस-रात्र भारत पाकिस्तान युद्ध मीच थांबवले असे झोपेत, स्वप्नात आणि जागेपणीही बरळण्याची सवय असावी. या ट्रम्पाला कदाचित शिमला करार ठाऊक नसावा. भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रांमध्ये केवळ द्विपक्षीय चर्चा होते. ट्रम्प सारख्या उपटसुंभाची आमच्या देशाच्या सुरक्षिततेसाठी चर्चा करण्यासाठी अजिबात गरज नाही. व्हाईट हाऊस मध्ये बसून फक्त इज्रायललाच यापुढे आवरण्याची गरज आहे. कारण या इज्रायलने माणुसकी सोडलेली दिसते आहे. पण अमेरिकेतल्या ज्यूंचे 'जू' या ट्रंपच्या डोक्यावर बसलेले आहे म्हणून बहुधा ट्रम्पची टर्रकन फाटली असावी. खरे तर यापुढे असल्या उथळ माणसाच्या कुठल्याच विधानाची दखल घेऊ नये असा हा माणूस आहे. एखाद्या माणसामुळे पदाची शोभा वाढते आणि ट्रम्प सारखा माणूस पदाची 'शोभा' करतो. यातच सर्व काही सर्वांनी समजून घ्यावे. हा ट्रम्प माणूस आहे की... आणखी नेमके काय आहे ते आम्हाला ठाऊक नाही. त्यामुळेच या ट्रम्प नावाच्या माणसाच्या मूर्खपणाला आमचा ढोपरापासून नमस्कार आहे. ट्रम्पसाहब आगे बढो और अपने पैर खुद खिंचो; नही तो आँखें भिंचो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# नेते शेतकऱ्यांच्या बांधावर!



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :
मराठवाड्यासह महाराष्ट्राच्या अनेक भागांत मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे हाहाःकार माजवला आहे. अनेक ठिकाणी नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून, पूरस्थिती गंभीर बनली आहे.

या पुराने शेतजमिनी वाहून गेल्याने शेतकरी पूर्णपणे उद्धवस्त झाले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बीड जिल्ह्यातील नुकसानीचा आढावा घेतला. तर ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मराठवाड्यातील पूरग्रस्त भागातील परिस्थितीची पाहणी केली.

बीडच्या शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा आणि येवलवाडी परिसरात रस्त्यात खचलेले पूल, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे झालेले अतोनात नुकसान आणि वाहून गेलेल्या पुलाची अजित पवार यांनी आज पाहणी केली. यावेळी शेतकरी बांधवांच्या वेदनादायी भावना जाणून घेतल्या.

त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपले सरकार सातत्याने काम करत आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या बरोबरीने मजबुतीने उभे आहे. जे जे नुकसान झाले आहे, त्याचे तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिल्याचे ते म्हणाले.

### शिक्षक १ दिवसाचा पगार पुरग्रस्तांसाठी देणार

राज्यात झालेल्या जोरदार पावसामुळे आणि पूर परिस्थितीमुळे शेतकरी पूर्णतः कोलमडला आहे. शेतातील पिकांचे नुकसान झालेला आहे, हतबल झालेल्या शेतकऱ्यांसाठी राज्यातील सर्व शिक्षक पुढे सरसावले आहेत. सर्व शिक्षकांच्या वतीने एका दिवसाचे वेतन या पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिले जाणार आहे

मराठवाड्यातील या अस्मानी संकटात अपद्ग्रस्त झालेल्या नागरिकांसाठी मदतीचा हात म्हणून लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे महाराष्ट्र राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधे ५० लाख रुपये आर्थिक निधी देण्याचे घोषित केले आहे. गणेश मंडळाकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ५० लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला जाणार आहे.

### आम्ही गोट्या खेळायला आलोय का? दादा संतापले



गावकऱ्यांशी संवाद साधताना अजित पवार यांनी सरकार तातडीने मदत करणार असल्याचे आश्वासन दिले. मात्र, एका शेतकऱ्याने कर्जमाफीचा विषय काढताच अजित पवार चांगलेच संतापले.

त्यावर, आम्हाला कळतं ना, आम्ही काय इथे गोट्या खेळायला आलोय? असा सवाल करत अजित पवारांनी शेतकऱ्यांनाच उलट प्रश्न विचारला. दिवस भर दौऱ्यावर आहे. जो काम करतो ना त्याच्यावरच हल्ला होतो, असं ते चिडून म्हणाले. उपस्थित ग्रामस्थ यावर हसू लागले. त्यावर अजित पवारांनी पुन्हा सर्वांकडे पाहत म्हणाले, बघा ना आता, किती जीव तोडून सांगतोय. मला अजूनही दुसरीकडे जायचं आहे. आम्हालाही कळतंय की काय करायचं.

बीड जिल्ह्यात त्यांनी महिलांशी संवाद साधला. संकट मोठं असलं तरी सरकार शेतकरी आणि पूरग्रस्तांसोबत ठामपणे उभं आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अजित पवार यांनी गुरुवारी बीड जिल्ह्यातील नुकसानीची पाहणी करीत तातडीच्या मदतीची घोषणा केली. ज्यांच्या घरात पावसाने जास्त नुकसान झाले आहे. त्यांना आजपासूनच तातडीची मदत दिली जाईल. तात्काळ पाच हजार रुपये रोख आणि काही धान्य देण्याचे शासनाने ठरवले आहे.

## सौर ऊर्जा प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती : नरेंद्र मोदी

### राज्यातील ४५४ सौर ऊर्जा प्रकल्पांचे लोकार्पण



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :
सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे शेतीला दिवसा वीज उपलब्ध होत आहे ज्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न दुप्पट होत आहे. मात्र शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीवर भर देऊन कमी खर्चात जास्त उत्पन्न देणाऱ्या पीक पद्धतीचा वापर करावा. शेतीचे आरोग्य संवर्धन उपाय होणे ही काळाची गरज आहे. या सौर ऊर्जा प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले. दूरदृश्य प्रणाली द्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यातील २,४५८ मेगावॅट क्षमतेच्या ४५४ सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते.

राजस्थान बांसवाडा येथे ऊर्जा तसेच विविध विकास योजनांचा लोकार्पण कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपण बांद्रा पूर्व प्रकाशगड येथून करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी, राज्यातील पी एम कुसुम सी - मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आणि पी एम कुसुम सी बी - मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचे लाभार्थी शेतकरी उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यातील सौर ऊर्जा प्रकल्पातील विविध लाभार्थ्यांशी संवाद साधला. मोदी म्हणाले की, सौर ऊर्जा प्रकल्पाचे खूप फायदे आहेत. शेतकऱ्यांना शेतीला दिवसा वीज उपलब्ध होते आहे, बारमाही पाण्याची व्यवस्था झाली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे. आता शेतकऱ्यांनी केमिकलमुक्त शेती करण्यावर भर द्यावा.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी मोदी यांना सौर ऊर्जा प्रकल्पातील विविध लाभार्थी शेतकऱ्यांचा परिचय करून दिला.

## सरकारचे मौन मानवतेच्या विरोधात..



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि.२५ :
काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी गुरुवारी इस्त्रायल-पॅलेस्टाईन युद्धाबाबत मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली आणि म्हटले की, पॅलेस्टाईन प्रश्न सोडवण्यासाठी भारताने पुढाकार घ्यावा.

त्या म्हणाल्या की, इस्त्रायल-पॅलेस्टाईन संघर्षावर भारताची भूमिका अत्यंत निराशाजनक आहे. सरकारचे बधिर करणारे मौन हे मानवता आणि नैतिकतेचा विश्वासघात आहे. हे भारताच्या दीर्घकालीन परराष्ट्र धोरणापासून दूर जाण्याचे संकेत आहेत.

## शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पंचांग पाहणार का?

### उद्धव ठाकरेंचा सवाल



■ वृत्तसंस्था, धाराशिव, दि.२५ :
उद्धव ठाकरे यांनी आज मराठवाड्यातील नुकसानग्रस्त भागात पाहणी दौरा केला. धाराशिव जिल्ह्यातील इटकूर येथे त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

या सरकारला तुमच्या अन्याय करू देणार नाही, हे सांगायला मी येथे आलो आहे, असे ते म्हणाले. माध्यमांशी बोलताना त्यांनी सरकारवर निशाणा साधला. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी योग्य वेळ कधी येणार? त्यासाठी आता पंचांग पाहणार आहात का? असा उपरोधिक सवाल त्यांनी सरकारला केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आता मराठवाड्याचा दौरा केला पाहिजे. ते जे काही उत्सव साजरा करत आहेत, त्याऐवजी इकडे कसा आक्रोश चालला तो बघा. मोदींनी मराठवाड्यात यावे, शेतकऱ्यांचे अश्रू पुसावे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरे म्हणाले, मराठवाड्यात कित्येक वर्षांनंतर असे संकट कोसळले असेल. आपत्ती मोठी आहेच, सरकारला शेतकऱ्यांवर अन्याय करू देणार नाही, हे सांगायला आलेलो आहे. शेतकऱ्याचा सातबारा कोरा करा, त्याला कर्जमुक्त करा, हेक्टरी सरसकट ५० हजार रुपयांची मदत द्या, पीकविम्याची रक्कम सरकारने तत्काळ द्यावी, अशीही मागणी ठाकरेंनी केली. शेतकऱ्यांनी आत्महत्या करून नये असे आवाहन त्यांनी केले.




## वरोरा परिसरात सौम्य भूकंपाची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :
जिल्ह्यातील वरोरा तालुका परिसरात सौम्य भुकंपाचे झटके बसले. वरोरा जवळ भूकंपाचे केंद्रबिंदू असल्याबाबत व ३.२ रिश्टरचे भूकंप नोंद झाल्याची माहिती भूकंप ॲपद्वारे प्राप्त झाली. त्याच वेळी वरोरा परिसरातील नागरिक विशेषतः मार्डा, एकोना गावातील नागरिक , पोलीस पाटील, तलाठी यांच्यामार्फत खात्री केली असता कोणत्याही प्रकारचे भूकंपाचे धक्के जाणवले नसल्याचे सांगण्यात आले.

तसेच सदर परिसरात वेकोली खदान व्यवस्थापनाकडून देखील भुकंपाबाबत प्रशासनाने खात्री केलेली आहे. सदर नोंद झालेल्या भूकंपाच्या घटनेत सध्या तरी कोणतेही नुकसान नाही झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण कडून प्राप्त झाली आहे.

शेकडो वर्षांपासून वरोरा तालुक्यात भूकंप आले नव्हते, येथे जमिनीत कोळसा, स्तरीत खडक आढळतात. अलीकडे कोळसा खाणी मुळे आणि नदीचे पाणी ,खाणीच्या खोल भागात खूप खोल शिरल्यामुळे हा भूकंप झाला आहे. ३ ते ४ किमी खाली पाण्याच्या प्रवाहाने भूपट्टा सरकल्याने हा भूकंप झाला आहे. वेकोली खाणी ह्याच कारणी भूत आहेत. पुढे भूकंप येवू शकतात.
प्रा. सुरेश चोपणे



वाढदिवसाच्या मंगल कामना

सामाजिक आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे व्यक्तीमत्व भानुदास पोपटे (गुरुजी) नेरी त.चिमुर यांना जन्मदिनाच्या मंगल कामना

शुभेच्छुक - सुरेश डांगे, विवेक बक्षी, हरी ओम मेश्राम, अजिंक्य पोपटे, डॉ. सदानंद घोनमोडे, सोनल पोपटे, संजय नागदेवते, सुभाष रणदिवे, डॉ. टि. डी. वाळके

### आरक्षण संपण्याच्या भीतीने तरुणाची आत्महत्या



■ वृत्तसंस्था, परभणी, दि.२५ :
ओबीसी आरक्षण संपणार असल्याच्या अफवेमुळे तणावग्रस्त २२ वर्षीय कुमार नारायण आघाव या तरुणाने गळफास घेऊन आपले जीवन संपवले. कुमार आघावने शेतात जाऊन लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करताना त्याच्या खिशात एक चिठ्ठी सापडली. ओबीसी आरक्षण गेले असे मी ऐकत आलोय. आमच्या तरुण बांधवांचे मोठे नुकसान झाले आहे, म्हणून मी माझे जीवन संपवतो, असे या चिठ्ठीत त्याने नमूद केले आहे.

**धाराशिवमध्ये शेतकऱ्याची आत्महत्या**

अतिवृष्टीमुळे पिके आणि शेतजमीन पूर्णपणे उद्धवस्त झाल्याने धाराशिव जिल्ह्यातील म्हात्रेवाडी येथील लक्ष्मण बाबासाहेब पवार (वय ४२) या शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.

## भाजपाचे निवडणूक प्रभारी नियुक्त

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि.२५ :
भाजपने गुरुवारी बिहार, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमधील विधानसभा निवडणुकीसाठी प्रभारी आणि सह-प्रभारी नियुक्त केले. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना बिहारचे निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, तर उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सीआर पाटील यांना सह-प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांना पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, तर त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री बिप्लब कुमार देब यांना सह-प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तामिळनाडूमध्ये भाजप खासदार बैजयंत पांडा यांना प्रभारी म्हणून आणि मुरलीधर मोहोळ यांना सह-प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

## बांधावर फोटो काढण्याचे नाटक बंद करा : हर्षवर्धन सपकाळ



मुंबई : राज्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या अभूतपूर्व नुकसानीवरून काँग्रेसने राज्य सरकारला घेरले आहे. 'या संकटातही सरकारने मदतीला उशीर केला आहे,' अशी टीका करत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. ही राजकारण करण्याची वेळ नसून, सरकारने तातडीने ओला दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये, तर खरडून गेलेल्या जमिनीसाठी ५ लाखांची विशेष मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. 'बांधावर फोटो काढण्याचे नाटक बंद करून, राज्यातील ट्रिपल इंजिन सरकारने दिल्लीतून विशेष पॅकेज आणावे, शक्तिपीठ महामार्ग थांबवून शेतकऱ्यांना मदत द्या,' अशी मागणी सपकाळ यांनी केली आहे. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, आभाळ फाटले असे चित्र. सरकारने मदत द्यायला उशीर केला आहे. हा राजकारण आणि आरोपांचा प्रसंग नाही. अवकाळी उन्हाळ्यापासून सुरू झाला आहे. शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजारांची मदत द्यावी.

## कर्जमाफी, नवे कर्ज, घर-शेती नुकसान भरपाई द्या : सुप्रिया सुळे



मुंबई : पूरग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पैशाची मागणी करावी. कारण शेतकऱ्यांच्या मदतीसाठी तीन टप्प्यात काम करावे लागणार आहे. सध्या तात्काळ मदत म्हणून शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांना पुन्हा कर्ज उपलब्ध करून देणे आणि शेतकऱ्यांच्या घरांचे आणि शेतीचे नुकसान भरून काढणे, अशा तीन टप्प्यात सरकारला काम करावे लागणार असल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. राज्य सरकारच्या वतीने 2000 कोटी रुपये दिले असल्याची माहिती दिली जात आहे. मात्र दोन हजार कोटी रुपयांनी काहीही होणार नाही. एकट्या शक्तीपीठ महामार्गावर ८० हजार कोटी रुपये खर्च केले जात आहेत. मग शेतकऱ्यांना पैसे देताना राज्य सरकारची आर्थिक स्थिती खराब आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. वास्तविक राज्य सरकारचे आर्थिक नियोजन गडबडले असल्याचे मागील एक ते दीड वर्षापासून मी सांगत आहे.

## अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी 'ओला दुष्काळ' जाहीर करा



### राज ठाकरे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

मुंबई : महाराष्ट्रात अतिवृष्टीने हाहाकार माजवला आहे. अनेकांचे घर उद्ध्वस्त झाले आहेत. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची पाहणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज सोलापूरसह धाराशिव व लातूरच्या दौऱ्यावर होते. तसेच त्यांनी शेतकऱ्यांना नुकसानभरपाईसाठी निर्देश जारी केले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवले आहे. पत्रात राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रात अतिवृष्टीने जो धुमाकूळ घातला आहे, त्याबद्दल तुम्ही पूर्णपणे अवगत असालच. महाराष्ट्राचा असा कुठलाही भाग शिल्लक राहिलेला नसेल जिथे अतिवृष्टीने नुकसान केलं नसेल. आमच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी बोलल्यावर, लक्षात आलं आहे की, कित्येक ठिकाणी जमीन पूर्णपणे खरवडून वाहून गेलेली आहे. मे महिन्याच्या मध्यात जो पाऊस सुरु झाला आहे, त्याने जवळजवळ उघडीप घेतलीच नाहीये त्यामुळे, शेतीचं अतोनात नुकसान झालं आहे.

# सायबर सुरक्षा नियंत्रण प्रणालीत महाराष्ट्राचा पुढाकार : ॲड.आशिष शेलार

## रिंग द बेल फॉर सिक्युरिटी मोहिमेचा शुभारंभ



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

डिजिटल इंडिया आणि डिजिटल व्यवहारांमुळे महाराष्ट्र हे जगातील डिजिटल प्रगतीशील राष्ट्रासाठी आदर्श ठरत आहे. सायबर सुरक्षा नियंत्रण प्रणालीमध्ये महाराष्ट्राने आघाडी घेतली असल्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले.

डिजिटल सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यासाठी व सर्वांसाठी सुरक्षित सायबर व्यवहार निर्माण करण्यासाठी डेटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडियामार्फत आयोजित 'रिंग द बेल फॉर सिक्युरिटी या मोहिमेचे उद्घाटन सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते बॉम्बे स्टॉक एक्सचेंज येथे आज करण्यात आले.

यावेळी मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, २०१६ मध्ये सुरू केलेल्या महाराष्ट्र सायबर विभागाच्या प्रयत्नांबरोबरच राज्याने गोल्डन डेटा प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पात १२ कोटी प्रमाणित नागरिकांची माहिती नोंदवली असून, नागरिकांना प्रत्येक व्यवहारासाठी वेगवेगळे पासवर्ड किंवा प्रमाणपत्रांची गरज भासणार नाही. हा प्रकल्प सायबर सुरक्षेसाठी एक मोठे बळ ठरणार आहे.

सायबर सुरक्षा ही केवळ शहरी भागापुरती मर्यादित नसून ग्रामीण व निम्न-शहरी भागातील नागरिकांनाही याची जाणीव करून देणे आवश्यक आहे. औद्योगिक क्षेत्र, शैक्षणिक संस्था व शासनाने मिळून यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यामुळे डिजिटल रेजिलियन्स सिस्टीम उभारण्याची ही योग्य वेळ आहे. उद्योग क्षेत्राने गुंतवणूक करावी, शैक्षणिक संस्थांनी अभ्यासक्रम तयार करावेत आणि शासनाने सक्षम व्यवस्था उभारावी, तसेच नागरिकांनी स्वतः जागरूक होणे आवश्यक असल्याचे मत मंत्री ॲड. शेलार यांनी व्यक्त केले.

आजच्या काळात सीमारेषांवरील सुरक्षा जितकी महत्त्वाची आहे, तितकीच डिजिटल व्यवहार, ई-गव्हर्नन्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता युगातील सायबर सुरक्षा महत्त्वाची ठरली आहे. भारतात ७० कोटींहून अधिक इंटरनेट वापरकर्ते असून १२० कोटी मोबाईलधारक आहेत. गेल्या पाच वर्षात सायबर गुन्ह्यांमध्ये तब्बल ४०० टक्के वाढ झाली आहे, ही गंभीर बाब आहे. आपल्या देशात दर मिनिटाला सरासरी ७०२ सायबर धोक्यांची नोंद होत असून, प्रत्येक सेकंदाला १२ नवीन सायबर हल्ल्यांचा धोका समोर येतो. नागरिकांच्या संरक्षणासाठी सक्षम व टिकाऊ सायबर सुरक्षा व्यवस्था उभारणे ही काळाची गरज असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.

# नंदुरबारमध्ये दगडफेक

### १२७ समाजकंटक ताब्यात, २५ पोलीस जखमी

■ महासागर प्रतिनिधी, नंदुरबार, दि. २५ :

शहरात बुधवारी आदिवासी बांधवांनी काढलेल्या मूक मोर्चादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयासह परिसरातील शासकीय कार्यालयांच्या आवारात झालेल्या तोडफोड प्रकरणी आतापर्यंत १४० पेक्षा अधिक जणांना ताब्यात घेण्यात आले. यातील १३ जणांचा सहभाग आढळून न आल्याने त्यांना सोडून देण्यात आले.

दगडफेक आणि हल्ल्यात २५ पेक्षा अधिक पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि सात इतर नागरिक जखमी झाले. नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे नंदुरबारमध्ये ठाण मांडून असून नाशिक, जळगाव, धुळेसह अन्य ठिकाणाहून वरिष्ठ अधिकाऱ्यांसह जादा पोलीस कुमक मागविण्यात आली आहे. जय वळवी या तरुणाच्या हत्येच्या निषेधार्थ बुधवारी मूक मोर्चा काढण्यात आला. मोर्चा आटोपल्यानंतर काही समाजकंटकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात तोडफोड आणि दगडफेक केली होती.

पोलिसांनी अश्रुधुराच्या कांड्या फोडत जमावाला पांगवले. मोर्चेकऱ्यांची संख्या १५ हजारपेक्षा अधिक होती. आणि अवघा ४०० ते ५०० पोलिसांचा बंदोबस्त होता. त्यामुळे समाजकंटकांनी केलेल्या दगडफेकीत सर्वाधिक मारही पोलिसांनाच खावा लागला.

दगडफेक आणि हल्ल्यात २५ पेक्षा अधिक पोलीस अधिकारी, कर्मचारी जखमी झाले. तोडफोड आणि दगडफेक करणाऱ्यांची ड्रोन आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे तपासणी करुन संशयितांना अटक करण्याची प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे. या घटनेबाबत समाज माध्यमातून लोकांना भडकविणाऱ्यांविरुध्दही गुन्हे दाखल केले जात आहेत. नागरिकांनी शांती राखण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

आतापर्यंत पोलिसांनी तोडफोड प्रकरणी १४० पेक्षा अधिक जणांना ताब्यात घेतले. यातील १३ जण अल्पवयीन आणि शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी असल्याने त्यांचा या घटनेशी संबंध न निघाल्याने त्यांना पोलिसांनी सोडून दिले.

# तरुणांच्या सक्रिय सहभागातून युवा धोरण साकारणार : ॲड. माणिकराव कोकाटे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

राज्यभरातील तरुण- तरुणींच्या सक्रिय सहभागातून राज्य शासनाचे सर्वसमावेशक युवा धोरण साकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सर्वसमावेशक युवा धोरण निर्मितीसाठी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कौशल्य विकास आदी पैलूंचा सर्वस्पर्शी विचार करून युवकांकडून सूचना मागविण्यात याव्यात, असे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिले.

राज्याचे सुधारित युवा धोरण तयार करण्यासाठी शासनाने गठित केलेल्या समितीची आढावा बैठक मंत्रालयात झाली. युवकांनी शिक्षण, रोजगार किंवा सामाजिक व बौद्धिक उपक्रमांमध्ये सक्रिय राहावे यासाठी युवा धोरणात विशेष तरतूद करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीस विभागाचे अपर मुख्य सचिव



अनिल डिग्गीकर, आयुक्त शीतल तेली-उगले, पद्मश्री कांती शहा, आमदार सत्यजीत तांबे, प्रविण दटके, आशुतोष काळे, डॉ. बाबासाहेब देशमुख, राजेश पवार, संतोष दानवे, अमित गोरखे, अभिजीत पाटील, रोहित पाटील, मॉर्डन महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे तसेच विविध राष्ट्रीय व राज्य युवा पुरस्कार विजेते आणि विविध युवा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे म्हणाले की, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत हे धोरण पोहोचणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील तरुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी विशेष उपक्रमांचा समावेश करावा. महिला व बालविकास विभाग, सांस्कृतिक कार्य, कौशल्य विकास विभाग आदी विभागांच्या समन्वयातून युवकांसाठी नाविन्यपूर्ण योजना राबविण्यावर भर देण्यात यावा.

राज्यातील सर्व तरुणांना धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी स्पर्धात्मक उपक्रम राबविण्यात यावेत. युवकांचे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य, मानसिक कल्याण, व्यसनाधीनता निर्मूलन, शिक्षण, रोजगार, उपजीविका, कृत्रिम बुद्धिमत्ता (अक), सायबर गुन्हेगारी प्रतिबंध, डिजिटल तंत्रज्ञान आदी महत्त्वाच्या बाबी युवा धोरणाचा भाग असाव्यात, असे निर्देशही ॲड. कोकाटे यांनी यावेळी दिले.

# गणेशोत्सव आता होणार जागतिक दर्जाचा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

मुंबईच्या रवींद्र नाट्यमंदिरात आजचा माहोल वेगळाच होता. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाला नवसंजीवनी देणारी घोषणा होताच उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. गणेशोत्सव हा फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकणार आहे.

सांस्कृतिक कार्य व माहिती-तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले की, गणेशोत्सव हा सामाजिक सौहार्द, लोककला आणि राष्ट्रीय एकात्मतेचा दूत आहे. आता या उत्सवाची व्यापकता वाढवण्यासाठी देशातील विविध राज्यांतच नव्हे तर विदेशातही कार्यक्रम राबवले जाणार आहेत. शासनाचा मानस स्पष्ट आहे. या कार्यक्रमात कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनीही गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्याने तो अधिक व्यापक होईल, असे सांगत प्रधानमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्या प्रयत्नांमुळे ऐतिहासिक १२ गडकिल्ल्यांना युनेस्को वारसा मानांकन मिळाल्याचे विशेषत्वाने अधोरेखित केले. राज्यात पहिला क्रमांक सांगलीतील विटा येथील तिरंगा गणेशोत्सव मंडळाने पटकावला. द्वितीय पारितोषिक लातूरच्या वसुंधरा वृक्षारोपी गणेशोत्सव मंडळाला मिळाले, तर तृतीय क्रमांक अहिल्यानगरच्या पाथर्डी येथील सुवर्णयोग तरुण मंडळाने मिळवला.

# केवळ पर्यटनाला जाऊ नका, शेतकऱ्यांना काही मदत करा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

शेतकऱ्यांना संकटाच्या काळात मोठी मदत देणे अपेक्षित आहे. ज्यांना मदत द्यायची असेल त्यांनी मदत घेऊन नक्की शेतकऱ्यांच्या बांधावर जावे. मात्र, केवळ पर्यटनासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊ नये, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या मराठवाडा दौऱ्यावर टीका केली आहे. सध्या संकटाची वेळ आहे. अशावेळी ज्याला जेवढी शक्य आहे, त्याने तेवढी मदत देणे अपेक्षित आहे. मात्र विरोधक केवळ मदत देणाऱ्यांवर टीका करण्याचे काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पूरग्रस्त भागातील काही जिल्ह्यांचा दौरा करत पूरग्रस्त भागाची पाहणी केली होती. त्यानंतर आज उद्धव ठाकरे हे देखील पूरग्रस्त मराठवाड्यात पाहणी दौऱ्यासाठी येत आहेत. मात्र उद्धव ठाकरे यांच्या दौऱ्यापूर्वीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या दौऱ्यावर टीका केली आहे.

### एकनाथ शिंदे यांची उद्धव ठाकरेंच्या दौऱ्यावर टीका

काही लोक केवळ पर्यटनासाठी दौरा करत असल्याची टीका त्यांनी केली. आम्ही शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी ज्या वस्तू देत आहोत, त्या बघा. त्यावरील फोटो कशासाठी बघता? असा प्रतिप्रश्न त्यांनी उपस्थित केला. कार्यकर्त्यांनी फोटो लावले असतील, पण ते पाहण्याऐवजी मदतीसाठी दिलेले साहित्य पहा. सध्या संकटातील शेतकऱ्यांना मदत देणे हे जास्त महत्त्वाचे आहे. कोणी कोणत्या पद्धतीने मदत दिली, यापेक्षा शेतकऱ्यांना मदत मिळणे हे जास्त महत्त्वाचे असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.



## गोदाकाठच्या गावांमध्ये पूरस्थिती कायम

■ महासागर प्रतिनिधी, परभणी, दि. २५ :

गोदावरी नदीच्या पाणी पातळीत कमालीची वाढ झाल्यानंतर आज गोदाकाठच्या गावांमध्ये पूरस्थिती उद्भवली. विशेषतः गंगाखेड शहर व परिसरात पाण्याचा वेढा पडला असून हजारो हेक्टर जमिनी पाण्याखाली गेल्या आहेत. पाथरी, मानवत, सोनपेठ तालुक्यांमध्ये गोदाकाठच्या अनेक गावांमध्ये पाणी शिरले होते. मदत व बचाव कार्यासाठी पथके तैनात करण्यात आली होती. बुधवारी सकाळी गोदावरीच्या पाणीपातळीत वाढ झाली आज पाणी उतरायला सुरुवात झाली असली तरी पूरस्थिती कायम आहे. गोदावरी नदीवरील धारखेड येथे पुलावरून पाणी आले त्यानंतर या पुलावरची वाहतूक बंद करण्यात आली. या ठिकाणी पोलीस बंदोबस्तही लावण्यात आला. गोदावरी नदीच्या बॅक वॉटरमुळे गावात पाणी घुसल्याने धारासुर येथील काही नागरिकांना तुळशीराम पाटील विद्यालयात हलवले आहे. धारासुर येथील ६० कुटुंबातल्या २०० व्यक्तींना स्थलांतरित करण्यात आले.

# डॉ. आंबेडकर सामाजिक संशोधन केंद्राचे उद्घाटन

## संविधानामुळेच भारत एकसंध : शरद पवार



■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २५ :

पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात माजी आमदार ॲड. जयदेव गायकवाड यांच्या पुढाकारातून स्थापित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल रिसर्च सेंटरचे उद्घाटन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. सत्यशोधक समाज स्थापना दिनाचे औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

शरद पवार यांनी या वेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले. पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, बांगलादेश या शेजारी देशांमध्ये अस्थिरता असताना भारत मात्र प्रगतीच्या मार्गावर आहे. त्यासाठी डॉ. आंबेडकरांनी दिलेले संविधान आणि लोकशाही मूल्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. बाबा आढाव म्हणाले, "भारतीय संविधान हा आपल्या देशाचा पाया आहे आणि संसदीय लोकशाही टिकवण्यासाठी नागरिकांनी संविधानाचे तत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. आपण फक्त नियमांचे पालन करणारे नागरिक नसून, त्याचे मूल्य जाणणारे, जबाबदार नागरिक असणे महत्त्वाचे आहे. वर्तमान काळात वाढत असलेल्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक आव्हानांचा सामना करण्यासाठी लोकशाहीला केवळ कायद्याचे पालन पुरेसे नाही; त्यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रियपणे विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची आणि चुकीच्या गोष्टींविरोधात आवाज उठवण्याची भूमिका पार पाडणे गरजेचे आहे. कृतिशील कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. प्रास्ताविकात ॲड.जयदेव गायकवाड यांनी सांगितले की, संविधानाची नैतिकता अधोरेखित करण्याचा आमच्या सामाजिक अभ्यास केंद्राचा प्रयत्न राहणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघ (युनो) आणि बाबासाहेबांनी उच्च शिक्षण घेतले ते कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थांशी समन्वय साधून अभ्यास प्रकल्पासंदर्भात चर्चा, संवाद करणे,यावर भर दिला जाणार आहे.

# राज्यामध्ये गुंतवणूक व रोजगारवाढीस चालना : जयकुमार रावल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्पाच्या (मॅग्नेट) राज्यातील प्रगतीबाबत आशियाई विकास बँकेच्या (एडीबी) वरिष्ठ अधिकाऱ्यांना आश्वस्त करताना या प्रकल्पाच्या अंमलबजावणीद्वारे राज्यात गुंतवणूक आणि रोजगारवाढीस चालना मिळाली असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात झालेल्या बैठकीत मॅग्नेट प्रकल्पाच्या कामकाजासंदर्भात आढावा घेण्यात आला. यावेळी सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे यांच्यासह आशियाई विकास बँकेच्या संचालक (भारत) श्रीमती मिओ ओका, ताकेशी उडेओ, क्रिशन रौटेला दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

आशियाई विकास बँक आणि पणन विभागामार्फत अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

राज्यातील प्रमुख १४ फळपिके आणि सर्व प्रकारची फुले अशा एकूण १५ फलोत्पादन पिकांसाठी उत्पादन ते ग्राहकांपर्यंत वितरण अशा एकात्मिक मूल्य साखळीचा विकास मॅग्नेट प्रकल्पामार्फत करण्यात येत आहे. यामध्ये शेतकरी उत्पादक संस्था, निर्यातदार, प्रक्रियादार, संघटीत किरकोळ विक्रेते, कृषी व्यवसाय करणारे लघु व मध्यम उद्योजक, वित्तीय संस्था, स्वयंसहाय्यता समूह यांचा सहभाग आहे.



# २९ सप्टेंबरपर्यंत राज्यात पावसाचा जोर कायम राहणार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, 25 सप्टेंबरपासून 29 सप्टेंबरपर्यंत राज्यात पावसाचा जोर कायम राहणार आहे. विशेषतः 27 सप्टेंबर रोजी मराठवाडा आणि विदर्भात अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पावसाची तीव्रता आणखी वाढण्याचा अंदाज आहे.

याशिवाय कोकण, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातही पावसाची संततधार सुरू राहील, असा इशारा देण्यात आला आहे. पुढील काही दिवस राज्यात मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यांचा सामना करावा लागू शकतो. यामुळे प्रशासनाने सर्व जिल्ह्यांना सतर्कतेचे आदेश दिले असून नागरिकांनी बाहेर जाणे टाळावे, असा सल्ला देण्यात आला आहे.



महाराष्ट्रावर पुन्हा एकदा पावसाचा कहर दिसून येत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत, तर अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. खरीप हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात आलेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फिरले आहे.

जालना, बीड, लातूर, धाराशिव, परभणी यांसह मराठवाड्याच्या बहुतांश भागात उभी पिकं पाण्याखाली गेली आहेत. विदर्भातील कापूस आणि सोयाबीन पिकांचं प्रचंड नुकसान झालं आहे.

नागरिकांना पुरामुळे सुरक्षित स्थळी हलवण्याची वेळ आली असून शाळा, मंदिरे आणि ग्रामपंचायत कार्यालयं तात्पुरत्या निवाऱ्यांमध्ये बदलण्यात आली आहेत. या अनिश्चित पावसामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत आणि त्यांचा हंगाम वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

पावसामुळे फक्त शेतकऱ्यांचंच नव्हे तर मच्छिमार बांधवांचंही मोठं नुकसान होण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवस समुद्र खवळलेला राहणार असल्याने मच्छिमारांनी समुद्रात न जाण्याचे आवाहन हवामान खात्याकडून करण्यात आले आहे. यामुळे किनारपट्टीवरील कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मच्छिमारांना आर्थिक फटका बसणार आहे. आधीच पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालेले असताना समुद्रात जाऊ न शकल्यामुळे मच्छिमार कुटुंबांचे दैनंदिन जीवन उध्वस्त होणार आहे. शेतकरी आणि मच्छिमार या दोघांवरही संकटाचे सावट दाटले असून सरकारकडून तातडीची मदत मिळावी, अशी मागणी सर्वत्र होत आहे.

# पोलीस कर्मचाऱ्याचा संशयास्पद मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

पोलिस हवालदार प्रवीण सूर्यवंशी (५२) यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी पत्नी स्मिता सूर्यवंशी (४२) आणि मुलगा प्रतीक सूर्यवंशी (२२) यांना वडाळा ट्रक टर्मिनल पोलिसांनी अटक केली. सूर्यवंशी यांच्या मृत्यूमागे घातपात असल्याचा आरोप आणि शवविच्छेदन अहवालानंतर पोलिसांनी तपास करून ४ महिन्यानंतर ही कारवाई केली.

पोलीस कर्मचारी प्रवीण सूर्यवंशी (५२) शिवाजी नगर पोलीस ठाण्यात कार्यरत होते. ते प्रतीक्षा नगर येथील पोलीस वसाहतीत रहात होते. त्यांचा ९ मे रोजी पडून मृत्यू झाला. सुरुवातीला वडाळा ट्रक टर्मिनस पोलिसांनी याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद केली होती. मात्र प्रवीण यांच्या भावाने यामागे घातपात असल्याचा संशय व्यक्त केला होता. शवविच्छेदन अहवालात प्रवीण यांच्या शरीरावर तब्बल ३८ जखमा असल्याचे नमूद केले होते. हा मृत्यू अपघाती नसून अनैसर्गिक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले होते. त्यानंतर पोलिसांनी सखोल तपास सुरू केला. पोलिसांनी प्रवीण सूर्यवंशी यांच्या पत्नी स्मिता आणि मुलगा प्रतीक यांच्याकडे चौकशी करून जबाब नोंदवले. या दोघांनी पोलिसांना दिलेल्या जबाबांमध्ये तब्बल १५ विसंगती आढळून आल्या.

# जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करा

## मराठा महासंघाची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २५ :
जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजाराची मदत द्या, अशी मागणी करीत अखिल भारतीय मराठा महासंघाने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. महासंघाने सविस्तर मागणीचे निवेदनही दिले.

जिल्ह्यात यंदा जून महिन्याच्या प्रारंभी वरुणराजाने फारशी कृपा केली नाही. मृग नक्षत्रात पावसाने पाठ फिरवल्याने अनेकांची चिंता वाढली. मात्र जूनच्या अखेरीस दोन वेळा मुसळधार पाऊस झाला होता. जून अखेरीस १५५.८ मि. मी. पावसाची नोंद झाली. हा पाऊस सरासरीच्या ११३.८ टक्के होता. त्यानंतर जुलै महिन्यात मात्र पावसाने सरासरी गाठली नाही. ऑगस्ट महिन्यात कधी संततधार तर कधी जोरदार पाऊस पडत सप्टेंबरमध्ये पावसाने सरासरी ओलांडली. याचा परिणाम पिकांवर झाला. आधीच गतवर्षीच्या खरिपात व नंतर रब्बी हंगामात पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला. दरम्यान जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाने निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. निवेदन देताना विनायकराव पवार, योगेश थोरात, संजय सूर्यवंशी, श्रीकांत सरोदे, राजेश पाटील, अरुण खोटरे, राजेश देशमुख, शंतनू वसू, कल्पना बिडवे, रश्मी पटेकर, सचिन गोमासे, प्रदीप लुगडे, गजानन खराडे, काशीनाथ पटेकर, प्रवीण शिंदे, विपुल माने, प्रदीप कदम आदी उपस्थित होते. असे झाले दोन महिन्यात नुकसान : जिल्ह्यात यंदा जून महिन्यात अतिवृष्टीमुळे ४ हजार २१५ हेक्टर क्षेत्रातील पिकांची हानी झाली. चार तालुक्यातील १६३ गावांमधील ७ हजार ५७७ शेतकऱ्यांचे ६ कोटी ५ लाख ५६ नुकसान झाले होते. जुलै महिन्यातील अतिवृष्टीचा फटका ११ हजार ५९७ शेतकऱ्यांना बसला होता. ११ हजार ५९७ शेतकऱ्यांचे ६ कोटी २१ लाखांचे नुकसान झाले होते. शेतातील उभी पिके पाण्यात गेलेली आहेत, असे अखिल भारतीय मराठा महासंघाने निवेदनात म्हटले आहे. नाल्याकाठच्या व नदीकाठच्या शेतातील पिके वाहून गेलेली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची आर्थिक हानी झाली आहे. शेतमालाच्या उत्पादनातून शेतकरी आपल्या मुलांचे शिक्षण व दैनंदिन खर्च भागवत असतो. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे झालेले नुकसानीमुळे शेतकऱ्यांना आपले जीवन जगणे कठिण झाले आहे. हातातोंडापर्यंत आलेला घास निसर्गाच्या लहरीपणामुळे हिरावून घेतला गेला. या अस्मानी संकटातून सावरण्यासाठी शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यात सरसकट आर्थिक मदत तातडीने जमा करावी, अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांची चालू शैक्षणिक फी माफ करावी, अशा मागण्याही करण्यात आल्या.

### जिल्ह्यात तब्बल १४२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

**अमरावती** सतत बसणारा लहरी निसर्गाचा मार, अतिवृष्टी, शासनाची उदासीनता, दुबार पेरणी, दरवर्षी वाढणारा उत्पादन खर्च, शेतमालाला योग्य हमीभाव न मिळणे, या कारणांमुळे जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येच्या घटना वाढत असल्याचे पुढे आले. जिल्ह्यात केवळ ऑगस्टमध्येच २६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. २०२१ ते २०२४ या चार वर्षाच्या कालावधीत १,२४९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यंदा जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यात १४२ शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवल्याचे वास्तव शासनाने दिलेल्या आकडेवारीवरून पुढे आले आहे.

मगरीच्या अश्रूंप्रमाणे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे दु:ख होत असल्याची भावना केंद्र आणि राज्य शासनाद्वारे व्यक्त केली जाते.

मात्र, प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सरकारकडून त्यांच्याच म्हणण्यानुसार प्रयत्नांची पराकाष्ठा होताना दिसत नाही. जुलै २०२४ मध्ये महायुतीने 'राज्य शेतकरी आत्महत्यामुक्त करू' अशी ग्वाही दिली होती. परंतु, जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी झाले नाही.

# रेशनचा २२५ क्विंटल तांदूळ घेऊन जाणारा ट्रक पकडला




■ महासागर प्रतिनिधी
खामगाव , दि. २५ :
सार्वजनिक वितरण प्रणालीचा २२५ क्विंटल तांदूळ काळ्या बाजारात घेऊन जाणारा ट्रक स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पारखेड फाट्यानजीक पकडला. या प्रकरणी पोलिसांनी ट्रक चालकाला अटक केली असून ट्रक जप्त करण्यात आला आहे. तर वाहनासह २६ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

रेशनच्या तांदुळाचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार होत असल्याच्या घटना समोर येत असतात. दरम्यान, अशाच प्रकारे रेशनचा मोठ्या प्रमाणावर तांदूळ घेऊन एक ट्रक जात असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांना मिळाली होती. त्यावरुन बुलडाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पारखेड फाटा येथे सापळा रचून २२५ क्विंटल तांदूळ अंदाजे किमत ७ लाख ६५ हजार रुपये तर ट्रक अंदाजे किंमत १९ लाख रुपये असा एकूण २६ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल पकडला. यावेळी पोलिसांनी ट्रक चालक याला ताब्यात घेतले असून ट्रक जप्त केला आहे. हा ट्रक पुढील कारवाईसाठी खामगाव ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, स्थानिक गुन्हे शाखा पोलिस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पीएसआय पंकज सपकाळे, हेड कॉन्स्टेबल एजाज खान, पोलीस कॉन्स्टेबल अमोल शेजोल, शिवानंद हेलगे यांनी केली.

## मयुरी गौरव ठोसर प्रकरणातील सर्व आरोपींवर कारवाईची मागणी

✦ नवविवाहित महिलेची आत्महत्या ✦ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने



■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. २५ :
बुलडाणा सुंदर मोतीनगर जळगाव खान्देश येथील मयुरी गौरव ठोसर हया २३ वर्षीय नवविवाहित महिलेने सासरच्या मंडळी कडून होणाऱ्या त्रासामुळे, सततच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली. या घटनेमुळे समाजमन सुन्न झालेले आहे. तिची आत्महत्या नसून सासरच्या मंडळी कडून तिची हत्याच करण्यात आलेली आहे. तिला न्याय मिळावा या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. उच्चशिक्षित तरुणीची लग्नाच्या अवघ्या चार महिन्यात अशी निर्दयी घटना घडते ही लाजिरवाणी बाब आहे. हुंडा प्रथा व स्त्रियांवरील छळ ही आपल्या समाजाच्या प्रगतीस बाधक बाब आहे. या प्रकरणात आरोपींना अटक झालेली असून, सर्व संबंधित आरोपींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी सासरकडील सर्व मंडळी पती- गौरव ठोसर, गणेश किशोर ठोसर, किशोर ठोसर, लता किशोर ठोसर यांचे वर जलद गती न्यायालय मार्फत खटला चालवून आरोपींना योग्य ती कठोर शिक्षा देण्यात यावी. एकाही आरोपीची जमानत मंजूर करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने जनजागृती मोहिम राबवून अशा अमानुष घटनांना आळा घालावा. हीच आमची समाजाच्या वतीने प्रामाणिक अपेक्षा आंदोलन कर्त्यांची आहे.

## विद्यापीठात पंडित दिनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २५ :
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात पंडित दिनदयाळ उपाध्याय यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे यांनी पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे, प्राचार्य डॉ. दिपक राऊत, डॉ. विक्रांत वानखडे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्याबद्दल माहिती विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी दिली. संचालन जनसंपर्क विभागातील श्री सुनिल महल्ले यांनी केले.

## सरकारने शेतकऱ्यांसाठी पूर्ण कर्जमाफी करावी

### उबाठा गटाच्या प्रवक्ता ॲड. शेळकेची मागणी



**बुलडाणा** : मोताळा तालुक्यातील उबाळखेड, गुळभेली, नळकुंड, खामखेड, राहेरा, खडकी, बुलडाणा तालुक्यातील पाडळी, गुम्मी, तराडखेड, मढ, इजलापूर आदी भागामध्ये दोन दिवसांपूर्वी ढगफुटी सदृश्य अतिवृष्टी झाली आहे. या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. दि.२४ सप्टेंबर रोजी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. शेतकऱ्यांनी जीवाचे रान करून उभारी घेतलेली पिके पूर्णतः वाहून गेली आहेत. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. शेतकरी पूर्णतः उद्ध्वस्त झाला असताना शासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे. ही बाब अत्यंत निषेधार्ह आहे. काल शासनाने जाहिर केलेली तुटपुंजी मदत ही जुलै–ऑगस्टमध्ये झालेल्या अतिवृष्टी संदर्भात आहे. मात्र, नुकत्याच झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत अद्याप कोणतीही ठोस घोषणा शासनाने केलेली नाही. शेतकऱ्यांची बोळवण करण्याचा प्रयत्न करू नये. या अतिवृष्टीमुळे शेतकरी उद्ध्वस्त झाले आहेत. त्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी शिवसेना (उबाठा) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी केली आहे.

# २ लाखांवर शेतकऱ्यांच्या नजरा मदतीवर शासनाकडून १८३ कोटी जाहीर



■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २५ :
यंदाचा पावसाळा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान करणारा ठरला आहे. तब्बल २ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना या पावसाचा फटका बसला असून या सर्व शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाईची मागणी करण्यात येत होती. त्यातच आता शासनाने जून ते ऑगस्ट २०२५ या दरम्यान जिल्ह्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी शासनाकडून १८४ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. ही मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. असे असले तरी ही मदत लवकर मिळणार की या मदतीची वाट पाहण्यातच उरलेला हंगामही संपून जाणार असा प्रश्न आता शेतकरी करीत आहेत.

यंदा पावसाळ्याच्या चारही महिन्यात अतिवृष्टी व पुरामुळे यंदा शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांचे पीकच खरडून गेल्याने शेतकरी अडचणीत आले आहे. सोयाबीन निघण्याच्या मार्गावर आहे. मात्र, अजूनही पाऊस थांबलेला नाही. शेतीपिकांच्या नुकसानीची मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून सुरू आहे. महसूल विभागाने जुलै व ऑगस्ट महिन्यात झालेल्या नुकसानीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. त्यावरुन शासनाने जिल्ह्यासाठी जवळपास १८४ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. जुलै व ऑगस्ट महिन्यात खरिपातील पिकांना फटका बसला. यात सोयाबीन, कापूस, तूर व ज्वारी या प्रमुख पिकांचा समावेश आहे. अतिवृष्टीने पिके पाण्यात खराब झाली असून रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. अतिवृष्टी तसेच पूर यामुळे सर्वाधिक नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना दोन हेक्टर मर्यादेत विहित दराने अनुदान दिले जाणार आहे. शासनाने जाहीर केलेल्या नुकसानीची मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. त्यासाठी या सर्व शेतकऱ्यांच्या बँक खात्यांची यादी तयार करून त्यानुसार शेतकऱ्यांना मदत द्यावी लागणार आहे. त्यात विलंब होवुन शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे नेमके दिवाळीच्या तोंडावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने दसऱ्यापर्यंतच शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करावे अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

# हैद्राबाद गॅझेटनुसार आरक्षणासाठी गोर बंजारा समाजाचा आर्णीत मोर्चा

### एसटीतून आरक्षण देण्याची मागणी



**आर्णी :** हैद्राबाद गॅझेटनुसार अनुसूचित जमाती प्रवर्गानूसार बंजारा समाजाला एस टी आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी सकल गोर बंजारा एस टी आरक्षण कृती समितीच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती येथुन भव्य मोर्चा काढुन तहसीलदार वैशाख वाहुरवाघ यांना निवेदन देण्यात आले. गोर बंजारा समाजाचा भव्य विराट मोर्चा कृषी उत्पन्न बाजार समिती येथून मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा माहुर चौक, बसस्थानक ,शिवनेरी चौक पाण्याची टाकी या मार्गाने मार्गक्रमण करीत बच्चेवार लेआऊट येथे सभेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत प्रथम सुरेश पवार यांनी संविधानाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर या सभेत राजुदास जाधव यांचे मनोगत झाले त्यांनी सांगितले की एस टी आरक्षणानुसार आरक्षण घेतल्या राहणार नाही. हैद्राबाद गॅझेटनुसार एस टी प्रवर्गानुसार बंजारा समाजाला आरक्षण देण्यात यावे या मागणीचे निवेदन तहसीलदार वैशाख वाहुरवाघ यांना राजुदास जाधव, अनिल आडे, प्रकाश राठोड, डॉ. अनिल खोला, राजेंद्र जाधव, हिरामण जाधव, जयसिंग राठोड, टि. डी. चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आले. या भव्य मोर्चामध्ये राजुदास जाधव, अनिल आडे, डॉ. अनिल खोला, राजेंद्र जाधव,राजेंद्र जाधव, किसन राठोड, एन. टी. जाधव, परशराम राठोड, संतोष आडे, रवी राठोड, टि. डी. चव्हाण, सुरेश पवार, माधव राठोड, अनिल राठोड, रंजित राठोड, रवि राठोड, अश्विन जाधव, रवि जाधव, राजेंद्र चव्हाण, नरेश राठोड,रमेश नाईक, यांच्यासह आदी बंजारा समाजातील महिला, पुरुष, युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. मान्यवरांनी मांडले मनोगत आम्ही कोणाच्या आरक्षणातून आरक्षण मागत नाही असे त्यांनी सांगितले. त्यानंतर वाशीम येथील डॉ. अनिल खोला, कळमनुरी येथील लाडो राठोड यांचे मनोगत आले. येथील कार्यक्रमाचे संचालन संतोष आडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन टि. डी. चव्हाण यांनी केले. त्यानंतर गोर बंजारा समाजाचा भव्य विराट भव्य मोर्चा तहसिल कार्यालय येथे धडकला.

# महावितरण उपविभागासमोर एमपीआरची होळी पुनर्रचनेच्या विरोधात कृती समितीची द्वारसभा



■ महासागर प्रतिनिधी
तिवसा, दि. २५ :
महावितरणमध्ये होणाऱ्या पुनर्रचनेविरुद्ध तिवसा उपविभागापुढे एमपीआरची होळी केली. महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते कृती समितीत सहभागी होऊन वितरणमध्ये होणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षेत्राचा, विश्वासात न घेता जनमित्रांसह अधीकाऱ्यांना वेठीस धरणारा पुनर्रचनेच्या एमपीआरची होळी केली.

जर ही पुनर्रचना लागू झाली तर त्याचा जनतेला होणारा त्रासाबदल सर्वांना अवगत केले . शासन दरबारी जर हा एमपीआर रद्द झाला नाही तर कृती समितीने ठरवल्याप्रमाणे ९ आक्टोबर. वीज कर्मचारी, अधिकारी संपावर जातील, असा इशाराही दिला. यात महाराष्ट्र राज्य स्टेट इलेक्ट्रीकल वर्कर्स फेडरेशन, महाराष्ट्र राज्य वीज कामगार संघटना, सबआर्डीनेट इंजिनिअर असो., महा. राज्य वीज कामगार कॉंग्रेस, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना, तांत्रिक कामगार युनियन (५०५९),महा.राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियन सह इतर संघटनांचे पदाधिकारी, अभियंते उपस्थित होते. या वेळी घोषणाबाजी व नारे देऊन हेकेखोर शासनाचा विरोध केला .

याप्रसंगी पदाधिकारी व कर्मचारी यांनी भूमिका स्पष्ट केली. व्दारसभेला नीलेश उईके (उप. अभियंता तिवसा उपविभाग), श्रीकांत संत, प्रमोद इंगळे, राठोड, आडे, अभिजित केचे, रामदास चव्हाण, चेतन भगत, सचिन रुंदे, बोंडे, सूरज अळणे, सचिन गौरखेडे, राहूल धोटे, मसराम, सोळंके, सलीम शहा, नीलेश कडव, ठवकर, रोहिणी उमप, कडू, इंगळे सह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पोल्ट्रीफार्मच्या मालकाने शेकडो मृत कोंबड्या तलावात फेकल्या

**नांदगाव पेठ :** नजीकच्या डिगरगव्हाण येथील एका पोल्ट्रीफार्म संचालकाने फार्ममधील मृत झालेल्या कोंबड्या गावातील तलावात फेकून दिल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. कुजलेल्या कोंबड्यांच्या प्रचंड दुर्गंधीनंतर हा प्रकार उघडकीस आला. डिगरगव्हाण येथील कर्तव्यदक्ष सरपंचा जिल्हेश्वरी शंकर ठाकरे यांच्या तक्रारीनंतर माहुली जहागीर पोलिसांनी पोल्ट्रीफार्म संचालकावर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकारामुळे परिसरात भितीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. डीगरगव्हाण येथील सरपंच जिलेश्वरी ठाकरे यांनी माहुली पोलिस ठाण्यात यासंदर्भात दाखल केलेल्या तक्रारीनुसार पांडुरंग माणिक कडू यांचे येथे पोल्ट्रीफार्म असून अज्ञात रोगामुळे त्यांच्या फार्ममधील अनेक कोंबड्या मृत्यूमुखी पडल्या.

मध्य रेल्वे
नागपूर विभाग
पार्किंग करारांसाठी ई-लिलाव
कॅटलॉग (पार्किंग आणि पे अँड युज टॉयलेट)
१. PARKING-NGP-NGP-TW-86-25-3 दिनांक १३/१०/२०२५ रोजी १५.०० वाजता सुरू/ दिनांक १३/१०/२०२५ रोजी १५.३० वाजता समाप्त.
२. PARKING-NGP-BZU-MX-56-25-5 दिनांक १३/१०/२०२५ रोजी १५.०० वाजता सुरू / दिनांक १३/१०/२०२५ रोजी १५.४० वाजता समाप्त
३. PnU-NGP-NGP-Toi-19-25-1 दिनांक १३/१०/२०२५ रोजी १५.०० वाजता सुरू./ दिनांक १३/१०/२०२५ रोजी १५.५० वाजता समाप्त.
रेल्वेच्या वेबसाइट www.ireps.gov.in वर तपशील
SUN 212 ACM(TC)/NGP
खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

# अग्रसेन महाराज जयंतीनिमित्त गुणवंतांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २५ :
अग्रवाल समाजाचे आराध्य महाराजा अग्रसेन यांची पावन जयंती अग्रसेन भवनात उत्साहात साजरी करण्यात आली. उल्लेखनीय कार्य करणारे व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

महाराजा अग्रसेन यांच्या प्रतिमा पूजनाने या सोहळ्याचा प्रारंभ करण्यात आला. अध्यक्षस्थानी अग्रवाल समितीचे अध्यक्ष दीपक गोयनका होते. प्रमुख पाहुणे म्हणून अग्रसेन भवन ट्रस्टचे अध्यक्ष गिरीश अग्रवाल, महाराजा अग्रसेन भवन ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. दिनेशचंद्र तुलशान, नवलकिशोर भरतीया, ज्ञानचंद गर्ग, अग्रसेन भवन ट्रस्ट तथा महाराजा अग्रसेन भवन ट्रस्टचे संयुक्त सचिव शैलेंद्र कागलीवाल उपस्थित होते. मंचावर समितीचे सचिव विनोद टोरका, उपाध्यक्ष महेंद्र खेतान, नरेश अग्रवाल, सतीश गोयनका, महिला मंडळ अध्यक्ष निशा लोहिया, सचिव मीना बाजोरिया, कोषाध्यक्ष दर्शना गोयनका, नवयुवक मंडळाचे अध्यक्ष केशव अग्रवाल, सचिव शुभम अग्रवाल, राधिका अग्रवाल, कोषाध्यक्ष मेघा अग्रवाल आदी उपस्थित होते. अध्यक्ष गोयनका यांनी करून जयंती सप्ताहातील विविध सांस्कृतिक व वैद्यकीय उपक्रमांची माहिती देत हा जयंती सप्ताह साजरा करण्यासाठी सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले. गिरीश अग्रवाल, ज्ञानचंद गर्ग, ॲड. दिनेशचंद्र तुलशान यांनी मार्गदर्शन केले. बेंगलोरहून उपस्थित झालेले डॉ. सुधीर लोहिया यांचाही नामोल्लेख करण्यात आला. सूत्रसंचालन समितीचे सदस्य अंकित अग्रवाल यांनी तर आभार अशोक सोनालावाला यांनी मानले. या जयंती उत्सवाच्या सफलतेसाठी अग्रवाल समितीचे अध्यक्ष दीपक गोयनका, उपाध्यक्ष महेंद्र खेतान, नरेश अग्रवाल, सतीश गोयनका, सचिव विनोद टोरका, जगदीश झुनझुनवाला, कोषाध्यक्ष अनिल पाडिया, सहकोषाध्यक्ष पवन अग्रवाल, हिशोबनीस गोपाल गुप्ता आदींनी परिश्रम घेतले. यांचा केला सत्कार सोहळ्यात समाजात उल्लेखनीय कार्य केलेल्या दिवंगत स्व. कांतादेवी गोयनका यांना मरणोत्तर अग्रविभूती पुरस्कार बहाल करण्यात आला. हा पुरस्कार त्यांचे कुटुंबीय उत्सव गोयनका, किरण गोयनका तथा संजय गोयनका यांनी स्वीकारला. समाजातील २७ गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जयंती सप्ताह वैद्यकीय सेवा देणारे डॉ. श्रद्धा अग्रवाल, डॉ. दिशा बगडिया, डॉ. पलक गोयनका यांना सन्मानित करण्यात आले.

## पेट्रोल पंपावर उभा केलेला ४० लाखांचा ट्रक रात्रीतून गायब

**अमरावती :** नांदगाव पेठ येथील राष्ट्रीय महामार्गावरील टोल नाक्याजवळच्या नाफडे पेट्रोल पंपावरून २२ सप्टेंबरच्या मध्यरात्री एक ट्रक चोरीला गेला. शिराळा येथील रणजित साहेबराव बोकसे यांच्या मालकीचा टाटा कंपनीचा ट्रक (क्र. एम.एच.२७, डी.आर.२५२५) चालकाने पेट्रोल पंपासमोर उभा केला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी मालक पेट्रोलपंपजवळ आले असता ट्रक गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. जीपीएस लोकेशनवरून ट्रक डवरगाव ते चिचखेड परिसरात हलवल्याचे दिसले. मात्र प्रत्यक्ष शोध घेतला असता ट्रक आढळून आला नाही. ट्रक बँकेकडून फायनान्सवर घेतलेला असल्यामुळे बोकसे यांनी बँकेकडे चौकशी केली.

कार्यालय
नगर पंचायत,भिवापूर
ता. भिवापूर, जिल्हा-नागपूर
Email Id:bhiwapurnagarpanchayat@gmail.com फोन:07176-232308
क्र.कावि/नपंभ/निव.वि./अंतिम प्र.र./२०२५/८६९ दिनांक.२५/०९/२०२५
प्रेस नोट
महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या तरतूदी नुसार नगर पंचायत भिवापूर सार्वत्रिक निवडणूक - २०२५ अन्वये अंतिम प्रभाग रचना तयार करण्यात आलेली आहे. सदर अंतिम प्रभाग रचना नगर पंचायत कार्यालयाच्या दर्शनिस्थळी (नोटिस बोर्डावर) सर्वसामान्य नागरीकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच नगर पंचायत भिवापूर च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
करीता नागरीकांना नगर पंचायत भिवापूर कार्यालयातील नोटिस बोर्डावर व संकेस्थळावर भेट देऊन अंतिम प्रभाग रचनेचा तपशिल पाहता येईल.
मुख्याधिकारी
नगर पंचायत, भिवापूर


# ओल्या दुष्काळात शेतकरी मात्र कोरडाच!

# आपत्तीतही प्रसिध्दीचा हव्यास...

राज्यात पावसाने थैमान घातले असून मोठ्या प्रमाणावर ओला दुष्काळ पडला. या दुष्काळातही शेतकरी मात्र कोरडाच राहणार अशी लक्षणे दिसू लागली आहेत. सरकार कोणाचेही असो, कोणत्याही पक्षाचे असो शेतकऱ्यांना मात्र दुय्यम स्थान आयुष्यभर कायम राहिले आहे. आताही तसेच दिसत आहे. जनता एकमेकांना मदत करीत आहे. सरकारची हेलिकॉप्टर उशिरा निघतील व हवेतून पाहणी करते. जमिनीवर मदत करायला त्यांना वेळ थोडाच आहे? लष्कराचे जवान मात्र प्रामाणिकपणे आपली भूमिका पार पाडत आहे आता सामान्य माणसांना मदतीचा हात फक्त हे जवानच देऊ शकतात. सरकार फक्त नुकसान भरपाई देते, ती देखील तुटपुंजी अशी देते. घरदार, शेती, जनावरं सगळं गमावलेल्या शेतकऱ्याला नुकसान भरपाई किती? तर हेक्टरी सात हजार रुपये. आता तर एकूण मदत जाहीर केली २२०० कोटी. शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखा हा प्रकार नाही का? शक्तीपीठ महामार्गाला सरकार ८० हजार कोटी देते, नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी १४ हजार कोटी देते. हा प्रकार जनतेच्या लक्षात येत नाही, असे सरकारला वाटते का? आता तर समाजसुधारकच म्हणू लागले की, बिनडोक बहुजनांचे डोळे उघडतील की नाही? सरकारच्या प्राथमिकता काय आहेत आणि तुमची लायकी काय आहे समजते की नाही? राममंदिर बांधायला, देणग्या द्यायला शेतकऱ्यांची पोरं, गोरक्षक म्हणून खटले अंगावर घ्यायला तीच पोरं आणि आता वेळ शेतक-यांच्या पोराबाळांवर व कुटुंबीयांवर आल्यावर मात्र त्यांचीच पोरंबाळ रस्त्यावर. भारतीय लोकांना जाती-भेद, धर्मभेद, गरीब-श्रीमंत, प्रांत भेद या गोष्टींमध्ये पेटवायचे, मग हे एकमेकांनाच कापत बसतील. कोणत्याही प्रश्नावर कधीही एक होऊ शकणार नसेल, हे असेच होत असेल तर शेतकरी तरी कसे एकत्र येणार? शेतकऱ्यांना मदत देण्याऐवजी प्रत्येक राजकीय पक्षाचे स्वतंत्र मेळावे व शक्ती प्रदर्शन सुरू आहे. राज्यातील शेतकरी हताशपणे हे सर्व चित्र पाहत आहे. धाराशिव जिल्ह्यात पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी त्यांना जे साहित्य वाटप करण्यात येत होते, त्या साहित्यावर नेत्यांचे फोटो चिटकवल्याशिवाय वाटप सुरू झाले नव्हते. म्हणजे एका बाजूला शेतकरी मरणासन्न अवस्थेत पडला असतानाही नेत्यांना प्रसिद्धीचा हव्यास दिसून आला.






जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

घरात चिखलाचा खच, मुलांची वह्या-पुस्तके पाण्यात; चिमुकले निशब्द, आई धाय मोकलून रडतेय, अशी स्थितीत धाराशिवमध्ये भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळाचे चटके सहन करणारा मराठवाडा सध्या ओल्या दुष्काळानं ओलाचिंब झालाय. तेथे इतका पाऊस झाला की मराठवाड्याच्या नाकातोंडात पाणी गेलंय आणि जनजीवन ठप्प झालं.

धाराशीव, बीड, जालन्यात पावसाचं थैमान पाहायला मिळालंय. ज्या मराठवाड्याला दुष्काळात रेल्वेनं पाणी पोहोचवावं लागलं होतं. तिकडे आता हेलिकॉप्टरमधून लोकांचं रेस्क्यू करण्याची वेळ आली आहे. मराठवाड्यात एक जूनपासून आतापर्यंत सरासरीच्या १२४ टक्के पाऊस पडला आहे. सरासरी ६०४ मिमी २२ सप्टेंबरपर्यंत पाऊस होत असतो. मात्र ७४७ मिमी इतका सरासरी पाऊस मराठवाड्यात झाला आहे. फक्त सप्टेंबरचा विचार करायचा १६५ टक्के पाऊस मराठवाड्यात झाला आहे.

धाराशिव जिल्ह्यातील पूरस्थिती कमालिची बिकट झाली आहे. मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरानं जिल्ह्यातील अनेक संसार उघड्यावर पडले आहेत. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये घरांना पुराच्या पाण्याचा वेढा पडलाय. त्यामुळे नागरिक घरांच्या छतावर जाऊन जीव वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. काही ठिकाणी छतावर अडकलेल्या नागरिकांना हेलिकॉप्टरच्या सहाय्याने रेस्क्यू करण्यात आलंय. अनेकांच्या घरातील सामान अस्ताव्यस्त अवस्थेत पडल्याचं दिसून येत आहे. मुलांची वह्या-पुस्तके पाण्याने भिजली आहेत. घरात चिखलाचा खच तयार झाला आहे.

मागील चार पाच दिवसांपासून सुरु असलेल्या पावसाने पश्चिमेसह पूर्व विदर्भातही अशीच पूरस्थिती निर्माण झाली आहे. गडचिरोली, चंद्रपूर आणि वर्धा जिल्ह्यात कितीतरी जण पुराच्या पाण्यात वाहून गेले. गडचिरोलीतील भामरागड तालुक्याचा पुरामुळे संपर्क तुटला आहे. तर, चंद्रपुरात पूर परिस्थिती कायम आहे. मुंबईत सुरु असलेल्या पावसाने नेहमीप्रमाणे ठिकठिकाणी पाणी साचून जनजीवन विस्कळीत होत असते. अनेक ठिकाणी शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. आता मराठवाड्यातही हाहाकार माजला असून धाराशिव जिल्हा पूर्णपणे पाण्यात बुडाला आहे.

मागील दोन-तीन दिवसांपासून धो-धो कोसळणाऱ्या पावसाचा जोर काल देखील कायम राहिला. दिवसभरात सातत्याने पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. परिणामी अनेक ठिकाणचे रस्ते आणि सखल भागांत पाणी साचून पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांची धांदल उडाली. जोरदार पावसाबरोबराच सोसाट्याचा वारा वाहत असल्याने अनेक ठिकाणी झाडांची पडझड झाली.

दरम्यान, येथील हवामान विभागाने राज्यात शनिवारपासून पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. राज्यातील विविध भागांत कालपर्यंत पावसाचा जोर कायम होता. राज्यात गेल्या काही दिवसापासून पडणाऱ्या जोरदार पावसामुळे अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली.

गुरुवारच्या तुलनेत काल पावसाचे प्रमाण थोडे कमी झाल्याने नद्यांतील पाण्याची पातळी कमी झाली आहे. नाशिक मध्ये मात्र कालपासून पावसाने उघडीप दिली. त्यामुळे गावांना दिलासा मिळाला. प्रत्येक वेळी पावसाने थैमान घातल्यावर आपली लढाई आपल्यालाच करावी लागते, याची जाणीव शेतकऱ्यांना असल्याने ते कधीही सरकारवर अवलंबून राहत नाही. परंतु संघर्षामुळे घरातील बायाबापड्यांच्या डोळ्यातील अश्रू पाहवत नाही.

मराठवाड्याला मदत करायला जाताना तेथील स्थानिक नेते एकनाथ शिंदे, प्रताप सरदेसाई यांनी पाठवलेल्या मदतीच्या साहित्यावर स्टिकर लावण्यात दंग होते. हे चित्र मात्र संतापजनक होते. उर्मटपणे स्टिकरकडे पाहू नका, मदत स्वीकारा असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बिनदिक्कतपणे सांगत होते, तर दुसरे भाजपचे संकट मोचक म्हटले जाणारे मंत्री गिरीश महाजन तर शेतकऱ्यांना म्हणत होते की, 'मी काही मदतीसाठी खिशात पैसे घेऊन फिरतो का?'

याचा अर्थ सरकारला शेतकऱ्यांना मदतीचा फक्त देखावा करायचा असतो. अंतर्मनातून मात्र तशी कोणतीही भावना नसते. शेतकऱ्यांची अवस्था देखील आभाळ फाटल्यावर ढिगळ कुठे कुठे लावणार? अशी झाली आहे. म्हणूनच शेतकऱ्यांची पुढची पिढी शेतीत राबायला तयार नाही. त्यामुळे त्यांचे काही चुकत असेल असेही वाटत नाही. एकूणच शेतीचे भविष्य काही खरे नाही हे दिवसेंदिव स्पष्ट होत चालले आहे!

## नेत्यांनो गाड्या काढा व लवकर घराबाहेर पडा

ॲमेझॉन फ्लिपकार्टवर बिग मिलेडीयन डेजवर बरीच लोकं लाईन लावुन मोबाईल रेंज शोधून जवळपास १,७५,००० हजारांचा मोबाईल खरेदीला वेटिंगला आहेत. परंतु जरा दुसरीकडे बघितले तर या अवकाळी पाऊसाने शेतकरी इतका मोडलाय की चालु पिकं तर गेलीत, पण सरकार काय ते तुटपुंजी मदत देईल न देईल कुणाकुणाचे पंचनामे होईल म्हणून काही सरकारने सोडलेले काही भ्रष्टाचारी काय तकाय खातील सांगता येणार नाही. इतक्या प्रचंड प्रमाणात पाऊस पडुन खुप नुकसान झाले आहे. पाण्यात शेतंच्या शेतं वाहुन गेली, माती पाणी वाहुन गेली, आता दगडं ही वाहुन गेलीत. इतकं नुकसान झालयं की, शेतकऱ्यांना पुढील पाच वर्षात ही सुपीक जमीन गाळ जमा करुनही भरुन येणार नाही हे वास्तव आहे. विद्यमान सरकार व विरोधात बसलेलेही यांनी विचारात जर घेतलंच नाही, तर शेतकऱ्यांना आत्महत्या किंवा मृत्यू हे पुर्ण सत्य ठरणार आहे. ही वस्तुस्थिती सरकारमध्ये असलेल्या मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मुख्य सचिव, मंत्री, आमदार, खासदार, तहसिलदार, प्रांत, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, कोतवाल, दंवडीवाला यांनी जर विचारमंथन केलेच नाही, तर पक्ष, व्यक्ती, निष्ठा, जात, नातंगोतं हे सर्व धुळीत घालायला हाच ग्रामीण भागातील कणा असलेल्या कष्टकरी शेतकरी पुढे येईल. जीवन जगण्यासाठी व लेकरांना सुख शोधतानां भाकरीचा चंद्र शोधायला निघालेला गोरगरीब वरील सर्व घटकांना केव्हाच पारखा करुन एक तर यांचं म्हणणं ऐकणार नाही किंवा या ईहलोकातुन यांच्यापासून खुप दूर गेल्याशिवाय राहणार नाही. म्हणून जरा मुंबई सोडा, अलिशान हॉटेलातले रुम सोडा, ड्रायव्हर बोलवा व गाड्या काढून ज्या त्या मतदार संघात जरासा फेर फटका मारा साहेब! अन्यथा लई पाणी पाणी करतील लोकं तुमचं! बघा जमलं तर

■ **शशी अमृतकर, एक शेतकरी पुत्र.**

## राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा

या वर्षी वरूण राजाला भयंकर राग आला आहे. सप्टेंबर पासुन दररोजच धो धो पाऊस कोसळत असुन अर्ध्या राज्यात तर पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले असुन काही भागात पन्नास ते सत्तर टक्के नुकसान झाले आहे. आता कशाला पंचनामा नावाचा सोपस्कार करता ? पंचनामे करून काय सर्व भरपाई शासन देणारच नाही. मग तसे न करता किमान पुढे जगायला आधार म्हणुन हेक्टरी चाळीस हजार रुपए नुकसान भरपाई म्हणुन राज्यातील सर्वच शेतकऱ्यांना सरसगकट दिले तरच भविष्यात शेती हिरवी होईल. नाही तर पडीत ठेवा व कसे तरी जगा. मग देशातील जनता काय खाणार? शेतकरी कुटुंबाला वर्षभर पुरेल एवढे सहज पिकवेल. पण बाकीच्या जनतेचे काय? यासाठी सरसकट आर्थिक मदत जी नुकसानीच्या चाळीस टक्केच राहील. पण शेतकऱ्यांना शासनाची फालतू उधळपट्टी व ती करतांना सत्तर टक्के बोगस लाभार्थी? मग राज्यावर कर्जाचा डोंगर उंच उच वाढतच जाणार आहे. शासनाच्या सुपीक मेंदूमधुन काय योजना जन्म घेईल सांगताच येत नाही. आताच बांधकाम करणाऱ्या वर्गाला मोठ्या प्रमाणात काही योजना मोफत दिल्या. पण त्यात नव्वद टक्के बोगस लाभार्थी घुसले. स्थानीक प्रशासन पुर्ण मुकबहिर व आंधळे झाले आहे.
कारण ते शासनाची तिजोरी लुटतात व ठराविक जनतेलाही लुटु देतात. अगदी मुर्खपणाचा कळस म्हणजे भांडे वाटप. शासन वस्तु रूपाने मदत करायला पुढे असते. त्याचे कारण वस्तु खरेदीत मोठे कमीशन असतेच. जनतेला काय हवे ते न बघता वाटत करीत सुटायचे व निवडणुका जिंकायच्या. अशाने मोठा स्फोट झाला तर घराणेशाही जोपासणारे स्मशानभुमीतच लपुन बसतील, येवढे भयानक वास्तव आहे. म्हणुन राज्यभर ओला दुष्काळ व हेक्टरी चाळीस हजार रुपए मदत व शंभर टक्के पिक विमा भरपाई असे काही तरी ठोस केले, तरच शांतता राहील. अन्यथा मोठा उद्रेक बघावा लागेल हे नक्की.

■ **अशोक थोरात, ज्येष्ठ पत्रकार.**

# मधुकरराव अभ्यंकर : आम्रफलांनी बहरलेला वृक्ष



मधुकरराव अभ्यंकर मूलतः ग्रामीण मातीतून अन अवकाशातून फुलून आलेले व्यक्तिमत्व आहे .त्यामुळे त्यांच्या जाणिवेच्या अंतभार्गी ग्रामीण संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे वंचितांच्या, दलित-पददलितांच्या, सर्वहारांच्याच नव्हे तर सर्वस्वहारा समाजाविषयीची एक अकृतिम आणि उपजत करूणा बुध्दी त्यांच्या अंतः कोषात, त्यांच्या चितवृत्तीत परिपूर्ण भरलेली आहे.

पाच सहा हजार लोक वस्तीच्या विहींगाव ता अंजनगांव सुर्जी नावाच्या गावखेडयात त्याचा जन्म झाला .विदर्भातल्या सर्व उष्ण कळा झळा, टोकाची विषमता, दैन्य, दारिद्र दुःख, अस्पृश्यता, जाती जातींची गुराढोरांच्या कोंडवाडयातली उतरंड उरापोटाशी घेवून तग धरून जीवन अन आयुष्य कंठणारा हा ग्रामीण परिसर.

ग्रामीण जीवनदर्शनाची जडण घडण नव्यानं करू पाहणारा मुलभूत अन कळवडयाचा संस्कार मधुकरराव अभ्यंकरांवर इथल्या सर्जनशील मातीनेच केला. मधुकरांवाच्या माझ्या बाबांच्या श्वशुयांच्या व्यक्तीमत्वविकासाच्या पुढच्या पायऱ्यांवर जाण्याआधिची पायाभरणी याच जन्मभूमिच्या मृण्मय परिसरात झाली. खर तर आपण सारे बहुजन फुले आंबेडकर पतिर्वतन पर्वातल्या अग्नीवर्षाव झेलणाऱ्या समाजक्रांतीकारांचे सुखाचे सदरे घातलेले बारस आहोत, वारस आहोत.

फुले शाहू-आंबेडकरांच्या कष्टीकपणाची, रक्त आटवण्याची आपणास पुरेशी जाण नाही पण मी माझ्या मधुकर बाबांविषयी खात्रीनं अन अभिमानाने सांगते की, त्यांनी जो शैक्षणिक परिसर उभा केला तो रक्त आटवून, प्रसंगी माझ्या सासूबाईचे सोन्याचे दागिने मोडून, अनेक वर्षे राबराब राबून आमच्या संस्थेतल्या राहुल व्यायाम प्रसारक मंडळातल्या सर्व शाळांमध्ये सामाजिक बांधिलकीची जी प्रखर पण कृतीशील जाणीच पेरली ती आमच्या मधुकरबाबांनी.

आमच्या सर्व शाळांमध्ये जोतीराव, सावित्रीबाईच्या परिवर्तन मूल्यांचा एक सखोल संरकार शिक्षकांइतकाच इथल्या विद्यार्थी विद्यार्थीनींवर रूजवला जातो तो केवळ अन केवळ माझा बाबांमुळे.

महामानवांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या असो की सर्व राष्ट्रीय दिन पर्यावरण रक्षणापासून तर स्त्रियांच्या सक्षमीकरणापर्यतचे सर्व उपक्रम. हे सर्व उपकम केवळ दिखावू अन वातम्या फोटोसाठी नसतात, तर ते मूल्यसंस्काराच्या बिजारोपणाचे आणि त्याच्या रूजूवणुकीचे असतात.

हया सर्वाच्या मागे प्रेरणापुरूष असतात ते आमचे मधुकर बाबा. आमच्या संस्थेतल्या सर्व शाळांची मैदाने, त्या भोवतीचे सर्व वृक्ष त्या वृक्षांचे संवर्धन आणि संगोपन, शाळांच्या इमारतींची रचना, त्याचे बांधकाम, वर्ग खोल्यांचे सुशोभीकरण, पिण्याचे पाणी मुलामुलींची स्वच्छतागृहे एखादया महाविद्यालयालाही लाजवेल अशी आहेत. या सर्व भौतिक सुखसोयी बाबांनी स्वतः उन्हातान्हात राबून उभारल्या आहेत. म्हण६न म्हणावसं वाटतं की मधुकर अभ्यंकररांनी आम्हा सर्वांच्या हाती भौतिक शैक्षणिक व ज्ञानात्म समृध्दीचं कोषागारच दिल नाही तर अक्षयज्ञानाची मुक्तपेठही सोपविली.

शिक्षणप्रेमी मधुकररावांनी चार दशकांपूर्वी डॉ. पंजाबराव देशमुखांच्या ज्ञानभूमीत, तुकडोजींच्या भजनभुमीत अन गाडगेबाबा दाजीसाहेबांच्या कुष्ठसेवा भूमीत ज्ञानामृताचं रोपट लावल. आज आम्ही त्या रोपटयाचा महावृक्षाची फळं चावतो आहोत. त्यांच्या पर्णसंभाराच्या सावलीत आम्ही विसावतो आहोत. मधुकरबाबांचे हे पितृऋण आम्ही कधीही विसरणार नाही. बाबांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना कोटीकोटी प्रणाम आणि अनंत शुभेच्छा...



प्रा. सौ. शुभांगी क्षितिज अभ्यंकर
अमरावती.

■ ■ ■

# संयुक्त कुटुंबापासून न्यूक्लिअर पर्यंत

# बदलत्या संगोपनाचा मुलांच्या मनावर परिणाम

आजच्या आधुनिक कुटुंबपद्धतीत मुलांच्या संगोपनाचा चेहरामोहरा झपाट्याने बदलतो आहे. पूर्वी संयुक्त कुटुंबात मूल संपूर्ण घराच्या देखरेखीखाली आणि शिस्तीत मोठं व्हायचं. पण आता न्यूक्लिअर फॅमिलीमुळे त्याचा परीघ फक्त आई-वडिलांपुरता मर्यादित राहिला आहे. या बदलाचा थेट परिणाम मुलांच्या स्वभावावर, मानसिकतेवर आणि सर्वात जास्त त्यांच्या एकाग्रतेच्या क्षमतेवर होत आहे.

**बदलत्या कुटुंबरचनेचा परिणाम**

संयुक्त कुटुंबात मूल फक्त आई-वडिलांचं नव्हे, तर संपूर्ण घराचं असायचं. आजीची ओरड, काकूची शिकवण, काकांचे अनुशासन आणि मामाचा विनोद या सगळ्याने मिळून मूल घडत असे.

न्यूक्लिअर फॅमिलीमध्ये मात्र मूल केवळ दोन व्यक्तींची जबाबदारी ठरून जातं. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS-5, 2019-21) नुसार, भारतातील शहरी भागात आता ६०% पेक्षा अधिक घरांत एक किंवा दोन मुलंच आहेत. याचा परिणाम मुलांच्या सामाजिकीकरणावर आणि सहनशीलतेवर स्पष्टपणे दिसतो.

**लाड-प्यार आणि ओव्हर अटेंशन**

मुलं कमी असल्याने आई-वडील त्यांना विश्वाचं केंद्रबिंदू बनवतात. प्रत्येक मागणी पूर्ण करणं, अगदी छोट्या यशावरही वा वा बाळा असं म्हणणं किंवा सोशल मीडियावर त्याची प्रत्येक उपलब्धी दाखवणं, हे सगळं मुलाला वास्तवापासून दूर नेतं. इंडियन जर्नल ऑफ सायकियाट्री (२०२२) च्या अहवालानुसार, शहरी भारतातील सुमारे ३५% मुलं लक्ष विचलित होणं आणि मूड स्विंग्स अशा समस्यांनी त्रस्त आहेत. हळूहळू मूल हे मानायला लागतं की त्याची किंमत फक्त टाळ्या, पुरस्कार आणि कौतुक यावरच आहे.

**शाळा आणि घरातील दरी**

घरी जिथे सर्व काही त्याच्या मर्जीप्रमाणे होतं, तिथे शाळेत मात्र तुलना, स्पर्धा, भेदभाव आणि शिस्तीचं वातावरण असतं. हा विरोधाभास समजून घेणं एकुलत्या मुलांसाठी कठीण ठरतं. युनिसेफ २०२१ च्या अहवालानुसार, भारतातील १० पैकी ६ मुलं शाळेत मानसिक दडपण आणि असमानतेचा अनुभव घेतात.

**योग्य संस्कार आणि शिस्त हाच उपाय**

एकुलतं मूल जन्मतःच बिघडलेलं किंवा कमकुवत असतं ही समजूत चुकीची आहे. प्रत्यक्षात, तेही तितकंच सक्षम आणि प्रतिभावान असतं. फरक फक्त संगोपनात असतो.

आई-वडील जर योग्य संस्कार, शिस्त आणि थोडीशी कडकाई यांच्या आधारे मुलांना वाढवतील, तर एकुलतं मूल अधिक स्वावलंबी, सहनशील आणि आत्मनिर्भर होऊ शकतं.

**शोपीस नव्हे**
**माणूस म्हणून वागवा मुलाला**

आजचा मोठा धोका असा आहे की आपण मुलाला माणूस कमी आणि डिस्प्ले पीस जास्त समजू लागलो आहोत. त्याच्या यशाला आपली अपूर्ण महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचं प्रकल्प मानतो. मात्र मूल हे घराचं गर्वाचं टॅग नव्हे, तर स्वतःचं नशीब आणि वाट घेऊन आलेलं स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे.

आजच्या पिढीतील मुलांमध्ये एकाग्रतेची कमतरता ही केवळ त्यांची चूक नसून बदलत्या कुटुंबपद्धतीचा आणि संगोपनशैलीचा परिणाम आहे. संयुक्त कुटुंबातील विविध शिकवणी आणि शिस्त आता दुर्मिळ झाल्या आहेत. तरीसुद्धा लहान कुटुंबांत योग्य मार्गदर्शन, संतुलित प्रेम आणि शिस्त यांचा समन्वय साधला, तर पुढची पिढी आणखीनच सक्षम होऊ शकते.

मुलांना स्टार परफॉर्मर किंवा कुटुंबाचा अभिमान बनवण्यापेक्षा त्यांना जागरूक, सहनशील आणि आत्मनिर्भर माणूस बनवणं अधिक गरजेचं आहे.



युगेश्वरी प्रवीण डबली
प्राध्यापक, हिंदी विभाग
दयानंद आर्य कन्या महाविद्यालय, नागपूर.

■ ■ ■

वाचक लिहितात

## नवरात्र सेलिब्रेशन नव्हे तर मातृशक्तीचा उत्सव!

प्रत्येक प्रांताचे एक वैशिष्ट्य असते, परंपरा असतात. त्या जपल्याच पाहिजेत अन्यथा आपली पुढील पिढी आपल्या सण आणि उत्सवांकडे एक सेलिब्रेशन इव्हेंट म्हणून बघतील. नवरात्र हा मातृशक्तीचा उत्सव आहे, पण हल्ली नवरात्र म्हणजे डिजे लावून गरबा- दांडिया खेळणे इतकेच माहीत आहे. आचार-विचार, संस्कृती, धार्मिक परंपरा याचा त्यांना एकदा विसर पडला की, गळ्यात क्रॉस घाला किंवा सुंता करा, काहीच फरक पडणार नाही. नेमकी हीच नस या इव्हेंट आणि मार्केटिंग आस्थापनांनी पकडली आहे. यात धर्म हानी हिंदूंचीच आहे. धर्मशिक्षणाचा अभाव व मौजमजा करायला मिळाल्याने तरुण पिढी या डिजे आणि गरबा-दांडियाला नवरात्र समजतील, कारण त्यांना नवरात्र म्हणजे देवीची उपासना हे ठाऊकच नसणार. भेट वस्तूंच्या परकीय कंपन्या आणि ग्रिटिंग कार्ड (शुभेच्छापत्र) करणाऱ्या कंपन्या भारतात आल्या, तेव्हापासून हे डे चे खूळ डोक्यात शिरले.

आज अशी अवस्था आहे की, मुलांना श्रीगणेशचतुर्थी, गोकुळाष्टमी कधी आहे, हे सांगावे लागते, तर डे मात्र त्यांच्या लक्षात असतात. गोकुळाष्टमी ही राजकीय पुढारी मंडळींच्या कृपेने अशीच डिजेमय आणि मद्यमय झाली. किमान आईचा उत्सव (नवरात्रोत्सव) असा होता कामा नये, असे वाटते.

चंड मुंड, शुंभ निशुंभ, रक्तबीज वगैरे राक्षसांना मारून त्यांचा उत्पात शमन करून जगदंबेने जी विश्रांती घेतली तो हा काळ आहे. युद्धाचा शीण घालवण्याकरता देवीने नृत्य केले, असा उल्लेख पुराणात आहे. मुलींनी गरब्यातील भक्तिरस आणि दांडियातील क्षात्रतेज आपल्यात निर्माण करणे ही काळाची गरज आहे. देवीचे माहात्म्य व पराक्रम वाचावेत. महाकालीसारखा, झाशीच्या राणीसारखा, कित्तुरची चेन्नमा, जिजाबाई यांच्यासारखा पराक्रम दाखवण्याची ही वेळ आहे. नाचणारे खूप झाले पण पराक्रमी मात्र अल्प होत आहेत. तेव्हा आपल्या मुलामुलींना या धोक्यांची जाणीव करून देणे हे आपले कर्तव्य आहे. परकीय कंपन्यांच्या या मार्केटिंग आणि इव्हेंट फंड्यांना बळी न पडता सात्त्विकरित्या, आनंदाने, आपल्या परिस्थितीनुरूप जगदंबेची सेवा करा आणि देवीची कृपा संपादन करा.

■ **सौ. सिद्धी सहारे, नागपूर.**

## नवरात्रीत कुमारीका पूजन करावे

नवरात्रीमध्ये कुमारीकापूजनाला विशेष महत्त्व आहे. कुमारीका ही देवीच्या अप्रकट शक्तीचे प्रतीक आहे. याचा अर्थ कुमारीकेमध्ये दुर्गादेवीचा अंश असतो. कुमारीका पूजन केल्यामुळे हे शक्तीतत्व जागृत होऊन याचा कुमारीकेचे पूजन करणाऱ्याला लाभ होतो.

नवरात्रीत रोज एक किंवा कोणत्याही एका दिवशी नऊ या विषम संख्येत कुमारीकांना घरी बोलवतात. त्यांना बसण्याकरता आसन म्हणून घोंगडे देऊन त्यांच्यामधील देवीतत्त्व जागृत झाले आहे असा भाव ठेवून कुमारीकांची पाद्यपूजा करतात. देवीला आवडणारे खीर आणि पुरी असे भोजन त्यांना केळीच्या पानावर वाढतात आणि नवीन वस्त्रे देऊन आदिशक्तीचे रूप मानून त्यांना भावपूर्ण नमस्कार करतात.

■ **दिपाली गिते.**
**सातारा.**

## झोपेची कमतरता मेंदूसाठी दारुपेक्षाही खतरनाक



अलिकडे झालेल्या संशोधनानूसार झोपेची कमतरता मेंदूवर मद्याच्या प्रभावाप्रमाणे काम करते असे उघड झाले आहे. सातत्याने झोपे कमी मिळाल्याने आपली एकाग्रता नष्ट होत असते.

माणसाची स्मृती देखील कमी होते आणि मूडमध्ये लागोपाठ बदल होत राहातो. झोपेच्या कमतरतेचा परिणाम हा अस्थायी नसतो तर कायम स्वरुपी असतो. उदाहरणार्थ मद्य पिल्याने मेंदू अस्थायी रुपाने सुन्न होतो. परंतू अपुऱ्या झोपेचे परीणाम दीर्घकालीन रुपाने शरीरावर निगेटिव्ह इफेक्ट करीत राहतात. लागोपाट कमी झोपणाऱ्या लोकांची हळूहळू मानसिक आणि शारीरिक क्षमता कमी होत जाते.

**झोपेचा संपूर्ण मेंदूवर होणारा परिणाम**

झोपेच्या कमतरतेचा परिणाम दारु सारखा शरीरावर दिसू लागतो. रात्री नीट झोप न झाल्याने व्यक्तीला सातत्याने थकवा, मानसिक भ्रम आणि आळस येत राहतो.याशिवाय झोप न घेतल्याने मेंदूच्या पेशींचे कार्य देखील प्रभावित होऊ शकते.

तज्ज्ञाच्या मते झोप न मिळाल्याने त्याचा परिणाम शरीरावर बराच काळ होत रहातो. झोपेच्या कमतरतेने शरीर आणि मेंदू हळूहळू कमजोर होऊ लागतो. तर मद्याचा परिणाम सर्वसाधारणपणे अस्थायी स्वरुपाचा असतो.

**मेंदूला सुरक्षित कसे ठेवाल?**

झोपेच्या कमीमुळे अनेक गंभीर त्रास सुरु होतात. त्यांना कमी करण्यासाठी काही उपाय देखील आहेत. तज्ज्ञांच्या मते रात्री ठराविक एकाच वेळेवर झोपणे आणि सकाळी ठराविक एकाच वेळी उठण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे शरीराचे जैविक घड्याळ योग्य होते.

रोज किमान ७ तास झोपण्याचा प्रयत्न करा.त्यामुळे शरीर आणि मेंदूला योग्य आराम मिळेल आणि मेंदूच्या पेशी योग्य प्रकारे काम करतील. शरीराला सवय लावण्यासाठी रात्री ९ ते सकाळी ४ पर्यंत झोपण्याची वेळ ठरवा. ही वेळ मेंदू आणि शरीरासाठी योग्य मानली जाते.

तज्ज्ञाच्या मते झोपेला प्राथमिकता दिल्याने केवळ थकवा दूर होत नाही तर मेंदू आणि शरीर बराच काळ कार्यरत रहाण्यासाठी हे मदतगार ठरते. चांगली झोप घेणे हे चांगल्या आरोग्याचे लक्षण मानले जाते. तज्ज्ञ या संदर्भात नेहमीच सल्ला देत असतात की पुरेशी झोप माणसासाठी का गरजेची असते. झोपेच्या अभावी अनेक आजारांना आमंत्रण मिळत असते.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### मागणे लई नाही..!

माँ दुर्गादेवी तुझ्या चरणी
आम्ही करितो याचना
सत्कार्याची आम्हा -
नित्य द्यावी प्रेरणा ..!

प्रेरणेने तुमच्या यावा
जगण्यास खरा अर्थ
निस्वार्थ घडो देशसेवा
जीवन व्हावे कृतार्थ ..!

भवभयहारीणी राहो तव
चरणीअढळ भाव भक्ति
जन्ममरणाच्या फेऱ्यातुन
जगत जननी देईजे मुक्ति ..!

# ॲमवे इंडिया ने न्यूट्रिलाईटच्या गुणांनी युक्त आर्टिस्ट्री स्किन न्यूट्रिशनची नेक्स्ट-जेन स्किनकेअर लॉन्च



**मुंबई, २५ सप्टेंबर :** आजकाल भारतात लोक अकाली वृद्धत्वाच्या समस्यांशी, प्रदूषणाच्या परिणामांशी, असमान रंग आणि खडबडीत त्वचेच्या त्रासांशी सामना करत आहेत. हे लक्षात घेऊन, ॲमवे इंडिया, जी आरोग्य आणि वेलनेस क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी आहे, हिने दोन नवीन स्किनकेअर प्रॉडक्ट्स लॉन्च केले आहेत आर्टिस्ट्री स्किन न्यूट्रिशन डिफायिंग सिरम आणि आर्टिस्ट्री स्किन न्यूट्रिशन करेक्टिंग सिरम. हे सिरम्स त्वचेवरील वृद्धत्वाची सुरुवातीची लक्षणे आणि घटक कमी करतात. हे नवीन सिरम्स आर्टिस्ट्री स्किन न्यूट्रिशनच्या हायड्रेटिंग, बॅलन्सिंग आणि रिन्यूइंग तसेच फर्मिंग रेंज वर आधारित आहेत, ज्यांना वेगवेगळ्या वयोगटात बदलणाऱ्या स्किनकेअरच्या गरजांचा विचार करून खास तयार करण्यात आले आहे.

लॉन्चच्या प्रसंगी ॲमवे इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक, रजनीश चोप्रा म्हणाले, भारतीय स्किनकेअर मार्केट झपाट्याने वाढत आहे, ज्याचे मुख्य कारण आहे ग्राहकांची वाढती जागरूकता, वाढते इनकम व खर्च करण्याची क्षमता आणि प्रीमियम व नैसर्गिक उत्पादनांचीची मागणी. आजकाल अधिकाधिक लोक त्वचेच्या आरोग्याला महत्त्व देऊ लागले आहेत. प्रत्यक्षात, ७० % शहरी ग्राहकांनी सांगितले आहे की आता ते स्किनकेअरच्या फायद्यांबद्दल आधीपेक्षा जास्त जागरूक आहेत. हा बदल दर्शवतो की लोक आता विचारपूर्वक आणि जागरूक होऊन स्किनकेअर उत्पादन निवडत आहेत. एका रिपोर्टनुसार, सुमारे ७१ % भारतीय ग्राहक अशी स्किनकेअर उत्पादने पसंत करतात जी वनस्पतींपासून बनवलेल्या नैसर्गिक घटकांपासून तयार केलेली असतात. ॲमवे इंडियासाठी हा एक उत्तम संधी आहे. आम्ही सखोल रिसर्च आणि परिणामांद्वारे ग्राहकांची बदलती पसंती समजतो, ज्यामुळे आम्हाला नवीन आणि उपयुक्त उत्पादने तयार करण्याची प्रेरणा मिळते. आर्टिस्ट्री स्किन न्यूट्रिशन डिफायिंग आणि करेक्टिंग सिरमचे लॉन्च आमच्या या संकल्पाचे प्रतिक आहे की आम्ही विज्ञान आणि निसर्गाच्या संयोगातून प्रभावी स्किनकेअर उत्पादने उपलब्ध करू. आम्ही उत्पादनाच्या इनोव्हेशनवर लक्ष केंद्रित करत राहू, जेणेकरून आधुनिक भारतीय ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करता येतील.

ॲमवे इंडियाच्या मुख्य विपणन अधिकारी अमृता असरानी यांच्या मते, आजचे ग्राहक अशी गुणवत्तापूर्ण उत्पादने शोधत आहेत जी आत्मविश्वास, सशक्तीकरण आणि एजलेस सौंदर्यासारख्या काळानुसार बदलणाऱ्या त्यांच्या विचारांशी सुसंगत असतील. ॲमवे इंडियाने हा बदल आर्टिस्ट्री स्किन न्यूट्रिशनच्या माध्यमातून स्वीकारला आहे ही आमची पुढील पिढीची स्किनकेअर रेंज आहे, जी न्यूट्रिलाईटच्या ९० वर्षांच्या बोटॅनिकल तज्ज्ञतेला आणि आर्टिस्ट्रीच्या ६० वर्षांच्या ॲडव्हान्स त्वचेच्या विज्ञानाला एकत्र आणते. हायड्रेटिंग, बॅलन्सिंग आणि रिन्यूइंग तसेच फर्मिंग रेंज आधीच टार्गेटेड स्किनकेअर रूटीनच्या गरजा पूर्ण करत आहे. आता नवीन आर्टिस्ट्री स्किन न्यूट्रिशन डिफायिंग आणि करेक्टिंग सिरम्सचे लॉन्च या रेंजला आणखी पुढे नेते, कारण ही सिरम्स विशेषतः त्वचेच्या आवश्यक रिबिल्ड पोषणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि त्वचेची संपूर्ण सुंदरता खुलवण्यासाठी तयार करण्यात आली आहेत. १६ वनस्पतींच्या अर्कांपासून आणि ॲडव्हान्स्ड त्वचेच्या विज्ञानापासून बनवलेली आमची डिफायिंग आणि करेक्टिंग सिरम्स, निर्देशानुसार वापरल्यावर त्वचेला स्पष्ट परिणाम देतात ज्यामुळे त्वचा अधिक तरुण, टाईट आणि निरोगी दिसते.



## लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज, हाऊस ऑफ लॉर्ड्स, वेस्टमिन्स्टर, लंडन येथे सन्मान मिळवणारी पहिली भारतीय मेडिकल डायग्नोस्टिक्स कंपनी

**मुंबई, २५ सप्टेंबर :** भारतातील सर्वात जलद गतीने वाढणाऱ्या विविध व्यवसाय समूहांपैकी एक, लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेड यांना लंडनच्या ऐतिहासिक हाऊस ऑफ लॉर्ड्स येथे इंडो-युरोपियन बिझनेस फोरम आयोजित विकसित भारत इन्व्हेस्टमेंट समिट २०२५ मध्ये प्रतिष्ठित इनोव्हेशन इन डायग्नोस्टिक डिव्हाइसेस पुरस्काराने गौरविण्यात आले.

हा ऐतिहासिक संमेलन सोहळा जागतिक नेते, धोरणकर्ते, गुंतवणूकदार व उद्योजक यांना एकत्र आणून भारत, युनायटेड किंगडम, युरोप व जगातील इतर भागांमध्ये भागीदारी व आर्थिक संबंध अधिक मजबूत करण्याची संधी उपलब्ध करून देतो. लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेड ही हा सन्मान मिळवणारी पहिली भारतीय मेडिकल डायग्नोस्टिक कंपनी ठरली. हा पुरस्कार कंपनीच्या मेडटेक, डायग्नोस्टिक्स आणि बायोकेमिस्ट्री क्षेत्रातील नाविन्यपूर्ण योगदानाबद्दल कंपनीच्या सहाय्यक उपकंपनी लॉर्ड्स मार्क मायक्रोबायोटेक चे सीईओ सुभोध गुप्ता यांनी स्वीकारला.

या संमेलनात प्रमुख नेते व धोरणकर्त्यांची उपस्थिती होती, ज्यात लॉर्ड डेविड इव्हान्स एमपी (यूके), मंत्री कानिष्का नारायण एमपी (यूके), मंत्री सीमा मल्होत्रा एमपी (यूके), विरेंद्र शर्मा (माजी खासदार, यूके), डॉ. नीरजा बिड़ला (संस्थापक व चेअरपर्सन, आदित्य बिड़ला एज्युकेशन ट्रस्ट), निहारिका हांडा (स्कान्झन लिमिटेड, बेंगळुरू, भारत), तेजेश कुमार कोडाली (माजी चेअरमन, ग्लोबल लिमिटेड व चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर, स्पेक्टेकल व्हेंचर्स लिमिटेड) आणि संदीप साजी यांचा समावेश होता.

या सन्मानाबद्दल बोलताना लॉर्ड्स मार्क मायक्रोबायोटेक चे सीईओ श्री. सुभोध गुप्ता म्हणाले, लंडनमध्ये इंडो-युरोपियन बिझनेस फोरमकडून मिळालेला हा सन्मान फक्त एक मैलाचा दगड नाही, तर आमच्या उद्दिष्टांची पुन:पुष्टी आहे. विज्ञान, विस्तार आणि सामाजिक परिणाम यांना एकत्र आणणे ही आमची बांधिलकी आहे. सिकल सेल, रेनालिक्स आणि कव डीएनए यांच्या माध्यमातूनजे आशियातील सर्वात मोठ्या आगामी मेडिकल डिव्हाइस व बायोकेमिस्ट्री सुविधांच्या पाठबळावर आधारित आहेतआम्ही आरोग्यसेवेचे भविष्य घडवत आहोत. आमचे ध्येय भारताला अभिमान वाटावा असे कार्य करणे आणि पंतप्रधानांच्या मेक इन इंडिया व आत्मनिर्भर भारत या दूरदृष्टीला आकार देणे आहेभारतीय नावीन्य जागतिक पातळीवर नेणे.

## ओला इलेक्ट्रिकतर्फे ओला सेलिब्रेट्स इंडिया मोहीमेचा शुभारंभ

**नागपूर, २५ सप्टेंबर :** भारतातील सर्वाधिक मोठी ईव्ही कंपनी असलेल्या ओला इलेक्ट्रिकने सणासुदीच्या हंगामापूर्वी ओला सेलिब्रेट्स इंडिया या मोहिमेची आज घोषणा केली आहे. या मोहिमेंतर्गत कंपनी २३ सप्टेंबरपासून ९ दिवसांसाठी त्यांच्या एस वन स्कूटर रोडस्टर एक्स या मोटरसायकलसाठी अविश्वसनीय किमतीसह ओला मुहूर्त महोत्सव सादर करत आहे. या दुचाकींसाठीच्या किंमती ४९,९९९ रुपयांपासून सुरू होणार आहे. ओला मुहूर्त महोत्सवाअंतर्गत, ग्राहकांना आता दररोज ओलाच्या स्कूटर आणि मोटारसायकलींना अविश्वसनीय किंमतीत खरेदी करण्याची संधी आहे. मुहूर्त महोत्सवाअंतर्गत, एस वन एक्स २ किलोवॅट आणि रोडस्टर एक्स २.५ किलोवॅटची किंमत ४९,९९९ रुपये राहणार आहे. एस वन प्रो + ५.२ किलोवॅट आणि रोडस्टर एक्स + ९.१ किलोवॅटची किंमत ९९,९९९ रुपये राहणार आहे. एस वन प्रो + ५.२ किलोवॅट आणि रोडस्टर एक्स + ९.१ किलोवॅट या दोन्ही गाड्यांमध्ये ४६८० भारत सेल बॅटरी पॅक राहणार आहे.

ओला इलेक्ट्रिक सध्या एस वन स्कूटर आणि रोडस्टर एक्स मोटरसायकलींचा विस्तृत पोर्टफोलिओ ग्राहकांना सादर करते. प्रीमियम एस वन जन ३री पोर्टफोलिओमध्ये ५.२ किलोवॅट आणि ४ किलोवॅट श्रेणीमध्ये एस वन प्रो + आणि ४ किलोवॅट आणि ३ किलोवॅट श्रेणीमध्ये एस वन प्रो वाहने समाविष्ट आहेत. त्यांची किंमत अनुक्रमे १,६९,९९९ रुपये, १,५९,९९९ रुपये, १,३७,९९९ रुपये आणि १,२०,९९९ रुपये आहे. कंपनीच्या मोठ्या बाजारपेठेतील ऑफरमध्ये जनरेशन ३री एस वन एक्स+ (४ किलोवॅट), आणि जनरेशन ३री एस वन एक्स (२ किलोवॅट, ३ किलोवॅट आणि ४ किलोवॅट) यांचा समावेश होत आहे आणि त्यांची किंमत अनुक्रमे १,११,९९९ रुपये, १,०३,९९९ रुपये, ९४,९९९ रुपये आणि ८१,९९९ रुपये आहे. ओला इलेक्ट्रिक त्यांच्या जेन २ एस१ प्रो आणि एस१ एक्स (४ किलोवॅट तास) स्कूटर्सची किरकोळ विक्री देखील करत आहे आणि तिची किंमत अनुक्रमे १,१८,९९९ रुपये आणि ९७,९९९ रुपये आहे.

कंपनीच्या रोडस्टर मोटरसायकल पोर्टफोलिओमध्ये रोडस्टर एक्स + (४.५ किलोवॅट), आणि रोडस्टर एक्स (२.५ किलोवॅट, ३.५ किलोवॅट आणि ४.५ किलोवॅट) यांचा समावेश आहे आमि त्यांची किंमत अनुक्रमे १,२७,४९९ रुपये, १,२४,९९९ रुपये, १,०९,९९९ रुपये आणि ९९,९९९ रुपये आहे.

## नागपूर – गोवा शक्तिपीठ द्रुतगती मार्ग : भक्ती, विकास आणि पर्यटनाचा नवा अध्याय

**वर्धा, २५ सप्टेंबर :** महाराष्ट्राच्या श्रद्धा, संस्कृती आणि प्रगतीचा संगम म्हणजे नागपूर - गोवा शक्तिपीठ द्रुतगती मार्ग. हा महामार्ग केवळ रस्ते बांधणीचा उपक्रम नसून राज्यातील धार्मिक पर्यटन, ग्रामीण अर्थव्यवस्था, औद्योगिक विकास आणि रोजगारनिर्मिती यांना एकत्र जोडणारा सर्वसमावेशक विकासमार्ग आहे. नागपूरपासून गोव्यापर्यंत एकूण ८०२ किलोमीटरचा हा द्रुतगती मार्ग राज्यातील १२ जिल्ह्यांतून जात, शेकडो गावांना जोडतो.

माहूरच्या रेणुका माता शक्तिपीठापासून कोल्हापूरच्या अंबाबाई मंदिरापर्यंत, पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापासून गणपतीपुळे आणि गोव्याच्या सीमेवरील देवस्थानांपर्यंत या महामार्गामुळे भाविकांना एका अखंड प्रवासात सर्व तीर्थक्षेत्रांचा लाभ घेता येईल. याचबरोबर, मार्गावरील पूल, बोगदे, जंक्शन्स आणि आधुनिक सुविधा ग्रामीण व शहरी भागातील वाहतूक, व्यापार आणि पर्यटनाला नवा वेग देतील. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी श्रद्धा आणि विकासाचा संगम घडवणारा हा द्रुतगती मार्ग येत्या काही वर्षांत राज्याच्या पायाभूत सुविधांच्या इतिहासात एक मैलाचा दगड ठरणार आहे.

या भक्तिस्थळांना जोडणारा मार्ग: सेवाग्राम गांधी आश्रम (वर्धा), माहूर रेणुका माता शक्तिपीठ, औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग, परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग, अंबेजोगाई योगेश्वरी देवी, तुळजापूर तुळजाभवानी, पंढरपूर विठोबा-रुक्मिणी मंदिर, अक्कलकोट स्वामी समर्थ, औदुंबर दत्त, नरसोबाची वाडी दत्त, कोल्हापूर श्री महालक्ष्मी (अंबाबाई), बाळूमामा मंदिर (कोल्हापूर परिसर), गणपतीपुळे गणपती, रेणुची गणपती (सिंधुदुर्ग), पायरी देवी (गोवा सीमेवर), तसेच हजूर साहिब गुरुद्वारा (नांदेड).

धार्मिक पर्यटन व सर्वांगीण विकास : हा महामार्ग श्रद्धा आणि प्रगती यांचा संगम साधणारा ठरेल. भाविकांना विविध तीर्थक्षेत्रांचे एकाच मार्गावरून दर्शन घेण्याची अनोखी संधी मिळेल. मंदिर परिसरातील हॉटेल व्यवसाय, होम-स्टे, हस्तकला, ग्रामीण पर्यटन, ट्रॅव्हल एजन्सीज यांना चालना मिळेल. तसेच कृषी, औद्योगिक व लॉजिस्टिक क्षेत्रांनाही थेट फायदा होईल.

सध्याची प्रगती : द्रुतगती मार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया, रस्त्याचे ट्रेसिंग, पूल व बोगद्यांसाठी पर्यावरणीय मंजुरी, तसेच काही ठिकाणी जमीन मोजणीची प्रक्रिया सुरू आहे.

## पर्पल स्टाईल लॅब्जतर्फे आयपीओसाठी सेबीकडे डीआरएचपी सादर

**मुंबई, २५ सप्टेंबर :** पर्नियाज पॉप-अप शॉपची पॅरेंट कंपनी आणि भारतातील सर्वात मोठ्या मल्टी-ब्रँड लक्झरी फॅशन प्लॅटफॉर्मपैकी एक पर्पल स्टाईल लॅब्ज (पीएसएल) कंपनीने प्राथमिक समभाग विक्री (आयपीओ) साठी सेबीकडे ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) सादर केले आहे. या ऑफरमध्ये प्रत्येकी १० रु. दर्शनी मूल्याचे एकूण ६६० कोटी रु. पर्यंतच्या इक्विटी शेअर्सचे फ्रेश इश्यू समाविष्ट आहे.

पर्पल स्टाईल लॅब्ज (पीएसएल किंवा कंपनी) आर्थिक वर्ष २०२४ मध्ये महसुलानुसार भारतातील सर्वात मोठ्या आणि सर्वात वेगाने वाढणाऱ्या मल्टी-ब्रँड लक्झरी फॅशन प्लॅटफॉर्मपैकी एक आहे. महिलांची वस्त्रप्रावरणे, पुरुषांचे पोषाख, फाईन ज्वेलरी, फॅशन ज्वेलरी, मुलांचे कपडे आणि ॲक्सेसरीज अशा २११,७२७ पेक्षा जास्त एसकेयू च्या पोर्टफोलिओसह, पीएसएल १,३९२ पेक्षा जास्त ॲक्टिव्ह डिझायनर ब्रँड्सची उत्पादने सादर करते. डिझायनर्ससोबतच्या विस्तृत नेटवर्कमुळे कंपनीला स्पर्धात्मक फायदा मिळतो. ग्राहकांना अतुलनीय असे पर्याय उपलब्ध होतात आणि डिझायनर्सना अद्वितीय दृश्यमानता, जागतिक पोहोच आणि किंमत स्थैर्य मिळते.

इंडस्ट्री डेटा पीएसएल च्या अतुलनीय वैशिष्ट्यपूर्ण वाढीच्या प्रवासावर प्रकाश टाकतो. पर्नियाज पॉप-अप शॉपने आर्थिक वर्ष २० मध्ये फक्त ४५ कोटी रु. च्या महसुलापासून आर्थिक वर्ष २४ मध्ये ५०८ कोटी रु. पेक्षा जास्त महसुलापर्यंत वाढ केली. त्यामुळे लक्झरी आणि ब्रिज-टू-लक्झरी कंपन्यांमध्ये ८३% सीएजीआर सह सर्वात वेगवान वाढीपैकी एक म्हणून कंपनीची नोंद झाली. ही वाढ लुई व्हिटॉन, गुच्ची सारख्या जागतिक ब्रँड्स आणि सब्यसाची, आझा फॅशन्स सारख्या देशांतर्गत स्पर्धकांपेक्षा जास्त आहे. या मजबूत वाढीमुळे पीएसएल ने भारताच्या लक्झरी रिटेल सेक्टरमध्ये आपले अग्रस्थान मजबूत केले आहे.

कंपनीने आर्थिक वर्ष २५ मध्ये ऑनलाइन चॅनेल्स आणि युके मधील महत्त्वपूर्ण एक्सपिरियन्स सेंटर द्वारे १००हून अधिक देशांतील ग्राहकांना सेवा देत मजबूत आणि वाढणारे आंतरराष्ट्रीय स्थान प्रस्थापित केले आहे. यूएसए, युके, मध्य पूर्व आणि कॅनडा सारख्या बाजारपेठांमध्ये कंपनीने महत्त्वपूर्ण स्थान निर्माण केले असून आर्थिक वर्ष २५ मध्ये आंतरराष्ट्रीय विक्री जीएमव्हीच्या २८.३८% पेक्षा जास्त योगदान देत होती. भारतीय डिझायनर वेअरच्या जागतिक पातळीवर पोहोचण्यातील अंतर भरून काढून, पीएसएल ने स्वतःचे भारतीय लक्झरी फॅशनसाठी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये गो टू डेस्टिनेशन म्हणून स्थान निर्माण केले आहे.

## अदाणी समूहाचे चेअरमन गौतम अदाणी यांचा भागधारकांना संदेश



**मुंबई, २५ सप्टेंबर :** २४ जानेवारी २०२३ ची सकाळ अशी होती, जी कधी विसरता येणार नाही. त्या दिवसाच्या बातम्या फक्त दलाल स्ट्रीटपुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत, तर त्यांनी संपूर्ण देश आणि जगालाही हादरवून टाकले. हिंडनबर्गचा अहवाल हा फक्त अदाणी समूहावर प्रश्नचिन्ह नव्हता, तर भारतीय कंपन्यांच्या त्या धाडसावरही आघात होता, ज्यांच्याकडे जागतिक स्तरावर मोठे स्वप्न पाहण्याची क्षमता आहे.

आमच्यासाठी तो काळ एक कसोटीचा होता, ज्यात आमची ताकद आमच्या प्रशासनापासून आमच्या ध्येयांपर्यंत प्रत्येक स्तरावर तपासली गेली आणि इतकेच नव्हे तर या विचारापर्यंत की भारतीय कंपन्या खरोखर जगाचे नेतृत्व करू शकतात का.

परंतु गेल्या आठवड्यात सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाने (सेबी) आमच्यावरील आरोप निराधार असल्याचा स्पष्ट आणि अंतिम निर्णय दिला

शेवटी सत्य समोर आले आणि जसे आम्ही नेहमी म्हटले आहे - सत्यमेव जयते.

आम्हाला खाली खेचण्यासाठी जे केले गेले होते त्यामुळे आमचा पाया मजबूत झाला.

ही फक्त एक नियामक मंजुरी नाही, तर याचा अर्थ असा आहे की आमची कंपनी नेहमी पारदर्शकता, प्रशासन आणि स्पष्ट ध्येय यांसह काम करत आली आहे. आमची खरी ताकद केवळ शब्दांत नाही, तर या काळात दाखवलेल्या कामगिरीत आहे.

एबिट्डा वाढ (एबीआयटीडीए): आमच्या पोर्टफोलिओचा एबिट्डा आर्थिक वर्ष २०२३ मध्ये ५७,२०५ कोटी होता, जो आर्थिक वर्ष २०२५ मध्ये वाढून ८९,८०६ कोटींवर पोहोचला. म्हणजेच ही वाढ ३२,६०१ कोटींची आहे, जी सुमारे ५७% वाढ आणि दोन वर्षांत २५% सीएजीआर आहे.

मालमत्तेचा विस्तार: आमचा एकूण निधी आर्थिक वर्ष २०२३ मध्ये ४,१२,३१८ कोटींवरून वाढून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ६,०९,१३३ कोटींवर गेला. ही अंदाजे २ लाख कोटींची वाढ आहे आणि फक्त दोन वर्षांत ४८% वाढ झाली आहे.

## नेस्ले इंडिया कडून जीएसटी दरकपातीचा लाभ थेट ग्राहकांना देण्याची घोषणा

**मुंबई, २५ सप्टेंबर :** नेस्ले इंडियाने अलीकडेच भारत सरकारने जाहीर केलेल्या गुड्स अँड सर्व्हिस टॅक्स (जीएसटी) दरातील बदलाचे स्वागत केले आहे. कंपनीने सांगितले आहे की हा लाभ २२ सप्टेंबर २०२५ पासून थेट ग्राहकांना दिला जाईल.

मनीष तिवारी, चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, नेस्ले इंडिया म्हणाले, जीएसटी दर कमी होणे हे भारतातील ग्राहकांसाठी एक सकारात्मक पाऊल आहे. यामुळे खप वाढेल आणि अर्थव्यवस्थेलाही गती मिळेल. नेस्ले गेली ११३ वर्षांपासून भारताचा अविभाज्य भाग आहे आणि आमच्यासाठी ग्राहक नेहमीच सर्वात महत्त्वाचे राहिले आहेत. ग्राहकांची सेवा करणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे आणि पुढेही त्यांच्या हितासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू.

पारदर्शकता राखण्यासाठी नेस्ले इंडियाने ही माहिती राष्ट्रीय व प्रादेशिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केली आहे. तसेच हा लाभ घाऊक विक्रेते, वितरक आणि किरकोळ विक्रेते यांच्यापर्यंतही पोहोचवला आहे.

## स्कोडा ऑटो ने स्कोडा ऑक्टाव्हिया आरएस ची प्री-बुकिंग होणार सुरू

**नागपूर, २५ सप्टेंबर :** स्कोडा ऑटो इंडिया ऑक्टाव्हिया आरएस या लेजेंड गाडीच्या पुनरागमनासह ड्रायव्हिंग प्रेमींच्या उत्साहाला पुन्हा जागृत करण्यासाठी सज्ज आहे. नवीन ऑक्टाव्हिया आरएस चे प्री-बुकिंग ६ ऑक्टोबर २०२५ रोजी सुरू होईल, जी स्कोडा ऑटो च्या सर्वात प्रतिष्ठित कामगिरी करणाऱ्या सेडानचे पुनरागमन आहे. हे ग्लोबल आयकॉन भारतात मर्यादित प्रमाणात पूर्णपणे बिल्ट युनिट (एफबीयू) म्हणून उपलब्ध असेल. या लाँचसह, स्कोडा ऑटो इंडिया अतुलनीय ड्रायव्हिंग डायनॅमिक्स, धाडसी डिझाइन आणि निर्विवाद आरएस स्पिरिट देण्याचे वचन देते, हे सर्व शुद्धतेच्या चाहत्यांसाठी बनवलेल्या खऱ्या कामगिरीच्या मशीनमध्ये.




ऑक्टाव्हिया आरएस च्या पुनरागमनाबद्दल स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले, आज, मला हे जाहीर करताना अभिमान वाटतो की आम्ही भारतात नवीन ऑक्टाव्हिया आरएस लाँच करून, आम्ही फक्त एक कार परत आणत नाही तर आम्ही एक भावना परत आणत आहोत. कामगिरी, आकांक्षा आणि ड्रायव्हिंगच्या खऱ्या भावनेला परिभाषित करणारी एक आख्यायिका.

आरएस बॅज

आरएस बॅज, ज्याचा अर्थ रॅली स्पोर्ट आहे, तो पिढ्यानपिढ्या कामगिरी, अचूकता आणि ड्रायव्हिंग थ्रिलचे प्रतीक आहे. स्कोडा च्या रॅलींग यशातून जन्मलेले, आरएस मॉडेल्स रस्त्यावर मोटरस्पोर्ट-प्रेरित अभियांत्रिकीचे प्रतीक बनले आहेत.

भारतात, ऑक्टाव्हिया आरएस पहिल्यांदा २००४ मध्ये देशातील पहिली टर्बोचार्ज्ड पेट्रोल इंजिन पॅसेंजर कार म्हणून आली आणि उत्साही लोकांमध्ये लगेचच एक पंथ निर्माण झाला. तेव्हापासून, आरएसच्या प्रत्येक पिढीने जवळजवळ एक विलक्षण आकर्षण निर्माण केले आहे, ज्यामध्ये युरोपियन अभियांत्रिकी रोजच्या बहुमुखी प्रतिभा आणि ड्रायव्हिंग उत्साहाचे मिश्रण आहे.

# शब्दकोडे क्रमांक २२२४



**आडवे शब्द :-**
१) संगीतातील एक राग
७) कावळा
१०) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
१२) भविष्यकथनाचा एक प्रकार
१३) एक आदर्श राज्यपद्धती
१४) बारीकसारीक
१६) उद्याच्या नंतरचा दिवस
१७) सरहद्द
१८) अहंकार
१९) मीठ
२१) एकरूपता
२४) उत्सव
२५) स्तुती करणारा
२६) भाव
२८) आरामदायी
३०) युद्धासाठी उत्सुक झालेला
३३) काम करतोय हे दाखविण्यासाठी केलेली सततची हालचाल
३४) पुरुष
३६) जादूचे प्रयोग करणारा
३८) निर्बुद्ध
३९) विजयादशमी
४१) लाकूड कापण्याचे हत्यार
४४) पर्ण
४५) कपाळभर लावलेले कुंकू
४६) मच्छर
४७) श्रीकृष्णाचे घराणे
४८) मनाचा ओढा
४९) पुष्कळ
५०) लाकडी जिना
५२) रुक्ष, कडक उन
५५) चावट
५६) सरस्वती
५८) हवा, वैताग
५९) हात पुसण्याचे वस्त्र
६२) समशेर
६५) वल्लरी
६७) हिंमत
६८) गंध
७०) हलकी धान्ये
७२) अश्रुंनी डोळे भरणे
७४) निरुपाय
७५) पोते
७७) दात
७८) वाकलेला, नम्र
७९) पाऊस
८०) मच्छर
८१) नवाकोरा

**उभे शब्द :-**
१) व्याज आकारणीतील द.सा.द.शे.
२) दारूचा एक प्रकार
३) बाल्यावस्था
४) तुरुंग
५) वाकण्याची क्रिया
६) गाढ (झोप)
८) कुराणातील पवित्र वचने
९) आपले राष्ट्रगीत
१०) प्रचंड
११) मध्यम प्रतीचा
१५) सगळे १७) जानकी
२०) बिना फोडणीची आमटी
२२) नंतर
२३) बातमी
२४) सरळ लांब वासा
२५) वजन, बोजा
२७) प्रामाणिक
२८) पूजेच्या वेळी ओंजळीतील पाणी प्राशन करणे
२९) एकत्रित धमन्या
३१) पायविहीर
३२) भूपती
३३) आसाममधील एक जमात
३५) प्रचंड
३७) खूप लांब अंतरावर
४०) सूट
४२) टोळीचा प्रमुख
४३) सिद्ध
४४) मेणा
४५) माजलेला
४८) हाताचा तळवा
५१) उणीव
५३) मावा
५४) वृक्ष
५६) हिंदुंची एक वर्षगणना पद्धत
५७) बाज विणण्याची सुती पट्टी
६०) मुंबईतील एक उपनगर
६१) मध
६३) बडबड चुरुचुरू
६४) गावाखालची जमीन
६६) मारणे, चोपणे
६७) कोथिंबीरीचे बी
६९) सदा
७१) रंग बदलणारा प्राणी
७३) अंड्यातील पिवळा भाग
७६) सेवक
७७) निमग्न, रममाण

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## गरबा मला फारच आवडतो आणि गरबा शिकण्याचा मी कसून प्रयत्न करते : आशी सिंह

**मुंबई, २५ सप्टेंबर :** सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... ही मालिका प्रेक्षकांसमोर प्रेम, भावना आणि नात्यांची एक ताजी टवटवीत गोष्ट घेऊन आली आहे. या मालिकेत आशी सिंह कैरी शर्माची भूमिका करत आहे. कैरी एक उत्साही, संवेदनशील आणि आजच्या जमान्याची तरुणी आहे. तिच्या आयुष्यात प्रेमाची गुंतागुंत आहे, पण त्याचबरोबर दैनंदिन जीवनातील साधेपणा आणि मोहकता दिसते. आपल्या अभिनय कौशल्याने आशीने कैरीची भूमिका जिवंत केली आहे. कैरी एक अशी व्यक्तिरेखा बनली आहे, जी प्रेक्षकांना चटकन आपलीशी वाटते.

सध्या सर्वत्र नवरात्रीचा आनंदोत्सव सुरू आहे. आशी सिंह सांगत आहे, या पर्वाचे तिच्या आयुष्यात काय महत्त्व आहे. या आनंदसोहळ्याशी ती कशा प्रकारे संलग्न आहे, हे ती सांगते. तिच्या साठी, नवरात्रीचा उत्सव म्हणजे तिचे मूळ आणि जिवंत परंपरांचा सुंदर सुमेळ आहे.

नवरात्रीच्या आनंदोत्सवाविषयी आशी म्हणते, मी उत्तर भारतातून आले आहे आणि तिकडे नवरात्रीचा संबंध देवीच्या जगराताशी, देवीच्या पूजेशी आणि तत्सम विधींशी आहे. पण मला पहिल्यापासून गरबा आणि दांडियाचे खूप आकर्षण होते. मी मुंबईत आल्यानंतर गरबा शिकण्यासाठी मी खूप परिश्रम घेतले. मी अजूनही गरबा शिकतेच आहे, कारण वर्षातून फक्त नऊ दिवस गरबा केला जातो. त्यामुळे ते शिकणे तितकेसे सोपे नाही. नवरात्रीत मुंबईचे वातावरण अद्भुत असते. आसपास पाहिले की, सगळ्या लोकांनी एकाच रंगाचे कपडे घातलेले दिसतात. नवरात्रीच्या नऊ दिवसांचे ठराविक नऊ रंग सर्वजण पाळतात. मला ही संकल्पना आवडते. देवीची पूजा आणि उपवास मी पहिल्यापासून करत आले आहे. संध्याकाळी मी माझ्या कुटुंबासमवेत, कधी कधी मित्र-मैत्रिणींसोबत गरबा ग्राउंडवर जाते, गरबा खेळायला किंवा गरबा बघायला! ते वातावरणच इतके उत्फुल्ल आणि सळसळते असते!


## आज का अंदाज

शुक्रवार २६ सप्टेंबर २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| २८० | ५७१ | २६६ | १६० | १२० | १६८ | १२३ | १८० |
| ३७० | ६७८ | १४९ | ३५९ | २४७ | ३४८ | २६८ | ३७९ |
| ४६० | ४७० | ३४७ | ४४९ | ३०० | २६७ | ३६७ | २७० |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | ३२ | ५२ | ६१ | ९१ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | ३० | ५० | ६४ | ९४ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | ३८ | ५८ | ६७ | ९७ |

**२६ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | ५४ | ६१ | ९१ |
| २७ | ५७ | ६८ | ९८ |
| २० | ५० | ६३ | ९३ |
| ६७९ | ३६६ | ३६७ | १३५ |
| ४९९ | ४४७ | २४० | ३६० |
| ३३६ | २५८ | १५० | ५६८ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** कामावर बढती मिळण्याची शक्यता आहे आणि तुमचा बॉस तुमच्या कामाने खूप खूश होईल. तुम्ही सर्जनशील गोष्टींकडे अधिक कल ठेवाल. तुमचे व्यावसायिक कौशल्य धारदार होईल.

**वृषभ :** तुम्हाला सरकारी बाबींमध्ये अनुभवी व्यक्तीकडून सल्ला मिळेल, ज्यामुळे तुमचे काम सोपे होईल. जुना मित्र तुम्हाला फोन करून आश्चर्यचकित करेल. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा.

**मिथुन :** आज तुम्हाला तुमच्या प्रिय व्यक्तीकडून काही चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. तुम्ही तुमचे घरातील काम पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल. तुमचा जोडीदार तुमच्या सकारात्मक दृष्टिकोनाने खूश होईल.

**कर्क :** विद्यार्थ्यांना त्यांच्या वरिष्ठांकडून पाठिंबा मिळेल. घरातील महत्त्वाच्या कागदपत्रांची विशेष काळजी घ्या जेणेकरून गरज पडल्यास ते तुम्हाला सहज सापडतील. एखादा जुना मित्र तुम्हाला अचानक भेटेल.

**सिंह :** तुमचे कुटुंब एखाद्या महत्त्वाच्या गोष्टीवर सहमत होईल. आज तुमची खूप प्रगती होईल. आज तुम्ही सामाजिक कार्यात सक्रियपणे सहभागी व्हाल. कुटुंबासह धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन कराल.

**कन्या :** व्यापारात अपेक्षेपेक्षा जास्त फायदा होईल. या राशीचे नवविवाहित जोडपे अशा विषयावर चर्चा करतील ज्यामुळे त्यांचे नाते आणखी गोड होईल. आज आर्थिक व्यवहारात काळजी घ्या.

**तुळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी एक अद्भुत दिवस असणार आहे. तुम्हाला दिवसभर ताजेतवाने वाटेल. सकारात्मक ऊर्जा तुमच्याभोवती असेल. तुम्ही मोठ्या व्यावसायिक गटासोबत भागीदारी कराल.

**वृश्चिक :** कामाच्या ठिकाणी तुम्हाला तुमच्या सहकाजयांकडून पाठिंबा मिळेल आणि तुमचे कनिष्ठ तुमच्याकडून शिकण्याची ईच्छा बाळगतील काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

**धनु :** आज तुम्हाला तुमच्या वडिलांकडून प्रेरणा मिळेल. आज तुम्ही जे काही काम हाती घ्याल ते यशस्वी होईल. तुमचे आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले राहील. तुमच्या व्यवसायाचा विस्तार होऊ शकेल.

**मकर :** आज विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु त्यांना त्यांच्या अभ्यासात अधिक मेहनत घेण्याची आवश्यकता आहे. तुम्ही कुटुंबासोबत वेळ घालवाल, ज्यामुळे आनंददायी वातावरण निर्माण होईल.

**कुंभ :** तुमचा सामाजिक दर्जा वाढेल. सगळे तुमचं कौतुक करतील. नातेवाईकाकडून मदत मिळेल. तुम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त आर्थिक फायदा होण्याची शक्यता आहे.

**मीन :** आज, एखाद्या अनोळखी व्यक्तीच्या मदतीने, तुमचे काम पूर्ण होईल आणि तुम्ही आनंदी व्हाल. या राशीच्या जन्माच्या जे लोक केमिस्टच्या दुकानात काम करतात त्यांना चांगला नफा मिळेल.

# अल्पवयीन मुलीच्या मृत्यूप्रकरणी ढाणकी शहरामध्ये कडकडीत बंद

■ महासागर प्रतिनिधी
उमरखेड , दि. २५ :

ढाणकी शहरातील अल्पवयीन मुलीवर खासगी शिकवणी वर्ग चालवणाऱ्या शिक्षकाने अत्याचार करत गर्भपाताच्या गोळ्या दिल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी दि. २२ सप्टेंबर रोजी उघडकीस आली. या घटनेचे शहरात तीव्र पडसाद उमटले. आरोपी संदेश गुंडेकर याला बीटरगाव पोलिसांनी तत्काळ अटक केली. तसेच शहरातील व्यापाऱ्यांच्या वतीने घटनेचा निषेध करण्यासाठी कडकडीत बंद पाळण्यात आला होता.



सर्व प्रतिष्ठाने सकाळपासूनच व्यापाऱ्यांनी बंद ठेवली होती. त्यामुळे शहरात एक प्रकारे तणावपूर्व शांतता होती. सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शहरातील नागरिक एकत्र जमले आणि सर्वप्रथम त्या अल्पवयीन मुलीला श्रद्धांजली वाहण्यात आली. आरोपीला तत्काळ फाशीची शिक्षा व्हावी, अशी एक मुखाने मागणी नागरिकांनी केली. शिक्षकी पेशा हा पवित्र मानला जातो. या पेशाला काळीमा फासण्याचे काम संदेश गुंडेकर यांनी केले. अशा घटना पुन्हा घडू यासाठी सुद्धा आता पालक वर्गाने जागरूक राहणे गरजेचे झालेले असल्याचे मत उपस्थित नागरिकांनी व्यक्त केले. झालेली घटना ही अत्यंत निंदनीय असून संबंधित आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा मिळावी व हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टामध्ये चालवण्यात यावे अशी नागरिकांची मागणी आहे.

यावेळी आमदार किसनराव वानखेडे, नितीन भूतडा, बाळू पाटील चंद्रे, खाजा भाई, आनंदराव चंद्रे, दत्तदिगंबर वानखेडे,सादिक शेख, प्रशांत विनकरे, रोहित बर्मा, संबोधी गायकवाड, अमोल तुपेकर,प्रवीण पाटील मीराशे, सै.माजीद,सूर्यकांता वासमवार, शिवाजी फाळके, महेश पिंपरवार, अनिल येरावार आदी उपस्थित होते.

# विधानसभेच्या राहिलेल्या मतदार यादीवरून करणार यादी तयार

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. २५ :

जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने शासकीय घडामोडी या पंधरा दिवसात वेगाने घडण्याची शक्यता आहे. निवडणूक विभागाने ठरवलेली विधानसभेसाठी राहिलेली जुलै महिन्यापर्यंतची मतदार यादी ग्राह्य धरली आहे. ऑक्टोबर महिन्यात कोणत्या गटात व गणात किती मतदार संख्या व बूथ आहेत. याची स्पष्टता होणार आहे. दरम्यान गट, गण व पंचायत समिती सभापती पदांचे आरक्षणही ऑक्टोबर महिन्यातच काढण्यात येणार असून त्यानंतर राजकीय घडामोडींना वेग येणार आहे. २०२२ साली होणारी निवडणूक तब्बल तीन वर्षानंतर होत असल्याने सध्या राजकीय वातावरणात जोश पसरला असून स्थानिक कार्यकर्ते व नेते कामाला लागले आहे. मात्र आरक्षणाचा तिढा सुटत नाही तोपर्यंत मात्र होश ठेऊन



काम करणे सुरु झाले आहे. २०२२ मध्य काढलेले आरक्षण आता चक्रानुक्रमानुसार काढण्यात येणार असल्याने नव्याने कोणती जागा कोणत्या प्रवर्गाला सुटणार याचा अभ्यास करण्यात नेते मंडळी गुंतले आहे. ही गुंतागुंत काही दिवसातच सुटणार आहे. शक्यता आहे दसऱ्यानंतर आरक्षणाची तारीख निश्चित होऊ शकते. हे आरक्षण जिल्हा पातळीवरच काढल्या जाणार आहे. या सोबतच पंचायत समितीच्या सभापती पदाचेही आरक्षण काढण्यात येणार आहे. एक गट व दोन गण वाढले २०२२ मध्ये ६५ गट व १३० गण झाले होते , तब्बल पाच मतदार संघ वाढले होते. मात्र निवडणुका झाल्या नाही व नव्याने गट व गण काढण्यात आले. त्यामध्ये एक गट व दोन गणांची वाढ झाली आहे. ही वाढ कोणाच्या पथ्थ्यावर पडणार आहे. हे अजूनतरी स्पष्ट होऊ शकत नाही. नागरिकांना हरकती व तक्रारी नोंदवण्याची संधी मतदार यादीत मृतांच्या नावाने मतदान करण्यात आले, बोगस मतदार झाले. अशी ओरड सध्या सुरु आहे. या मतदार यादीवर आक्षेप घेण्याची व मृताचे नाव मतदार यादीतून काढण्याची हीच संधी आहे. निवडणुक विभागानेही त्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. मात्र आजपर्यंत बीएलओ हा कधी कोणाच्या घरीच पोहचला नसल्याने हे मतदान आजही तसेच कायम असल्याने त्याचा आधार बोगस मतदान करण्यासाठी व दबावाचा वापर करुन होतो.

# जगदंबा देवी संस्थानमध्ये नवरात्रीचा अखंड जागर

### मंदिर परिसरातच महिला व पुरुष भाविकांचे नऊ दिवस वास्तव्य

■ महासागर प्रतिनिधी
मेहकर , दि. २५ :



घटस्थापना झाल्यापासून ते घटाचे विसर्जन होईपर्यंत रात्रंदिवस जगदंबा मातेचा जागर करण्यासाठी अंजनी खुर्द येथील जगदंबा देवी संस्थानमध्ये जवळपास ४० महिला व पुरुष भाविकांनी उपस्थिती लावली आहे. अंजनी खुर्द गाव लोणार तालुक्यातील नागपूर -छत्रपती संभाजीनगर राज्य महामार्गावर वसलेले आहे. येथील नवसाला पावणारी देवी म्हणून परिसरात प्रसिद्ध असलेल्या जगदंबा देवी संस्थानमध्ये दि. २२ सप्टेंबर रोजी घटस्थापना झाली. त्या रात्रीपासून अंजनी खुर्द आणि परिसरातील महिला व पुरुष भाविक मंदिर परिसरातच वास्तव्यास आहेत. नऊ दिवस कोणीही घरी जाणार नाही. गावात ही परंपरा शेकडो वर्षांपासून सुरू आहे. या सोहळ्यात दररोज सकाळी व सायंकाळी जगदंबा देवीची आरती आणि भागवत कथेचे वाचन केले जात आहे. याशिवाय विविध धार्मिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत. तसेच अनेक नागरिकांकडून येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दररोज उपवासाच्या पदार्थांचे वाटप करण्यात येत आहे. जगदंबा देवी संस्थान हे नागपूर - छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असल्यामुळे देवीच्या दर्शनासाठी दररोज भाविकांची मांदियाळी असते. नऊ दिवस चालणाऱ्या या महोत्सवाची सांगता महाप्रसादाने होणार आहे. श्रद्धा आणि महत्त्व अंजनी खुर्द येथील जगदंबा देवी तिच्या भक्तांना मनोकामना पूर्ण करणारी देवी म्हणून ओळखली जाते. त्यामुळे येथे मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात.

# आयएएस झालेल्या बुलडाण्यातील लेकीचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी, बुलडाणा, दि. २५ : पद मिळवणे सोपे आहे. पण त्या पदावर प्रामाणिकपणे व कर्तव्यनिष्ठेने काम करणे कठीण आहे. प्रशासकीय कामात नैतिकता आणण्याची जबाबदारी सगळ्यांचीच आहे. समाजात नैतिक मूल्ये रुजवणे ही आपण सर्वांचीच जबाबदारी आहे, असे प्रतिपादन आयएएस अधिकारी आशा पठाण यांनी आपल्या सत्कार प्रसंगी केले. त्या बुलडाण्यातील आपली नाती, आपली माणसं व संस्थेच्यावतीने आयोजित सत्कार प्रसंगी बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमात आशा पठाण यांचा शाल, सन्मानपत्र व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शल्यचिकित्सक व गझलकार डॉ. गणेश गायकवाड होते. संजय निचत, अरविंद टाकळकर व शाहिना पठाण मान्यवर म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना आशा पठाण यांनी कृतज्ञतेने कुटुंबाच्या त्यागाचे स्मरण केले. त्या म्हणाल्या,ज्ञयश कधीच एकट्याचे नसते. माझ्या वडिलांना शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला. माझ्या यशात कुटुंबाचा मोठा वाटा आहे. त्यामुळे हा सत्कार माझा एकटीचा नसून कुटुंबाचा, शिक्षकांचा आणि समाजाचा आहे. असे ही त्या म्हणाल्या. अरविंद टाकळकर यांनी आशा पठाण यांच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला, तर प्रा. यू. बी. राजपूत यांनी महाविद्यालयीन काळातील अनुभव मांडले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. गायकवाड म्हणाले, ज्ञआशाचा सर्वात मोठा गुण म्हणजे कृतज्ञता. आपल्या कामाप्रती प्रामाणिक राहणे हेच त्यांच्या यशाचे गमक आहे. बुलडाण्याची लेक म्हणून आम्हाला त्यांचा सार्थ अभिमान आहे असे ते म्हणाले. प्रास्ताविक शाहिना पठाण यांनी केले. संचालन महेंद्र सौभागे यांनी तर आभार प्रदर्शन रविकिरण टाकळकर यांनी मानले.

# विद्यार्थ्यांना मिळालेल्या संधीचं सोनं करा : प्र-कुलगुरुडॉ. महेंद्र ढोर

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २५ :

पूर्वीसारखी परिस्थिती आज नाही. एका क्लिकवर आज जगभरातील घडामोडी सहजरित्या कळायला लागल्या आहेत. अनेक सोयीसुविधा आज विद्यार्थ्यांसाठी आहेत. एवढेच नाही, तर शासनाच्या अनेक योजना देखील आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी, मिळालेल्या संधीचं सोन करा, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन करतांना ते बोलत होते.



व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून अमरावती शहरातील प्रसिद्ध अस्पा बंड सन्सचे संचालक रणजीत बंड, वक्ते शिवाजी धवड, विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड उपस्थित होते. अस्पा बंड सन्सचे रणजीत बंड म्हणाले, आज जगात तंत्रज्ञान प्रचंड वाढले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने पुढे जावे, नवनवीन कौशल्य मिळवावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच चित्रफितीच्या माध्यमातून देशभरातील मोठमोठ्या उद्योगकत्र्यांच्या कार्याचा आढावा त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितला. इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव यांनी इन्क्युबेशन व त्याची उपयोगिता याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आयुष्याचा प्रवास करतांना अनेक अडचणी, अपयश येते, मात्र त्याला घाबरुन न जाता आपला प्रवास पुढे सुरु ठेवावा, जोपर्यंत आपण आपले लक्ष्य गाठण्यामध्ये यशस्वी होत नाही. कार्यशाळेच्या दुस–यसत्रात प्रमुख वक्ता शिवाजी धवड यांनी विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकातून नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका मांडली. सूत्रसंचालन विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी केले.

कार्यशाळेला विद्यापीठाच्या विविध विभागाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठा संख्येने उपस्थित होते.

# राजस्व अभियानात नेर येथे पाणंद रस्त्यांसाठी ग्रामसभा

■ महासागर प्रतिनिधी,
दानापूर , दि. २५ :

दानापूर महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या वतीने सुरू असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान सेवा पंधरवड्यांतर्गत नेर (ता. तेल्हारा) येथे १७ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या ग्रामसभेत गाव नकाशावर असलेले व नसलेले पांदण रस्ते, शिवदांड रस्ते तसेच इतर सार्वजनिक रस्त्यांची माहिती वाचनाद्वारे स्पष्ट करण्यात आली. काही रस्त्यांवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्याने, संबंधित अतिक्रमणे नियमानुसार हटवण्याचा निर्णय घेण्यात आला. ही मोहीम जिल्हाधिकारी, उपविभागीय



अधिकारी, तहसीलदारांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत आहे. शासन निर्णय २९ ऑगस्ट अन्वये ही ग्रामसभा घेण्यात आली.

ग्रामसभेच्या माध्यमातून गावातील पाणंद रस्ते आणि त्यावरील अतिक्रमण यावर खुली चर्चा झाली. यावेळी ग्रामस्थांनी रस्ते मोकळे करण्यासाठी सहकार्याचे आश्वासन दिले. ग्रामसभेला सरपंच जयश्री दोड, ग्रामसेवक चतारे, पटवारी कुलदीप ठाकूर, सुनील तायडे, ग्रामपंचायत ऑपरेटर साजिद खान, कोतवाल रफिक मियां देशमुख, कृषी सखी राजकन्या गावंडे, सुभाष सपकाळ, बंडू तायडे, लक्ष्मण तायडे, वंदना तायडे, शालिनी तायडे, सत्यभामा चौक यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात लंपीने घेतला ४० गोवंशांचा बळी

■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. २५ :



बुलडाणा जिल्ह्यात तब्बल तीन महिन्यांपासून डोके वर काढलेल्या लंपी आजारावर पशुविभाग नियंत्रण मिळवण्यासाठी परिश्रम करत आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून एकही नवीन गोवंश या आजाराने बाधित झालेला नाही. मात्र, मृत्यू दरावर अद्याप नियंत्रण मिळालेले नसून, मृत गोवंशाची संख्या ३८ वरून ४० वर पोहोचली आहे. त्यामुळे विभागापुढे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. जिल्ह्यात ३ ते ४ महिन्यांपूर्वी लंपीने पुन्हा फैलाव केला होता. एकूण ९३ गावांमधील १ हजार ३३९ गोवंश बाधित झाले होते. त्यावर युद्धपातळीवर लसीकरण व उपचार मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेमुळे १ हजार १९० गोवंश आजारातून बरे झाले आहेत.


**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९७५

क्र. १२८/मनु-३/जनम(शहर)/कवि-१०६/२०२५ दिनांक : २१/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा. उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-७ अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अर्जदार मोहम्मद मुस्तकीम d/o मोहम्मद जकी अन्सारी रा. यांजरा झोपडपट्टी, भीलगाव वाघोबा नगर, मो. ७२४९१४७६०३

**-: जाहिरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार मोहम्मद मुस्तकीम d/o मोहम्मद जकी अन्सारी रा. यांजरा झोपडपट्टी, भीलगाव वाघोबा नगर, मो. ७२४९१४७६०३ यांनी नातू यांच्या जन्म तारखेची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार मुलगा नामे मोहम्मद कैफ d/o मोहम्मद मुस्तकीम अन्सारी जन्म दिनांक ०५/०३/२००६ रोजी घरी झालेला आहे, असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकाराच्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**Change Of Name**

MY OLD NAME WAS **KAUSTHUB SURESH PARALKAR**. NOW MY NEW NAME IS **KAUSTUBH SURESH PARALKAR**.
**ADD :** 145, SHREE KRUPA APTS. SURENDRANAGAR, NAGPUR 440015.

MY OLD NAME WAS **NAJMUDDIN BOHARI**. NOW MY NEW NAME IS **NAJMUDDIN ABDUL ALI BHOPALWALA**.
**ADD :** FLAT NO, 31 BINAKI MANGALWARI NAGPUR 440017.

MY OLD NAME WAS **NILAM BANWARILAL ASATI**. NOW MY NEW NAME IS **NEELAM BANWARILAL ASATI**.
**ADD :** KATI, GONDIA - 441614.

MY OLD NAME WAS **DEEPAKKUMAR AGARWAL**. NOW MY NEW NAME IS **DEEPAK HUKUMCHAND AGRAWAL**.
**ADD :** WARDHAMAN MAHAVIR WARD, GANESH NAGAR, GONDIA - 441601.

MY OLD NAME WAS **SHAMSHAD SK. IBRAHIM SHEIKH**. NOW MY NEW NAME IS **SHAMSHAD NAZ MOHAMMAD PARVEZ.**
**ADD :** H.NO.312, WARD NO.06, SHUBHAM NAGAR, YERKHEDA KAMPTEE, NAGPUR.

MY OLD NAME WAS **NILOFER BEGUM D/O MOHAMMED AHMAD**. NOW MY NEW NAME IS **NILOFER MOHAMMED AHMED.**
**ADD :** 134 FRIENDS COLONY, KATOL ROAD NAGPUR 440013.

WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **R5375979**. MY OLD NAME WAS **MANOJ BHAIYALAL KESARWANI**. NOW MY NEW NAME IS **MANOJ BHAIYALAL KESHARWANI.**
**ADD :** ADD SAI BABA CYCLE LALGANJ 440002.

WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **R1968211**. MY OLD NAME WAS **VEDANT KUMAR SAHU**. NOW MY NEW NAME IS **VEDANT SAHU.**
**ADD :** PLOT NO 36 SHAKTI VIHAR ESTERN INDIAN LAYOUT MANKAPUR NAGPUR - 440030.

I **VEENA UPADHYAY** CHANGING MY DAUGHTERS NAME IN HER PASSPORT NO **S0050068.** HER OLD NAME WAS **ISHAVI** AND NOW NEW NAME IS **ISHAVI UPADHYAY.**
**ADD:** FLAT NO.DH-12 D, MAHINDRA BLOOMDALE WARDHA ROADMIHAN KHAPRI - 441108

I **VEENA UPADHYAY** CHANGING MY SON'S NAME IN HIS PASSPORT NO **S0050067**. HIS OLD NAME WAS **EVYAVANAND** NOW NEW NAME IS **EVYAVAN UPADHYAY.**
**ADD:** FLAT NO. DH-12 D, MAHINDRA BLOOMDALE WARDHA ROADMIHAN KHAPRI 441108

MY OLD NAME WAS **ADHIKARLA V NARESH KUMAR**. NOW MY NEW NAME IS **ADHIKARLA NARESH KUMAR.**
**ADD :** FLAT NO 514 STELLA 1 PHASE 1 SANDESH CITY WARDHA NAGPUR - 441122.

MY OLD NAME WAS **RASID KHA DIWANKHA PATHAN**. NOW MY NEW NAME IS **ABDUL RASHID DEWAN KHAN.**
**ADD :** VIDYA GANGDE, NEAR MASJID ISMAIL PAN MANDIR, GADDIGODAM, MOHAN NAGAR, NAGPUR 440001 MS

MY OLD NAME WAS **QUAZI AL FALAK RIZWAN / ALFALAK RIZWAN QAZI**. NOW MY NEW NAME IS **ALFALAK QUAZI.**
**ADD :** BHALDARPURA CIRCLE NO.01 GANESHPETH NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **KHURSHID QAZI / KHURSHEED**. NOW MY NEW NAME IS **KHURSHID RIZWAN QUAZI.**
**ADD :** BHALDARPURA CIRCLE NO.01 GANESHPETH NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **MOHD PARVESH**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD PARVEJ.**
**ADD :** AZAD NAGAR, GITTIKHADAN, NAGPUR

MY OLD NAME WAS **SWPNIL GADDAMWAR**. NOW MY NEW NAME IS **SWAPNIL GADDAMWAR.**
**ADD :** SAI NAGAR, HUDKESHWAR ROAD, NAGPUR

MY OLD NAME WAS **MOHD SHAHRUKH MOHD ALTAF**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SHAHRUKH MOHAMMAD ALTAF SHEIKH.**
**ADD :** KILLA MAHAL NAGPUR 440002

MY OLD NAME WAS **MOHAMMAD FEROZ S/O ABDUL HAFEEZ**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD FIROZ ANSARI.**
**ADD :** NAYA BAZAR ,NEAR IQBAL BULBUL HOUSE, KAMPTEE, NAGPUR-441002

MY OLD NAME WAS **MOHAMMAD SAJID / MOHD SAJID MOHD SADIQUE**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SAJID MOHAMMAD SADIQUE.**
**ADD :** B.B COLONY , YERKHEDA KALAMNA ROAD, KAMPTEE NAGPUR - 441102

MY OLD NAME WAS **FAREEDA ANJUM ABDUL SAMAD**. NOW MY NEW NAME IS **FAREEDA BEGAM.**
**ADD :** NAYA BAZAR ,NEAR IQBAL BULBUL HOUSE, KAMPTEE, NAGPUR- 441002

MY OLD NAME WAS **MOHAMMAD FEROZ S/O ABDUL HAFEEZ**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD FIROZ ANSARI.**
**ADD :** NAYA BAZAR ,NEAR IQBAL BULBUL HOUSE, KAMPTEE, NAGPUR - 441002



**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com

[illegible]

**-: जाहिरनामा :-**

[illegible]

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com

[illegible]

**-: जाहिरनामा :-**

[illegible]

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**PUBLIC NOTICE**
**IN THE COURT OF CJJO & JMFC PARSHIONI, DIST. NAGPUR. (M.S.)**
**Case No. 2/2025**
Fixed for : 18/10/2025

**APPLICANTS :** 1) Smt. Vijaya Wd/o Madhukar Yete, Aged about 63 years. Occu.-household, R/o. Near Mahadev Mandir, Ward No. 1, Parseoni, Tahsil Parseoni, Dist. Nagpur. 2) Shri Rajesh S/o Madhukar Yete, Aged about 65 years, Occu. Private, R/o. Infront of shiv Mandir, Tahsil Parseoni, Dist. Nagpur. 3) Shri. Sandip S/o Madhukar Yete, Aged about 56 years, Occu.-Private, R/o Near Mahadev Mandir, Ward No. 1, Parseoni, Tahsil Parseoni, Dist. Nagpur. 4) Smt. Varsha W/o Arunrao Fulzele, Aged about 54 years. Occu.-Household, R/o Tilka WArd, Hinganghat, Tahsil Hinganghat, Dist. Wardha. 5) Sou. Anju W/o Anil Samarth, Aged about 53 years, Occu. - Household, R/o Aadarsh Colony No. 2, Nagbhid, Tahsil Nagbhid, Dist. Chanrapur. 6) Smt. Suma W/o Manohar Askar (Dead) Through Legal Heirs : a) Shri Shrikant S/o. Manohar Askar, Aged about 48 years. Occu-Private, R/o Sambhaji Nagar, Near Maroti Mandir, Waghapur, Tekadi, Tahsil & District Yavatmal. b) Sou. Sonal W/o Vivek Pande, Aged about 43 years, Occu-Household, R/o Hudkeshwar Road, Mahatma Gandhi Nagar, Nagpur, Tahsil & District Nagpur. c) Shri Swapnil S/o Manohar Askar, Aged abouut 39 years, Occ-Private, R/o Sambhaji Nagar, Maroti Mandir, Waghapur Tekadi, Tahsil & District Yavatmal. 7) Smt. Nisha W/o Dilip Bhawadkar (Dead), Through Legar Heir : a) Sou. Priyanka W/o Sonu Walmik, Aged about 43 years, Occu-Househld, R/o Hingna Road, Nagpur, Tahsil & District Nagpur.

-Versus-

**NonApplicant :** 1) NIL

**Name of Deceased :** 1) Late Bhaurao @ Bhaurao S/o Baliram Yete R/o Parseoni, Tah. Parseoni, Dist. Nagpur, Died on 08/08/1990

Whereas 1) Late Bhaurao @ Bhavrao S/o Baliram Yete, R/o Parseoni, Tah-Parseoni, Dist. Nagpur. Died on 08/08/1990 and whereas 1) Smt. Vijaya Wd/o Madhukar Yete & Others has presented an application to this court for grant of Legal Heir Certificate under Clause 2 of Bombay Regulation VIII of 1827.

This is to give notice to all persons who may dispute the right of the said Applicants 1) Smt. Vijaya Wd/o Madhukar Yete 7 Others as Legal Heir of the deceased, to appear in the court of CJJD & JMFC, Parseoni, Nagpur on 18th day of October, 2025 at 10.30 a.m. There to enter their objections and it is here by declared that if no sufficient objections is offered on or before the date mentined above, the court will forthwith proceed to receive proof of the said Applicants right and to grant them, provides they shall appear entitled thereto a certificate on Legal Heir of the said deceased.

Given under my hand and the seal of the Court this day of 17th day of September, 2025.

**By Order of the Court**
**Asst. Supdt.**
**Court of CJJD & JMFC, Parshioni**



**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com

[illegible]

**-: जाहिरनामा :-**

[illegible]

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com

[illegible]

**-: जाहिरनामा :-**

[illegible]

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com

[illegible]

**-: जाहिरनामा :-**

[illegible]

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता


RNINo-20789/71 महासागर नागपूर
पालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# विविधा...

## गोपरिवारासाठी प्रेरणादायी पाऊल



आज गो विज्ञान परिवारासाठी एक अत्यंत आनंदमय, अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण उजळून निघाला आहे. समाजसेवा, प्रशासन, उद्योग आणि गोसंरक्षण क्षेत्रातील त्यांच्या अथक व उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन, सुधीर दिवे यांची गो विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार (नागपूर) येथे उपाध्यक्ष पदावर निवड करण्यात आली आहे.

ही नियुक्ती केवळ वैयक्तिक सन्मान नव्हे, तर गोमातेच्या सेवेच्या क्षेत्रात एका अनुभवी गोसेवकाच्या नेतृत्वाने नव्या ऊर्जेचा संचार होईल, याची खात्री देणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

दिवे हे प्रशासकीय क्षेत्रातील अनुभवी आणि दूरदृष्टी असलेले अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी डेप्युटी कलेक्टर (Dy. Collector) म्हणून जबाबदारी सांभाळली असून, अनेक दशके केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे OSD (Officer on Special Duty) आणि कोअर टीम सदस्य म्हणून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

विशेष उल्लेखनीय म्हणजे, ते आजही गडकरींच्या कोअर टीममध्ये सक्रिय आहेत आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भाजपच्या राजकीय पटलावरही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे तिथे त्यांच्या गोसेवा आणि सामाजिक कार्याच्या अनेक पोस्टसमधून लाखो अनुयायी प्रेरित होतात.

प्रशासकीय सेवांसोबतच दिवे हे यशस्वी उद्योजक आणि निष्ठावान समाजसेवक आहेत. त्यांच्या प्रमुख संस्था आणि भूमिका खालीलप्रमाणे आहेतः

दिवे बंधू डेअरी उद्योग संस्थापक व संचालक : येथे देशी गोवंशाच्या संरक्षण आणि दुग्धउत्पादनाला चालना देण्याचे कार्य सुरू आहे.

MAFSU (Mbaharashtra Animal and Fishery Science University) राज्यपाल नियुक्त नामनिर्देशित संचालक

शेतकरी आणि पशुपालकांसाठी एकत्रित बाजारपेठ आणि तंत्रज्ञानाचा प्रसार.

अॅग्रो विज़न प्रमुख मार्गदर्शक : कृषी आणि पशुपालन क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान आणि शाश्वत विकासाच्या दिशेने मार्गदर्शन.

या व्यतिरिक्त, दिवे स्वतः एक प्रखर गोभक्त आहेत. धानोली (ग्रामीण भाग) येथे त्यांनी देशी गायींची मोठी गोशाळा स्थापन करून तिचे यशस्वी संचालन केले आहे. ही गोशाळा केवळ संरक्षणापुरती मर्यादित न राहता, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी एक मॉडेल ठरली आहे.

गाय ही भारतीय संस्कृतीचा आधारस्तंभ आहे. गोमाता, गंगामाता आणि भारतमाता ही आपल्या जीवनमूल्यांची त्रिसूत्री आहे. श्री. दिवे साहेबांच्या या कार्याने या परंपरेचे जतन आणि प्रचार यांना नवे आयाम मिळाले आहेत.

देवलापार येथील गो विज्ञान अनुसंधान केंद्र हे जगातील सर्वात मोठ्या पंचगव्य संशोधन प्रयोगशाळांपैकी एक आहे. गेली तीन दशके (१९८० पासून) निःस्वार्थ भावनेने कार्यरत असलेल्या या संस्थेने गोसंरक्षण, गोपालन आणि गोआधारित शेती क्षेत्रात क्रांतिकारी योगदान दिले आहे.

केवळ या क्षेत्रापुरते मर्यादित न राहता, पंचगव्य संशोधनातही त्यांनी ५ पेटंट मिळवले असून, १४० देशांत मान्यता प्राप्त केली आहे. CSIR, NEERI, KVIC, MGIRI, RCONF, VNIT, AIIMS यांसारख्या राष्ट्रीय संस्थांशी MOU (Memorandum of Understanding) करून संशोधनाचा विस्तार केला आहे.

या केंद्राने डिस्कव्हरी चॅनलवर (२०१७) विशेष कव्हरेज मिळवले असून, यूट्यूबवर (२०२३) सुनील मानसिंहका यांच्या व्हिडिओमध्ये या अर्थतंत्राच्या दृष्टीने त्याचा परिचय दिला गेला आहे.

विश्व हिंदू परिषदेच्या 'गोसम्पदा' प्रकाशनातही या केंद्राचा उल्लेख गोविज्ञानाच्या प्रचारासाठी झाला आहे.

■ अजय भोकरे

अशा गौरवशाली संस्थेत दिवे यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती ही त्यांच्या गोसेवेच्या कार्याची मोठी पावती आहे आणि सोशल मीडियावरही याबाबत चर्चा सुरू आहे.

दिवे यांचा प्रशासकीय अनुभव, सामाजिक दृष्टिकोन आणि कृषी-पशुपालन क्षेत्रातील तज्ज्ञता गो विज्ञान परिवाराला नवी ऊर्जा, स्पष्ट दिशा आणि प्रगतीच्या उंच शिखरावर नेईल, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली केंद्राच्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी गती मिळेल, नवीन पेटंट्स आणि उद्योगांचा विस्तार होईल, आणि ग्रामीण भारतात गोआधारित अर्थव्यवस्था मजबूत होईल. हे केवळ संस्थेच्या वाढीसाठीच नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राच्या शाश्वत विकासासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.

या महत्त्वपूर्ण जबाबदारीबद्दल सुधीर दिवे यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा! ईश्वर त्यांच्या कार्याला सकारात्मक ऊर्जा, सामर्थ्य आणि यश देवो, हीच आमची गोमातेच्या चरणी प्रार्थना. आपण सर्वजण एकत्र येऊन या मोहिमेला हातभार लावूया.

गो विज्ञान केंद्राच्या वेबसाइट (govigyan.com) वर जाऊन GO-Sevak म्हणून नोंदणी करा आणि गोपरिवारचा भाग व्हा!

वंदे गोमातरम्! जय गोमाता!

# उपासना ही तत्वाची व्हावी..!

दैवी शक्ती म्हणजे ईश्वरी सामर्थ्य किंवा उच्च शक्तीची कृपा, जी सामान्यतः एखाद्या व्यक्तीच्या कल्पनेपलीकडे असते. ही शक्ती जगाला नियंत्रित करणाऱ्या उच्च शक्तींकडून येते आणि पूर्वनियोजित घटना घडवते. अनेकदा असे मानले जाते की, जेव्हा एखादी व्यक्ती संकटातून अनपेक्षितपणे बाहेर पडते किंवा जीवनात काही अलौकिक घटना घडतात, तेव्हा ती दैवी शक्तीमुळे घडते, असे लोक मानतात.

थोडक्यात, दैवी शक्ती म्हणजे एका अज्ञात आणि शक्तिशाली अस्तित्वाची कृपा, जी आपल्या जीवनावर आणि घटनांवर प्रभाव टाकते. असे अनेक धर्मांमध्ये आणि अध्यात्मात मानले जाते. ही शक्ती देव किंवा एखाद्या उच्च शक्तीशी संबंधित आहे आणि त्या शक्तीचा प्रभाव दर्शवते. दैवी शक्ती नैसर्गिक नियम आणि मानवी बुद्धीच्या पलीकडे कार्य करते, ज्यामुळे अनपेक्षित गोष्टी घडतात.

ही संकल्पना अध्यात्मिक आणि धार्मिक विचारांशी जोडलेली आहे, जिथे ईश्वर आणि त्याच्या शक्तीवर विश्वास ठेवला जातो. या शक्तीमुळे जीवनातील घटनांवर परिणाम होतो आणि ती व्यक्तीला संकटातून बाहेर काढण्यास मदत करते, असे मानले जाते.

ही दैवी शक्ती साक्षात स्त्रीशक्ती आहे. देवीचे पूजन करणे म्हणजे स्त्रीतत्त्वाची पूजा करण्यासारखेच आहे. कारण स्त्री ही आई, बहीण, मुलगी आणि पत्नी अशा सर्व भूमिका पार पाडणारी शक्ती आहे. त्यामुळे, दैवी शक्ती आणि स्त्रीशक्ती एकच आहेत आणि या उत्सवाचा उद्देश मातृशक्तीचा गौरव करणे आहे.

नवरात्रोत्सव हा देवीच्या पूजनाचा सोहळा आहे आणि देवीला स्त्रीशक्तीचे प्रतीक मानले जाते. देवी ही केवळ एक स्त्री नाही, तर ती सर्व नाती जपणारी आणि सृजन करणारी शक्ती आहे, असे मानले जाते. जिथे नारीची पूजा होते, तिथे प्रत्यक्ष भगवंतांचा वास असतो असे म्हटले जाते.

याचा अर्थ असा की, स्त्रीशक्तीची पूजा केल्याने आपोआपच सर्व देवतांचे सान्निध्य प्राप्त होते. नवरात्र हा मातृशक्तीचा उत्सव आहे, जो स्त्रीच्या सृजनशक्तीचाही उत्सव आहे. त्यामुळे, नवरात्रीत आपण दैवी शक्ती आणि समस्त नारीशक्ती या दोन्हींचा उत्सव साजरा करतो, कारण त्या एकच आहेत.

पण कोणतीही लिंग विशिष्ट पूजा आली की तिथे अहंकार येतोच आणि अहंकार आला की उपासना संपते. त्यामुळे पूजा, उपासना, साधना ही तत्वाची व्हावी, व्यक्तीची नव्हे. कारण व्यक्तींमध्ये दोष असतातच. तत्व शुद्ध, निर्लेप आणि निरपेक्ष असते.

अर्थातच देवी ही शक्तीरूपच असते. पुरुष देवता या त्या विशिष्ट क्रियेचं ती क्रिया कशी व्हावी हे ज्ञान असतात, तर स्त्री देवता म्हणजे त्यांच्या ज्या पत्नी दाखवलेल्या असतात त्या ती ती विशिष्ट क्रिया पार पाडणारी शक्ती असतात. ज्ञान आणि कृती किंवा क्रिया यांचा संगम झाल्यावरच अर्थात घडल्यावरच कार्य घडते.

नवरात्रीला स्त्री शक्तीचा जागर म्हणायचं असेल तर गणेश उत्सवाला, कृष्ण जन्माष्टमीला पुरुष शक्तीचा जागर म्हणायचं का? शिव शब्दात शिव हा शब्द शव या पुरुष रुपाला इ हा स्त्री लिंगी स्वर जोडून शिव हा शब्द बनला आहे. हा इ हा स्त्री उच्चारी स्वर नसेल तर शिव हे फक्त शव म्हणजेच प्रेत होईल.

लक्ष्मी ही विष्णूची शक्ती आहे जिला आपण विष्णूची पत्नी म्हणतो. सरस्वती ही ब्रह्मदेवाची कार्यकारी शक्ती म्हणजे सृष्टी कशी बनवायची हे ज्ञान ब्रह्मदेव आणि ते प्रत्यक्ष बनवण्याची शक्ती म्हणजे सरस्वती.

ब्रह्म किंवा परब्रह्म ही सृष्टी बनवणाऱ्या शक्तीचे मूळ अकल्पनिय, अचिंत्य म्हणजे आपल्याला न कळणारे अति सूक्ष्म रूप असून या शक्तीचं साकार आणि खरं भासणारं आभासी रूप म्हणजे माया होय. 'शीवी' किंवा पार्वती ही शिवशंकरांची शक्ती होय. शीवी म्हणजे ती शिवी नव्हे जिथे चुकीची वाकशक्ती, वाणी, घातक किंवा वाईट शब्द असते.

पण हा जर स्त्री शक्तीचाच उत्सव असेल तर प्रत्येक पुरुषात स्त्रियांच्या जन्माला कारणीभूत ठरणारे 'एक्स' गुणसूत्र असल्याने पुरुषांमधल्या स्त्री शक्तीचं नवरात्र हे शुद्धीकरण पर्व असतं असं आपण नक्कीच म्हणू शकतो. आपण जेव्हा जन्म घेतो तो आपण माणूस म्हणूनच का घेतो? हात, पाय, नाक, डोळे, आपल्या सवयी, आवडी निवडी या काहीशा आपल्या आई-वडिलांच्या सारख्याच का असतात? त्यांच्या सारखेच आपण का दिसतो? हे सारं आरेखित केलेलं असतं.

आपल्या आई वडिलांच्या शरीरातील पेशींमध्ये गुणसुत्र रूपाने पुरुष बाळ जन्माला येण्यासाठी 'वाय' गुणसुत्र तर स्त्री बाळ जन्माला येण्यासाठी 'एक्स' गुणसुत्र आवश्यक किंवा कारणीभूत असतात. आता पुरुषांच्या शरीरातील पेशींमध्ये 'एक्स' आणि 'वाय' हे दोन्ही गुणसुत्र असतात तर स्त्रीच्या शरीरातील पेशींमध्ये फक्त 'एक्स' गुणसूत्र असतात.

आता दोघांच्या शरीरातील एक एक गुणसूत्र घेऊन जोडला जाईल तेव्हा बाळाचं लिंग काय असणार हे ठरणार... पुरुषांमधलं एक्स आणि स्त्री मधलं एक्स एकत्र आलं तर मुलगी जन्माला येणार आणि जर पुरुषांमधलं वाय आणि स्त्री मधलं एक्स गुणसूत्र एकत्र आलं तर मुलगा जन्माला येणार... याचे दोन मुख्य अर्थ होतात.

एक म्हणजे मुलगा होणार की मुलगी हे पुरुषामधून एक्स किंवा वाय यापैकी कोणतं गुणसूत्र दिलं जातंय यावर अवलंबून असतं. म्हणजेच दुसऱ्या भाषेत मुलगा होणार की मुलगी याला पूर्णतः पुरुषच जबाबदार असतो आणि स्त्री मध्ये दोन्ही गुणसूत्र एक्स असल्याने ती एक कणखर व्यक्ती असते असं म्हणता येईल. अर्थात स्त्री ही पूर्णपणे स्त्री असते तर पुरुषामध्ये काही प्रमाणात स्त्रीत्व असतं.

म्हणजे नवरात्र हा स्त्री शक्तीचा जर जागर असेलच तर तो पुरुषांमधल्या स्त्री शक्तीचा जागर किंवा पुरुषांमधल्या स्त्रीत्वाचं शुद्धीकरण असतं असं आपण म्हणू शकतो.

याही पुढे जायचं झालं तर देवता या वायूरूप असतात. म्हणजे आपण ज्या रूपात त्यांची आराधना करू त्या रूपात त्या आपल्याला प्रसन्न होतात किंवा दर्शन देतात. पण चित्रपटात दाखवल्याप्रमाणे वास्तविकतेत लगेच होतं असं नाही. त्यासाठी स्वतःला झोकून देऊन उपासना करावी लागते, त्यासाठी जीव ओतावा लागतो.

अर्थात अगदी आर्ततेने साद घातल्यावर देवता धावून आली आहे असंही क्वचित प्रसंगी झालेलं आहे. उदाहरण द्यायचं झालं तर जेव्हा एका हत्तीचा पाय पाण्यातल्या मगरीने पकडला होता, तेव्हा त्या हत्तीने आर्ततेने विष्णूला साद घातल्यावर त्याने धावून येऊन त्या हत्तीची सुटका केली होती.

अजामिळ नावाच्या एका नास्तिक व्यक्तीला मोक्ष मिळाला ज्याने आयुष्यभर काहीही उपासना केली नाही. पण मरताना त्याच्या स्वतःच्या मुलाला नारायण म्हणून हाक मारली आणि तो मुक्त झाला. तर सांगायचं उद्देश हाच की देवता जरी माणसा सारख्या दाखवलेल्या असल्या तरी त्या प्रतिकात्मक असतात. त्या जर माणूस असल्या तर त्यांनाही आपल्यासारखे राग, लोभ, द्वेश, प्रेम वगैरे भावना असत्या.

त्यामुळे देवतांमध्ये स्त्री-पुरुष भेद न माजवता, त्याचं अवडंबर न करता स्त्री शक्तीची नव्हे तर केवळ 'शक्तीची पूजा' आपण करतोय हे लक्षात ठेवून उपासना करावी. जिथे शक्ती असेल तिथेच शांती असते. दुबळ्यांच्या गप्पांना काहीही अर्थ नसतो. तर नवरात्राच्या या काळात देवीची उपासना करून (यात स्त्री-पुरुष सगळे आलेत) आपण शरीराने आणि मनाने शक्ती संपन्न, सामर्थ्यवान व्हायला पाहिजे.

आपण शक्तिमान झालो की समाजात आपल्याला मान मिळतो, हाती घेतलेल्या कामात यश मिळतं. मन आणि शरीर सुद्धा स्वस्थ, शांत राहतं. स्त्रियांनी आणि पुरुषांनी एकमेकांचा, एकमेकातील भेदांचा आदर करत एकत्र काम करायला शिकायला पाहिजे. मन आणि समाजातील वाईट गोष्टींचा नायनाट करण्यासाठी प्रयत्नशील रहायला पाहिजे. उपासना, साधना याचे अनेक अर्थ, प्रकार आहेत. हिंदू धर्म जेवढा प्राचीन आहे तेवढाच विशाल आहे.



शब्दस्पर्शी - सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ.
७०५७१८५४७९

## सदाबहार अभिनेते देव आनंद



श्याम ठाणेदार
दौंड. जि. पुणे

हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार, चिरतरुण आणि चॉकलेट हिरो असे ज्यांचे वर्णन केले जायचे ते जेष्ठ सिनेअभिनेते दिवंगत देव आनंद यांची आज १०२ वि जयंती.

१०२ वर्षांपूर्वी २६ सप्टेंबर १९२३ रोजी त्यांचा जन्म झाला. हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे.

देव आनंद यांचे मूळ नाव देवदत्त पिशोरीमल आनंद असे होते. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. लाहोरमधील कॉलेजमध्ये १९४२ साली त्यांनी संगीतात ग्रॅज्युएशन पूर्ण केले. तिथेच त्यांची खुशवंत सिंग व बलराज साहनी यासारख्या दिग्गज व्यक्तिमत्वाशी भेट झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काहीकाळ नोकरीही केली मात्र नोकरीत त्यांचे मन रमले नाही. लवकरच त्यांनी नोकरी सोडून चित्रपटाची वाट धरली.

प्रभात कंपनीच्या हम एक है या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. मात्र त्यानंतर त्यांचे काही चित्रपट आपटले. त्यांच्याच कंपनीचा म्हणजे नवकेतनचा अफसर हा चित्रपट देखील पडला मात्र या अपयशाने ते डगमगले नाही. अपना भी टाइम आयेगा.... असे ते त्यावेळी निर्मात्यांना म्हणत असत. त्यांनी अभिनय केलेला बाजी हा चित्रपट पडद्यावर आला आणि त्यांचे हे बोल खरे ठरले.

बाजी हा चित्रपट तिकीट बारीवर यशस्वी ठरला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली या चित्रपटाने त्यांना नायक म्हणून मान्यता दिली. या चित्रपटानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. केसांचा तुरा, गुलछबू आणि देखणी चेहरेपट्टी यामुळे उठून दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाने प्रेक्षकांच्या हृदयात स्थान मिळवले. ते प्रेक्षकांचे आवडते नायक बनले.

त्यांचे सर्व चित्रपट हिट होऊ लागले. बाजी, मुनीमजी, दुश्मन, कालाबाजार, सीआयडी, पेईंग गेस्ट, गॅम्बलर , तेरे घर के सामने, काला पाणी, जाल, गाईड, तेरे घर के सामने, छुपा रुस्तम, हरे रामा हरे कृष्णा, हिरा पन्ना, देस परदेस, ज्वेल थिफ, जॉनी मेरा नाम, अव्वल नंबर, स्वामी दादा असे सर्वच चित्रपट यशस्वी ठरले.

१९५० ते १९७० असे जवळपास दोन दशके त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. राज कपूर आणि दिलीप कुमार यांच्यासारख्या तगड्या नायकांसमोर त्यांनी मोठे आव्हान उभे केले. त्याकाळात या तिघांना हिंदी चित्रपट सृष्टीतील त्रिदेव असे म्हंटले जायचे कारण या तिघांनी तो काळ अक्षरशः गाजवून सोडला होता. देव आनंद आणि राज कपूर यांच्यापेक्षा देव आनंद यांचे चाहते अधिक होते विशेषतः त्या काळातील तरुणाईने त्यांना डोक्यावर घेतले होते. त्यांचा चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो पाहण्यासाठी तरुण कॉलेज सोडून चित्रपट गृहाबाहेर रांगेत उभे असायचे. तरुण मुली तर त्यांच्यासाठी अक्षरशः वेड्या झाल्या होत्या. त्यांची एक झलक पाहण्यासाठी मुली घरातून पळून मुंबईला येत असत.

त्यांच्या यशात त्यांच्या गाण्यांचा देखील खूप मोठा वाटा आहे. त्यांच्या बहुतेक चित्रपटाला सचिन देव बर्मन यांचे संगीत लाभले. सदाबहार गायक किशोर कुमार हे त्यांच्यासाठी गाणी गात. संगीतकार सचिन देव बर्मन, गायक किशोर कुमार आणि पडद्यावरील नायक देव आनंद हे त्रिकुट असे काही जमले की त्यांच्या अनेक गाण्यांनी इतिहास घडवला.

तू कहा ये बता, देखो रुठो ना करो, एक घर बनाएंगे तेरे घर के सामने, दिल का भवर करे रे पुकार, गाता रहे मेरा दिल, मै जिंदगी का साथ निभाता चला गया, चुडी नही मेरा दिल दिल है दिल, फुलो का तारों का सबका कहना है, दिन ढल जाये, छोड दो आंचल जमाना क्या कहेगा यासारखी त्यांची असंख्य गाणी लोकप्रिय आहेत. देव आनंद यांनी केवळ चित्रपटात अभिनयच केला असे नव्हे तर त्यांनी काही चित्रपटांसाठी पटकथा लेखन केले तर काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. आंधिया, हरे रामा हरे कृष्णा, हम नौजवान, अव्वल नंबर, प्यार का तराना, गॅंगस्टर, मै सोलह बरस की, सेन्सॉर या चित्रपटासाठी त्यांनी पटकथा लेखन केले तर हिरा पन्ना, देस परदेस, लूटमार, स्वामी दादा, सच्चे का बोलबाला, अव्वल नंबर अशा काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. अभिनयासाठी त्यांना अनेक फिल्मफेअर पुरस्कार तर मिळालेच पण भारत सरकार कडूनही त्यांना मानाचा पद्मभूषण पुरस्कार मिळाला.

चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कारही त्यांना मिळाला. ३ डिसेंबर २०११ रोजी त्यांचे निधन झाले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपट रसिकांच्या मनावर मोहिनी घालणाऱ्या या सदाबहार अभिनेत्याला त्याच्या १०२ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

# नवदुर्गा - पंचम

(मराठी - भक्तीकविता)

हे शैलपुत्री शौर्यस्वामिनी-शांतकरुणा
'शिवरंजनी' 'स्व-केसरीसंगे' शक्तिरूपिणी ॥॥ १ ॥
हे ब्रह्मचारिणी ब्रह्मांडभ्रमणी
'ब्रिंद्रावनी-सा-रंग' 'शुभ्रे-ब्रह्मानंदिनी' ॥ २ ॥
हे चंद्रघंटा चंदनलिप्ते चित्तस्थैर्ये
चित्तरंजने 'चंद्रकौंसे' 'चंदन-रक्ते' ॥ ३ ॥
हे कुष्मांडा कुलश्रेष्ठे
'किरवानी-करुणे' कनकधारा 'कुसूम-निल-कमले' ॥ ४ ॥
हे स्कंदमाता सौंदर्यवंते स्वरसिद्धयुक्ते
'सुधा-सा-रंग'-'स्वर्णसुर्ये हरिद्रातेजे' ॥ ५ ॥
हे कात्यायनी कमलनयनी
'कौमोदिकी'-शक्ती 'कांचन-हरिते' ॥ ६ ॥
हे ₹कालरात्री₹ कंठमुंडमाल,
करखड्ग-खप्पर, कवने 'केदारा' कर-'रक्षा' ॥ ७ ॥
हे महागौरी महारुद्रे 'मन-मधुवंती',
'मधुसूदन-कमलपुष्पे' ॥ ८ ॥
हे सिद्धीदात्री सिद्धहस्ते 'श्री-सरस्वतौ-माँ'
श्रुती-द्वाविशंती स्वामिनी-'मयुरवासिणी' ॥ ९ ॥
हे नवदुर्गे नयनमनोरमे नवधा-मनरमणी
तन मन-वा'तश्वासे नमोनमः ॥ १० ॥

**कवितेविषयी थोडेसे :-**

अ) ही कविता दुर्गादेवीच्या नऊ रुपांवर केलेली आहे.

आ) तसेच त्या -त्या दिवसाचे देविचे रूप त्या, दिवसाचा वस्त्राचा रंग, आणि त्या दिवसाच्या देविची आराधना एका विशिष्ठ करुणामाय - वीररस प्रधान - शांतीप्रधान - भक्तीप्रधान देविच्या रुपानुरूप -राग गायनात करायला पाहिजे, म्हणजे रागातील भाव आणि देवीचे भाव एक होऊन भक्तीआनंद मिळू शकतो, असा विचार केलेला आहे.

इ) रागाचे नाव देवीचेच स्वभाव चित्रण दर्शविल, असेच संगीत राग गायनातील राग निवडले आहेत .

ई) तसेच देविचे जे ज्या दिवशी रुप आलेले आहे त्याचा अनुप्रास आलेला आहे. वाचताना लक्षात येईलच .

उ) १) देवीचे रूप (आध्यात्म) -
२) संगीतातील राग (संगीत ) -
३) आणि त्या दिवसाचा रंग ( चित्रकला) -
४) शब्दानुप्रास ( मराठी साहित्य)
५) साहित्यातील पद्य प्रकार (कविता) हे पाचप्रकार आहेत म्हणून

नवदुर्गा - पंचम शिर्षक दिले आहे.

**कवितेचा अर्थ :**

**१) शैलपुत्री**

पहिल्या दिवशीचे रूप :- हे शैलपुत्री शौयाची स्वामिनी आहेस तुझास्वभाव शांत आणि डोळ्यात करुणा आहे . त्रिदेवातील शिवशंकरांच्या भक्तीत तु तुझं रंजन करून घेतेस . म्हणजेच संगीतराग शिवरंजनी आणि तुझा स्वतःचा केसरी (सिंव्ह) तुझ्यासोबत आहे. तू शक्ती स्वरूपा आहेस. यादिवसाचा रंग केशरी - नारंगी आहे.

**२) ब्रह्मचारिणी -**

दुसऱ्या दिवशीचे रूप : - हे ब्रह्मचारिणी तुझं संपूर्ण ब्रम्हांडात भ्रमण असतं गोपाळ कृष्णाच्या वृंदावनातल्या जशा गोपी भक्ती रंगात रममाण असतात तशी भक्ती करुणा तुझ्या जवळ आहे . म्हणजेच संगीत राग ब्रिंदावनी सारंग.

या दिवसाचा रंग शुभ्र पांढरा ही देवी ब्रह्मचारिणी ब्रह्मानंदात रममाण आहे म्हणून ब्रह्मानंदिनी.

**३ ) चंद्रघंटा -**

तिसऱ्या दिवशीचे रूप :- हे चंद्रघंटा सर्वांगी चंदन लिंपलेले, सर्वांचे विचलीत चंचल मनाला शांतकरून चित्त एकाग्र करून, चित्त स्थिर करणारी . गणितातल्या कंसासारखा डोक्यावर चंद्र धारण करणारी, म्हणजेच संगीत राग चंद्रकौंस . रक्तचंदनाचा मळवट लावलेली .

**४ ) कुष्मांडा**

चौथ्या दिवशीचे रूप :- हे कुष्मांडा सर्वकुलाहून श्रेष्ठ अशी कुलश्रेष्ठ देवी, संगीतराग किरवानीची पूर्ण करुणावात्सल्य घेऊन भक्तांसाठी आलेली निल कमल कुसुमावर विराजमान अशी कनकधारा असलेली देवी. या दिवसाचा रंग निलकमला सारखा निळा.

**५) स्कंदमाता**

पाचव्या दिवशीचे रूप : हे स्कंदमाता संपूर्णसौंदर्य एकटून गेलेली सौंदर्यवंते संगीतातील स्वरांना सिद्धता देणारी देवी . सुधा म्हणजे अमृत सारखा रंग ल्यालेली . संगीत राग - शुद्ध सारंग . सुवर्णा सारखा लखलख तळपणारा हळदीसारखा सूर्य आणि त्याचे तेज एकवटलेली हे देवी स्कंदमाता . या दिवशीचा रंग हळदीसारखा पिवळा.

**६) कात्यायनी**

सहाव्या दिवशीचे रूप :- हे कात्यायनी कमलासारखे डोळे असलेली कमलनयनी, भगवानविष्णूची कौमोदिकी गदेची शक्ती ल्यालेली, संगीत राग कामोद. कांचन म्हणजे सुवर्ण मिश्रीत हरित म्हणजे हिरवा हे दोनही मिश्रीत रंगाचे सुवर्ण हरित - हिरव्या रंगाचे वस्त्र नेसलेली देवी.

**७) कालरात्री**

सातव्या दिवशीचे रूप :- हे कालरात्री गळ्यात कंठाशी दुष्टांच्या मुंडक्यांची रंडमुंड माळ घातलेलेली . एका हातात खप्पर आणि दुसऱ्या हातात भक्त रक्षणार्थ खड्ग उचललेली. भयावह दिसणारी. पण तितकीच करूणावत्सल आई कालरात्री. संगीतातील वीरत्व असलेल्या राग केदारात भक्त गुणगान करतात. हे कालरात्री आमची रक्षा कर. ही कालरात्री सर्वांगाला भस्म लिंपून भक्तरक्षणार्थ निघाली आहे. यादिवसाचा रक्षा म्हणजे भस्म, भस्मासारखा तपकिरी - भूरा - ॲश रंग आहे .

**८) महागौरी**

आठव्या दिवशीचे रूप :- हे महागौरी शिवअर्धांगी शक्तीस्वरूपा पार्वती स्वरुपिणी आहे , मात्र या महागौरीचे मन मधुवंती प्रमाणे कोमल असे आहे. मधु म्हणजे गोड मधा प्रमाणे, सहदाप्रमाणे गोड करूणावत्सल मन लाभलेली देवी . संगीतातील राग मधुवंती . मधुसूदन म्हणजे श्रीकृष्ण व कमलपुष्प म्हणजे कमळाचे फूल .आणि या महागौरीचे वस्त्र कृष्ण कमळ फुला प्रमाणे निळसर जांभळे असे आहे . या निळसर जांभळा रंगाची छटा सर्वदूर पसरलेली आहे. या दिवशीचा रंग निळसर जांभळा .

**९) सिद्धीदात्री**

नवव्या दिवशीचे रूप :- हे सिद्धिदात्री तू देवीचं नववं रूप असून, तुझा आशिर्वाद सर्वकार्य सिद्ध होऊन शुभफल प्रदान करणारा आहे. श्री म्हणजे धनलक्ष्मी - सरस्वती म्हणजे १४विद्या ६४ कलांची स्वामिनी देवी सरस्वती - शक्तीरुपिणी उमा (पार्वती ) या तिनही शक्ती मिळून एक दिव्यशक्ती हे दुर्गा माँ संगीतातील २२ श्रुतिंची जननी स्वामिनी. संगीतातील राग श्री व सरस्वती . जंगलातील पक्षांचा राजा मयुर तुझ्याजवळ वावर असणारी, हे देवी. अशी मयुरवासिणी देवी .

यादिवसाचा रंग मोरपंखी हिरवा .

१०) हे दुर्गा देविचे, डोळ्याचे पारणं फिटणारे नयनरम्य नऊ शक्तीस्वरूप करुणामय नवदुर्गे ! भक्तांच्या मनात तू तुज्या नवरूपांनी नवधा भक्ती निर्माण करून, म्हणजे नऊ प्रकारची भक्ती १) श्रवणम् २) किर्तनम् ३)स्मरणम् ४)पादसेवनम् ५) दास्यम् ६) सख्यम् ७) अर्चनम् ८) वंदनम् ९) आत्मनिवेदनम्

हे भक्तांना शिकवणारी व त्यात रमणारी देवी!

१. तन'मन'वात'श्वासे

२. तन'मनवा'त श्वासे

पहिला अर्थ :- माझ्या तन मनात वायूरूप श्वासात हे शक्तीरूप विद्यमान आहे, त्यास मी नमन करतो आहे.

दुसरा अर्थ : - तन - मनवात - श्वासे म्हणजे 'मनवा' म्हणजे मी कवी रचनाकार डॉ. मिलिंद इंदूरकर (मनवा) माझ्या देहात वा कविमनात श्वासरुपे अव्याहत सुरु असलेल्या, शक्ती स्वरूपास माझे नमन .

हे नवदुर्गे नमोनमः!!!!



डॉ. मिलिंद इंदूरकर
नागपूर.
9552607646

## देवीच्या गोंधळाचे महत्त्व!

नवरात्रात घटस्थापना, देवीसमोर नऊ दिवस अखंड नंदादीप प्रज्वलित करणे, व्रत-उपवास करणे, श्री दुर्गा सप्तशतीचा पाठ करणे, कुमारिका पूजन करणे इत्यादी कृती केल्या जातात. यासोबतच महाराष्ट्रात देवीचा गोंधळ घालणे हा पारंपरिक कुळाचार देखील आहे. घरातील शुभकार्य, विवाह, नवीन घर घेणे अशा प्रसंगी प्रामुख्याने हा विधी केला जातो. या विधीमध्ये गोंधळी संबळ आणि तुणतुणे ही वाद्ये वाजवून देवीची गीते गातात आणि नृत्याद्वारे देवीची उपासना करतात.

आपल्या प्रत्येकात सत्त्व, रज आणि तम हे त्रिगुण आहेत. आपले आचरण या गुणांवर अवलंबून असते. जेव्हा आपण साधना करू लागतो तेव्हा आपल्यात सत्त्वगुणाची वाढ होते. मात्र साधना न करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात त्रिगुणांचा असमतोल असतो. यालाच त्रिगुणांचा गोंधळ असे म्हणतात. या गोंधळामुळे शारीरिक कष्ट, दुःख, मन अशांत राहणे असे अनुभव येतात.

हा त्रिगुणांचा गोंधळ थांबवण्यासाठी देवीला आवाहन करणे याला देवीचा गोंधळ घालणे असे म्हणतात. गोंधळात गायन व नृत्याद्वारे कुलदेवीची आराधना केली जाते. देवीच्या गोंधळात पारंपरिक वाद्ये वाजवली जातात. ही वाद्ये प्रामुख्याने देवीच्या शक्तीतत्त्वाशी संबंधित असल्याने कुटुंबावर आलेल्या बाधांचे निवारण होते. शुभप्रसंगी देवीचा गोंधळ घालणे आणि दररोज कुलदेवीची उपासना केल्याने देवीची कृपा प्राप्त होते.

■ डॉ. सौ. स्वाती देशमुख
नागपूर.



## संत्री, सोयाबीनच्या नुकसानीचे पंचनामे का नाही?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

राज्य सरकारने अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, यामध्ये धान, संत्रा व मोसंबीच्या फळगळीचे, तसेच सोयाबीनवरील येलो मोझॅकमुळे होणाऱ्या नुकसानीचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.



वरील पिकांच्या नुकसानीचाही पंचनाम्यामध्ये समावेश करावा, अशी मागणी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केली आहे.

चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात भाताचे पीक अनेक दिवसांपासून पाण्याखाली आहे. सततच्या पावसामुळे शेतातून पाणी निघत नाही. पाणी साचून राहिल्याने धानाचे पीक काही ठिकाणी सडले आहे. तसचे अजूनही सडण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाताच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यावर्षी चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात भाताचे उत्पन्न कमी होण्याची शक्यता आहे. तसेच नागपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागाच्या दौऱ्यावर गेलो असताना, मागील काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे संत्रा व मोसंबीच्या झाडांवर बुरशीचा रोग आला आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात फळगळ होऊन नुकसान झाले आहे.

सोयाबीन पिकावर येलो मोझॅकचा प्रभाव असल्याने ते पीकही नष्ट झाल्याचे निदर्शनास आले. शेतकऱ्यांचे नुकसान झाले असूनही, कोणतीही सरकारी यंत्रणा अद्याप पंचनामे करण्यासाठी आलेली नाही. त्यामुळे, नुकसानग्रस्त भागाचे तातडीने पंचनामे करून संत्रा, मोसंबी, तसेच सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळावी, अशी विनंती शेतकऱ्यांनी केली असल्याचा उल्लेखही अनिल देशमुख यांनी आपल्या पत्रात केला आहे.

जून ते ऑगस्ट २०२५ पर्यंत झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीसाठी मदत जाहीर करण्यात आली आहे. यात विदर्भातील ६,७५,८२०.०६ हेक्टरमध्ये झालेल्या नुकसानीसाठी ५८९.४५ कोटी मंजूर करण्यात आले. नागपूर जिल्ह्याचे १,०८३.९९ हेक्टरमध्ये नुकसान दाखवले असून, त्यासाठी फक्त ९५.९७ लाख मंजूर केले आहेत. ऑगस्ट २०२५ नंतर झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आलेत, पण अतिवृष्टीमुळे बुरशी रोग येऊन झालेल्या संत्रा व मोसंबीचे, तसेच ह्येलो मोझॅकह्न मुळे होणाऱ्या सोयाबीनच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश अद्याप देण्यात आले नाहीत, असेही देशमुख यांनी पत्रात म्हटले आहे.

## लाडक्या बहिणींना पैसे.... पण, शेतकरी वाऱ्यावर?

### दादा शेतकऱ्यांच्या आत्महत्या बघत बसणार का? वडेट्टीवारांचा संतप्त सवाल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

लाडक्या बहिणीला पैसा दिला म्हणून काय शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार का? अजित पवार शेतकऱ्यांच्या आत्महत्या बघत राहणार का? शेतकरी कर्जमाफीच्या घोषणेला एक वर्ष पूर्ण होत आहे पण कर्जमाफी झाली नाहीत म्हणजे तुमची नियत साफ नाही, तुम्ही केवळ बोलून वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न करत आहात, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.



वडेट्टीवार म्हणाले की, लाडक्या बहिणीला तुम्ही मतांसाठीच पैसे दिले ना. सत्तेत येण्यासाठीच तुम्ही लाडक्या बहिणीचा वापर केलात. नाहीतर तुम्हाला महाराष्ट्रात कोण विचारले असते. जनतेने तुम्हाला नाकारलेच होते. लाडक्या बहिणींना तुम्ही दीड हजार रुपये महिना सुरू केला आणि २१०० रुपये देणार असे सांगितले त्यांचा तर पताच नाही.याचा वापर तुम्ही केवळ निवडणुकीसाठी केला.

**... सरकार नेमके काय करतय?**

विजय वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्रात कुठल्या शेतकऱ्यांना मदत मिळत आहे. कुठल्या शेतकऱ्यांना हमी भाव मिळत आहे? हा आमचा अजित पवार यांना प्रश्न आहे. २०१४ पूर्वी सोयाबीनचा भाव आज मिळत नाही. कापसाला तेव्हा ८००० हजार रुपयांपर्यंत भाव होता आता तो 5 हजारांच्या वरती जात नाही.

एफसीआयने जे निकष लावले आहेत त्यामध्ये एकही शेतकरी त्यांच्याकडे कापूस टाकू शकत नाही. सरकार काय झोपले आहे का? बेरोजगारांना वाऱ्यावर सोडले आहे, शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. राज्यात काय काम सुरू आहे. रस्त्यामध्ये खड्डे पडले आहेत अपघाताचे प्रमाण वाढले आहे. पोरांना शाळेत जाता येत नाही तर सरकार नेमके काय काम करत आहे? कुठे आहे सरकार? असा संतप्त सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे.

**शेतकऱ्यांना मदत करण्याची नियतच नाही**

विजय वडेट्टीवार म्हणाले की, सरकारचा एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे मदत देण्याचा निर्णय दिसतो आहे. केवळ औपचारिकता म्हणून सरकार काल दौऱ्यावर गेले की काय अशी परिस्थिती दिसून आली.

एका व्यक्तीने विचारले किती मदत करणार यावर मुख्यमंत्र्यांनी त्यावर राजकारण करु नका असे सांगितले, याचा अर्थ काय? की मदतीची कुठलीही ठोस भूमिका सरकारने घेतली नाही. जर तुम्ही शेतकऱ्यांच्या बांधावर जात आहात तर मंत्र्याने मुख्यमंत्र्याने किती मदत मिळेल हे का सांगू नये. सरकारची शेतकऱ्यांना मदत करण्याची नियतच नाही, त्यांची नियत केवळ बनवाबनवीची आहे.

**५० हजार हेक्टरी मदत द्या**

विजय वडेट्टीवार म्हणाले की, जर एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या निकषाप्रमाणे गेलो तर ८५०० रुपये प्रती हेक्टरी म्हणजेच दोन हेक्टरपर्यंत मदत करण्याची सरकारची तयारी दिसत आहे. पाच एकर पर्यंतच्या शेतकऱ्यांना केवळ १७ हजार रुपये मदत मिळणार आहे. या मदतीने काय होणार आहे?

संपूर्ण पीक गेले आहे. अशा शेतकऱ्याने जगायचे की मरायचे. या सरकारने पीक विम्याचे वाटोळे केले. निवडणुकीपूर्वी १ रुपयांमध्ये पीक विमा म्हणाले आणि नंतर त्यातून शेतकऱ्यांना काही मिळणार नाही अशा अटी टाकल्या. शेतकऱ्यांना भरपूर मदत व्हावी. ५० हजार रुपये हेक्टरी मदत केल्याशिवाय हा शेतकरी जगूच शकत नाही.

**.. मंत्र्यांनी दिखावा करु नये**

विजय वडेट्टीवार म्हणाले की, केवळ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी दौरा केला, काही जण आपले फोटो लावून मदत करण्याचा दिखावा काही जण करत आहेत. काल लोकांनी हे सामान वापस घेऊन जा असे सांगितले. शेतकऱ्यांच्या रोषाचे कारण सर्व होत्याचे नव्हते झाले आहे. काहीच शिल्लक राहिलेले नाही. जनांवर वाहून गेली आहेत. घरात काहीच राहिले नाही. जमीनी खरडून गेल्या आहेत, अशा परिस्थितीत बांधावर जात दिखावा करु नका, काय मदत करणार आहात हे सरकारने सांगितले पाहिजे. तर शेतकऱ्यांना आधार वाटेल.

## नुकसानग्रस्तांना मदत दिली जाईल... सर्व पंचनामे होणार!

### उद्धव ठाकरेंनी मीडियातून नव्हे, पत्र लिहून सूचना द्याव्यात : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

उद्धव ठाकरे यांचा सल्ला आम्ही ऐकला आहे. एनडीआरएफच्या नियमाप्रमाणे जी काही मदत शेतकऱ्यांना द्यायची असते ती देणार आहोत. उद्धव ठाकरेंना जर काही सांगायचे असेल तर मीडियाच्या माध्यमातून नको, त्यांनी पत्र लिहून आपले म्हणणे मांडले पाहिजे. विरोधी पक्षाची जबाबदारी आहे सरकारला सूचना देणं सरकारकडे मागणी करणे. सरकार त्यांच्या मागणीचा करेल, असे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.



बावनकुळे म्हणाले की, सकाळीच अकोल्याची ही बातमी मी पाहिली. त्यात काही शेतकऱ्यांच्या शेतात पाणी आले आहे. मंडळ अधिकारी म्हणत आहे की माझे शेत आहे माझी काही चूक नाही.

या प्रकरणी विभागीय आयुक्तांना मी आत्ताच चौकशी करायला लावणार आहे, असे अकोला तालुक्यातील पडसोबळे महसूल मंडळाचे अधिकारी आहेत त्यांनी त्यांच्या शेतात बांध बांधला आहे आणि त्यामुळे जवळपास ३०० शेतकऱ्यांच्या शेतात चिखल आणि पूर परिस्थिती आहे, असेही त्यांनी सांगितले.

**मदतीचे वाटप सुरू**

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मदत आणि पुनर्वसनाच्या माध्यमातून जे वाटप करत असतो त्याचे वाटप सुरू करण्यात आले आहे. अनेक जण आपाआपल्या पद्धतीने मदत करण्याचा प्रयत्न करत आहेत. मला असा वाटते की आपत्ती आणि नुकसान फार मोठे आहे यातून मार्ग कसा काढता येईल हा महाराष्ट्र सरकारचा प्रयत्न आहे.

**सर्वच पंचनामे होणार**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सोयाबीनचे पंचनामे सुरू करण्याचे आदेश दिलेले आहेत. सर्व नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सर्वच पंचनामे होणार आहेत. कोणीच असे म्हणू शकत नाही की हे पंचनामे होणार नाही. खरडून गेलेल्या जमिनीचे वेगळे पंचनामे करत आहोत, त्यांना पैसे देण्याचा वेगळा नॉर्म आहे. खरडून गेलेल्या जमिनी चांगल्या करण्यासाठी आम्ही शेतकऱ्यांना मदत करणार आहोत.

**उद्धव ठाकरेंनी पत्र लिहावे**

बावनकुळे म्हणाले की, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी आमच्याही आमदारांनी १ महिन्यांचा पगार देण्याचा निर्णय घेतला आहे. या व्यतिरिक्त एनजीओ च्या सहाय्याने मदत देण्याचा प्रयत्न भाजपचे कार्यकर्ते करत आहेत.

नागपूर, अमरावती मध्ये जे नुकसान झाले त्यांचे पंचनामे आम्ही करणार आहोत. याची पाहणी जिल्हाधिकारी करणार आहेत. उद्धव ठाकरेंचा सल्ला आम्ही ऐकला आहे, एनडीआरएफच्या नियमाप्रमाणे शेतकऱ्यांना जी मदत द्यायची ती देणारच आहोत. उद्धव ठाकरेंनी मिडियाच्या माध्यमातून आपले म्हणणे मांडण्यापेक्षा एक पत्र लिहून मागणी केली पाहिजे.

**मदती मध्ये जाहिरातबाजी येऊ नये**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, घरात पाणी शिरले तर दोन-तीन महिने घर सेटल व्हायला लागतात. लोक काय खातील आणि कसे जगतील हा प्रश्न त्यांच्यासमोर असतो. अशात काहींची संताप होतो, आम्ही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत आहोत.

या आधीही अनेकांनी असे फोटो लावलेत आहेत, काय काय कशी मदत केली होती विरोधकांनी हे सर्वांना माहिती आहे. मदतीत जाहिरातबाजी येऊ नये. पण विरोधकांनीही या आधी अशा जाहिराती केल्या होत्या. विरोधकांनी याआधी दाखवण्यासाठी अनेकदा मदत केली आहे. मदती-मध्ये जाहिरातबाजी येऊ नये.

मदत ही सढळ हाताने करावी आणि दाखवण्यासाठी करण्यात येऊ नये. मतं मिळवण्याचा हा प्रसंग नाही. लोकांना आधार देण्याचे हे काम आहे. जाहिरातबाजी न करण्याची जबाबदारी आपली आहे. पुराच्या काळात मदती मध्ये कोणतेही राजकारण येता कामा नये ही जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचे महसुल मंत्री बानवकुळे यांनी स्पष्ट केले.

## लोकरंजन

### भावबंधांचा मेळ साधणारा स्मार्ट सुनबाई २१ नोव्हेंबरला येणार

नाविन्यपूर्ण संकल्पना आणि उत्सुकतेने सजलेला एक धमाल मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित, कार्तिक दोलताडे पाटील सह निर्मित हास्य, थरार आणि गूढतेने भरलेला एक नवाकोरा सिनेमा स्मार्ट सुनबाई २१ नोव्हेंबर २०२५ ला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. नुकतेच या सिनेमाचे जबरदस्त पोस्टर प्रदर्शित झाले आहे.


या चित्रपटाच्या पोस्टरने प्रेक्षकांच्या मनात औत्सुक्याची ठिणगी पेटवली आहे. पोस्टरवरूनच हे स्पष्ट होते की या कथेत काहीतरी विलक्षण आणि गूढ दडलेले आहे. चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. तर पोस्टर वरील काही कलाकार शहरी लुक मध्ये तर काही कलाकार ग्रामीण लुक मध्ये दिसत आहेत.

याच वैविध्यामुळे प्रेक्षकांच्या मनात एकच प्रश्न निर्माण झाला आहे.

ही स्मार्ट सुनबाई नक्की कोण? आणि तिच्या आयुष्यात असं काय घडणार आहे? रोहन पाटील, संतोष जुवेकर, भाऊ कदम, मोहन जोशी, दीपक शिर्के, अंशुमन विचारे, विनम्र बाबल, सायली देवधर, प्राजक्ता गायकवाड, प्राजक्ता हनमगर, स्नेहल शिदम, किशोरी शहाणे, उषा नाईक, भक्ती चव्हाण, दीप्ती सोनवणे, अनुष्का बेनके, पूजा राजपूत, सुचिका जोशी, विद्या मेहेत्रे, आर्या सकुंडे , वैशाली चौधरी , सपना पवार , कांचन चौधरी यांसारखे दिग्गज आणि लोकप्रिय कलाकार या सिनेमात झळकणार असून, त्यांची केमिस्ट्रीच या चित्रपटाची खरी जमेची बाजू ठरणार आहे . प्रत्येक सुनेला स्मार्ट सुनबाई होण्यासाठी हा चित्रपट नक्कीचं प्रेरणादायी ठरेल अस दिग्दर्शक शिवाजी दोलताडे यांनी सांगितले. ■ ■




### बॉक्स ऑफिसवर दिसली 'दशावतार' ची ताकद!




मराठी सिनेसृष्टीतील सर्वात भव्य चित्रपट म्हणून गाजत असलेल्या झी स्टुडियोज प्रस्तुत 'दशावतारने प्रदर्शित होताच बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे.

सर्वत्र प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असून थिएटरमध्ये दशावतारची जादू अनुभवण्यासाठी गर्दी उसळली आहे.

चित्रपट समीक्षक, मराठी सिनेसृष्टी, प्रेक्षकांकडून या चित्रपटावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. प्रदर्शनाच्या पहिलत्या तीन दिवसांतच या चित्रपटाने तब्बल ५ कोटी २२ लाख रुपयांचा गल्ला जमवला असून तो प्रेक्षकांची मने जिंकण्यात यशस्वी झाला आहे.

प्रदर्शनापुर्वीच चित्रपटाने सर्वत्र चांगली हवा निर्माण केली होती. पोस्टरपासूनच चित्रपटाबद्दल निर्माण झालेलं कुतुहल पुढे टिझरमधून अधिकच वाढलं आणि नंतर आलेल्या ट्रेलरमुळे ही उत्सुकता शिगेला पोहोचली. त्याचीच प्रचिती चित्रपट प्रदर्शनानंतर मिळणाऱ्या प्रतिसादातून बघायला मिळत आहे.

सुरुवातीला तब्बल ३२५ स्क्रिन्समधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेल्या दशावतारचे ६०० शो होते, शनिवारी हा आकडा ८०० एवढा झाला तर रविवारी यामध्ये वाढ होऊन तो ९७५ शो असा झाला. सर्वत्र हाऊसफुल्ल बोर्ड झळकत असून प्रेक्षकांकडून 'दशावतार' ला प्रचंड दाद मिळत आहे. दशावतारच्या माध्यमातून प्रेक्षकांना कोकणातील समृद्ध संस्कृती, परंपरा आणि लोककलेचा अप्रतिम संगम पाहायला मिळत आहे. चित्रपटाचे कथानक प्रेक्षकांना खिळवून ठेवत असून, कलाकारांचा दमदार अभिनय प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे. यासोबतच गाणी, देखावे आणि दिग्दर्शनातील भव्यता ही चित्रपटाची खरी ताकद ठरली आहे. ■ ■

### स्टार परिवार अवॉर्डस्‌च्या दिमाखदार सोहळ्यासह स्टार प्लसची गौरवशाली २५ वर्षे

भारतातील एक अत्यंत लोकप्रिय मनोरंजन वाहिनी स्टार प्लसने स्टार परिवार अवॉर्डस 2025 या बहुप्रतीक्षित सोहळ्यासह आपली वार्षिक परंपरा साजरी केली. या वाहिनीवरील लाडक्या मालिका आणि व्यक्तिरेखा यांचा गौरव करण्यासाठी या पुरस्कारांचे आयोजन दर वर्षी करण्यात येते.




पण यंदा हा सोहळा अधिक भव्य आणि रोमांचक होता कारण एक ऐतिहासिक टप्पा या वाहिनीने पूर्ण केला आहे. स्टार प्लसने एन्टरटेन्मेंट उद्योगात २५ वैभवशाली वर्षे पूर्ण केली आहेत. रौप्य महोत्सवी वर्षाचा दुहेरी आनंद साजरा करणाऱ्या या सोहळ्यात उत्साह, नेत्रदीपक परफॉर्मन्सेस आणि जुन्या आठवणींचे सुंदर आणि अभिमानाचा अनुभव देणारे अविस्मरणीय क्षण होते. एका विशेष प्रेस कॉन्फरन्सद्वारे या सोहळ्याची सुरुवात झाली. त्यानंतर उलगडलेल्या कार्यक्रमामुळे हा पुरस्कार सोहळा अत्यंत संस्मरणीय ठरला.स्टार प्लसच्या प्रवासाचा अविभाज्य असलेल्या टेलिव्हिजनवरील लोकप्रिय नामवंतांच्या उपस्थितीमुळे रेड कार्पेट चमकून उठले.

उर्वशी ढोलकिया, श्वेता तिवारी, आपले पती विवेक दहियासह आलेली दिव्यांका त्रिपाठी, शिवांगी जोशी, करण मेहरा, अमर उपाध्याय, रागिणी खन्ना, जय सोनी, जिया मानेक, रोनित रॉय, हर्ष राजपूत, करण पटेल वगैरे मान्यवरांनी या कार्यक्रमाची शोभा वाढवली. या भव्यतेत भर घालत होते स्टार प्लसचे इतर अनेक लाडके चेहरे, जसे की, रूपाली गांगुली, समृद्धी शुक्ला, मेघा चक्रवर्ती, कमर राजपाल, कंवर ढिल्लों, नेहा हरसोरा, श्रीतमा मित्रा, पुनीत चौकसे, अद्रिजा रॉय, शिवम खजुरिया, दिव्या पाटील, राजन शाही आणि इतर अनेक कलाकार. या सर्वांच्या उपस्थितीमुळे ही खरोखर एक तारकांनी चमचमणारी रात्र दिसत होती.या रौप्य महोत्सवी समारंभात दमदार परफॉर्मन्स, भावनिक विजयाचे क्षण आणि आनंदोत्सव पाहण्यासाठी पहात रहा स्टार प्लस. ■

### नव्याने उभी राहिली सुरेखा कुडची

नवरात्री म्हणजे स्त्रीशक्ती, धैर्य आणि प्रेरणेचं प्रतीक. या नऊ दिवसांत देवीच्या विविध रूपांची आराधना करताना प्रत्येक महिलेला आपलं सामर्थ्य जाणवतं. प्रत्येक स्त्री मध्ये एक नवदुर्गा दडलेली असते कठीण प्रसंगावेळी स्त्रीमधील शक्ती त्या प्रसंगाशी सामना करते.

'सन मराठी' वरील 'जुळली गाठ गं' या मालिकेत दामिनी मुजुमदार हे पात्र साकारणाऱ्या सुप्रसिद्ध अभिनेत्री सुरेखा कुडची यांनी नवरात्री उत्सवानिमित्त त्यांच्या आयुष्यातील कठीण प्रसंग सांगितला आहे. अभिनेत्री सुरेखा कुडची म्हणाल्या की, "नवरात्री म्हंटल की एक वेगळीच ऊर्जा अनुभवायला मिळते. प्रत्येक स्त्रीमध्ये प्रचंड शक्ती असते.

कठीण प्रसंगाला कसं सामोरं जायचं आणि कुटुंबाचं रक्षण कसं करायचं हे तिला उत्तम ठाऊक असतं. स्त्री स्वतःसाठी कमी आणि कुटुंबासाठी जास्त जगते, त्यामुळे माझा प्रत्येक स्त्रीला तिच्या सामर्थ्यार्ला सलाम आहे. माझ्या आयुष्यात अनेक अडचणी आल्या, पण ज्याने मला नव्याने जगायला शिकवलं तो प्रसंग म्हणजे माझ्या पतीचं निधन. त्या क्षणी मी खूप खचून गेले. हातात अडीच वर्षांची मुलगी आणि



पतीचं जाणं सहन करणं खूप कठीण होतं. प्रत्येक स्त्रीसाठी पुरुषाचा आधार महत्त्वाचा असतो. मी स्वतःच्या पायावर उभी होते, तरीही सोबतीची उणीव जाणवत होती. त्या प्रसंगातून बाहेर पडायला मला जवळपास सहा महिने लागले.

त्या काळात माझ्या कुटुंबाने खूप आधार दिला. माझ्या बहिणीने सांगितलं, पुन्हा कामाला सुरुवात कर, आता तुला तुझ्या मुलीसाठी खंबीर राहावं लागेल. त्यानंतर मी नव्या जोमाने काम सुरू केलं. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## बिबट्याने घेतला चिमुकल्याचा बळी

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. २५ :

वनपरिक्षेत्र कार्यालय गोठणगाव नजीकच्या संजय नगर येथे आज गुरूवारी पहाटे पाच वाजता घरालगत लघुशंकेला गेलेल्या चिमुकल्यावर बिबट्याने हल्ला केला. यात त्याचा जागीच मृत्यू झालो. वंश प्रकाश मंडल (वय ५) असे त्याचे नाव आहे.



वंश आज पहाटे अंगणात लघुशंकेला गेला असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने झडप घातली. जवळ असलेल्या आजीने आरडाओरड केली, आजूबाजूच्या नागरिकांनी धाव घेतली. बिबट वंशला घेवून जंगलाकडे गेला. मात्र, आरडाओरड ऐकून वंशला जागेवरच टाकून पसार झाला. गावकऱ्यांनी वंशला प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी येथे नेले. मात्र त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले.

वन्य प्राणी बिबट्या लहान मुलांना टार्गेट करत आहेत. घटनेच्या दिवशी मृत मुलाचे आईवडील कामानिमित्त बाहेर होते. तो चिमुकला आपल्या आजी सोबत घरी होता. वन विभागाने आर्थिक मदत देवून त्या हल्लेखोर वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली जात आहे.

## ताडोबाचे प्रवेश शुल्क कमी करा..

### खासदार धानोरकर यांची मागणी : आंदोलनाचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २५ :

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे प्रवेश शुल्क सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर आहे. विशेषतः शनिवार-रविवारसाठी कोर झोनमधील तब्बल १२,६०० चे शुल्क स्थानिक लोकांसाठी ताडोबा दर्शन केवळ एक स्वप्न बनवत आहे. गरीब आणि सर्वसामान्यांनी व्याघ्र सफारी करू नये का, त्यांनी जंगलात जावून वाघ बघूच नये का? असा प्रश्न उपस्थित करित तातडीने शुल्क कमी करा अन्यथा १ ऑक्टोबरपासून तीव्र आंदोलनाचा इशारा देणारे पत्र खा. प्रतिभा धानोरकर यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना लिहिले आहे.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाकडे जगातील पर्यटक आकर्षित झाला आहे. ताडोबा प्रकल्पातील वाघ, बिबट तसेच इतर वन्यप्राण्यांमुळेच पर्यटक येथे येत आहेत. मात्र ताडोबा व्यवस्थापनाने व्याघ्र सफारीत भरमसाठ वाढ केली आहे. त्यामुळे ताडोबातील व्याघ्र सफारी ही गरीब, मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्यांच्या अवाक्याबाहेरची झाली आहे.



खासदार प्रतिभा धानोरकर यांनी वनमंत्र्यांना इशारा दिला आहे की, १ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या नवीन पर्यटन हंगामापूर्वी स्थानिक नागरिकांसाठी शुल्क कपातीचा निर्णय लागू झाला नाही, तर १ ऑक्टोबर रोजी ताडोबात एकही जिप्सी आत जाऊ दिली जाणार नाही. हा इशारा केवळ एक मागणी नसून, चंद्रपूरच्या नागरिकांच्या हक्कांसाठी उभारलेले हे मोठे आणि निर्णायक आंदोलन असेल, असे खासदार प्रतिभा धानोरकर यांनी ठामपणे सांगितले आहे.

त्याचा परिणाम चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. विशेषतः शनिवार-रविवारसाठी कोर झोनमधील तब्बल १२ हजर ६०० चे शुल्क स्थानिक लोकांसाठी ताडोबा दर्शन केवळ एक स्वप्न बनवत आहे. याच पार्श्वभूमीवर, जिल्ह्याच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना कठोर भाषेत पत्र लिहून तातडीने शुल्क कपातीची मागणी केली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मानव-वन्यजीव संघर्ष आहे. नागरिक वाघांच्या हल्ल्यांमुळे जीव गमावत असताना, त्याच जिल्ह्यातील लोकांना वाघाचे दर्शन घेण्यासाठी हजारो रुपये मोजावे लागत आहेत. वाघाच्या हल्ल्यात जीव स्थानिकांनी गमवायचा आणि पैसे खर्च करून जिप्सीत बसून व्याघ्र सफारी बाहेरच्या पर्यटकांनी आनंदाने करायची, वाघ आम्ही वाचवायचे प्रसंगी आम्ही जीव द्यायचा, मात्र आमच्या जीवावर देशविदेशातील पर्यटकांनी मौज करायची हा कुठला न्याय असाही प्रश्न उपस्थित केला आहे.

## पोलीस ठाण्यावरच चालला बुलडोझर



■ महासागर प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २५ :

बांधकाम अनधिकृत असल्याच्या कारणावरून येथील अवधूतवाडी पोलीस ठाण्याच्या इमारतीवर बुलडोझर चालविण्यात आला. उच्च न्यायालयाच्या आदेशावरून ही कारवाई करण्यात आली. पोलीस ठाण्यातील बांधकाम पाडण्याची राज्यातील ही पहिलीच घटना असावी.

गेल्या सात आठ वर्षांपूर्वी येथील गोधणी मार्गावरील अवधूतवाडी पोलीस ठाण्याच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले. मात्र या बांधकामासाठी समाजविघातक लोकांकडून वर्गणी गोळा करण्यात आली. याबाबत सामाजिक कार्यकर्ते दिगांबर पचगाडे यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायालयाने ही अवैध बांधकाम झालेली पोलीस ठाण्याची इमारत पाडण्याचे आदेश दिले होते.

इमारत पाडण्यासाठी ३० सप्टेंबर २०२५ ही अंतिम मुदत दिली होती. त्यामुळे अवधूतवाडी पोलीस ठाण्याची इमारत पाडण्याचे काम सुरू करण्यात आले. ही इमारत पूर्णपणे पाडून त्याबाबतचा कार्यपूर्ती अहवाल आता पोलिसांना उच्च न्यायालयात सादर करावा लागणार आहे. परंतु, एखाद्या पोलीस ठाण्याच्या इमारतीचे बांधकाम अवैध असणे आणि ते न्यायालयाच्या आदेशाने पाडावे लागणे, ही महाराष्ट्रातील पहिलीच घटना ठरली आहे.

## बॅड्‌स ऑफ बॉलिवूडचे विवादित पात्र समीर वानखेडेशी संबंधीत?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :



दिल्ली हायकोर्टात समीर वानखेडे यांनी शाहरुख खानच्या रेड चिलीस इंटरटेनमेंट आणि नेटफ्लिक्सच्या विरोधात याचिका दाखल केली आहे. यामध्ये बॅड्‌स ऑफ बॉलिवूड वेबसिरीजमध्ये त्यांच्याशी संबंधित पात्र दाखवून एनसीबी आणि त्यांच्या प्रतिमेची मानहानी झाली असल्याचा आरोप आहे.

याचिकेत म्हटले आहे की, त्या पात्राच्या तोंडून सत्यमेव जयते डायलॉग नंतर आक्षेपार्ह दृश्य दाखवण्यात आले आहे, ज्यामुळे सत्यमेव जयतेची विटंबना केली गेल्याचा दावा करण्यात आला आहे. समीर वानखेडे यांनी जवळपास २ कोटींची मानहानीची याचिका दाखल केली असून, ही रक्कम वसूल झाल्यास कॅन्सरग्रस्त रुग्णांना मदत करण्यासाठी वापरण्यात येईल, असेही याचिकेत नमूद करण्यात आले आहे. शाहरूख खानच्या मुलाला ड्रग्ज प्रकरणी अटक केल्यानंतर समीर वानखेडे देशभरात प्रकाश झोतात आले होते.

### हरविले आहे



व्यक्तीचे नाव - कृष्णा विलासराव राऊत वय १५ वर्ष राहणार अवघड वार्ड अर्धी तालुका आर्वी जिल्हा वर्धा.

वर्णन- उंची ४ फूट ६ इंच, बांधा सडपातळ, रंग गोरा, डाव्या हातावर K नाव गोंदलेले, अंगात काळ्या रंगाची टी-शर्ट, काळ्या रंगाचा लोअर फुल पॅन्ट, पायात काळ्या रंगाची स्लीपर चप्पल

याला दिनांक - ०८/०५/२०२४ रोजी दुपारी १२/०० वाजता दरम्यान कोणीतरी फुस लावून पळवून नेले आहे. त्यावरून पोलीस स्टेशन आर्वी येथे अपराध क्रमांक ४३८/२५ कलम १३७ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद असून तपासावर आहे. वरील वर्णनाचा मुलगा कुठे आढळून आल्यास पोलीस स्टेशन आर्वी येथे संपर्क करावा.

संपर्क क्रमांक - पोलीस उपनिरीक्षक संदीप चव्हाण : ९५२७६८६९३६

विलासराव राऊत : ९९७०७६६२९८

महासागर
नागपूर
# वृत्तसागर
■ शुक्रवार, दि. २६, सप्टेंबर २०२५ ■



# सर्व भूमीपुत्रांना सामावून घेणार !




## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

विकासाचा परिघ विस्तारत नागपूर शहर आता नव्या नागपूरच्या स्वरुपात आकारास येऊ घातले आहे. यासाठी लाडगाव, गोधनी रिठी या भागात विस्तारणाऱ्या नव्या नागपूरबद्दल सर्वांना उत्सुकता आहे. या भागातील बहुतांश शेतकरी हे गुमगाव येथे वास्तव्यास आहेत. हे नवे महानगर साकारतांना ज्यांच्या जमिनी या प्रकल्पासाठी जाणार आहेत त्यांना कायद्याच्या कक्षेमध्ये अधिकाधिक योग्य मोबदला मिळावा याद्दष्टीने प्रयत्नांची भूमिका नागपूर महानगर विकास प्राधिकरणाची आहे. यासंदर्भात जे शक्य असेल ते देण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

नवीन नागपूर संदर्भात जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस लाडगाव, गोधनी रिठी येथील शेतकरी, आमदार कृपाल तुमाने, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त संजय मिणा, पोलीस उपायुक्त निकेतन कदम, सहआयुक्त सचिन ढोले पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रविण महिरे, धनराज आष्टनकर, किशोर आष्टनकर, प्रेमनाथ लोणारे व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आमचा नवीन नागपुरला विरोध नसून या विकासात आम्हालाही सहभागी व्हायचे आहे. या विकासासाठी ज्या जमिनी लागत आहेत त्यातील काही प्लॉट नियमाच्या चौकटीप्रमाणे आम्हालाही मिळावे. या विकासात आम्हाला समावून घ्या, असे शेतकरी प्रतिनिधी किशोर आष्टनकर यांनी सांगितले.

नव्या नागपुरसाठी ज्यांच्या जमिनी घेतल्या जाणार आहेत अशा शेतकऱ्यांची एक प्रतिनिधीक पाच सदस्यांची समिती तयार करावी. या समितीशी नागपूर विकास प्राधिकरण, नागपूर सुधार प्रन्यास व महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी यांच्याशी ही समिती चर्चा करेल. शासनाची भूमिका ही नियमांच्या तरतूदीनुसार जास्तीत जास्त लाभ देण्याचा प्रयत्न करेल असे या बैठकीत सांगण्यात आले.

नागपूर सुधार प्रन्यास अंतर्गत अनेक भागात गुंठेवारी पध्दतीने घेतलेल्या जागेवर लोक अनेक वर्षापासून वास्तव्य करीत आहेत. काही गुंठेवारीतील भूखंड आरक्षणामुळे बाधीत झालेले आहेत. गुंठेवारी अंतर्गत असलेल्या अभिन्यासात नगर भूमापन विभागाने मोजणी केल्यानंतर त्याच्या नियमितीकरणाची कार्यवाही सुरु होते. सदर कार्यवाहीत असणाऱ्या अडचणी व लागणारा विलंब लक्षात घेऊन मानीव नियमितीकरण बाबत लवकरच शासन धोरण निश्चित करत असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. यात आवश्यक ती कार्यपध्दती निश्चित केली जात असून गुंठेवारीत असलेल्या सर्वांना याचा दिलासा मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नागपूर महानगराचा विचार करता गुंठेवारीच्या मोजणीचे अधिकार नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर महानगर विकास प्राधिकरणाला देण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. याबाबत जमाबंदी आयुक्तांना तसा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी दिले. मोजणीसाठी जे लागणारे मनुष्यबळ आहे ते निवृत्त झालेले मोजणी अधिकारी, या क्षेत्रातील अनुभवी लोकांचे पॅनल करुन नियमानुसार याला गती देण्याबाबत निर्णय घेतला जाईल असे त्यांनी बैठकीत सांगितले.

नागपूर सुधार प्रन्यास संदर्भात विविध विकास कामासंदर्भात त्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे बैठक झाली. या बैठकीस खासदार श्यामकुमार बर्वे, विधान परिषद सदस्य कृपाल तुमाने, आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रविण दटके व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनाची दीक्षाभूमीवर जय्यत तयारी

## ५६ सीसीटीव्ही कॅमेरे, एक हजार शौचालये आणि ११० बसेसची व्यवस्था

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशाच्या विविध भागातून लाखो भाविक दीक्षाभूमीला भेट देणार असल्यामूळे जिल्हा प्रशासनातर्फे आवश्यक सर्व सुविधा येत्या ३० सप्टेंबर पूर्वी पूर्ण करतानाच नागरिकांची गैरसोय होणार नाही तसेच सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज दिल्या. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात प्रशासनाच्या विविध यंत्रणांकडून करण्यात येत असलेल्या व्यवस्थेचा आढावा विभागीय आयुक्त बिदरी यांनी घेतला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सचिव डॉ. राजेंद्र गवई, विश्वस्त विलास गजघाटे, सदस्य सुधीर फुलझेले, डॉ. प्रदीप आगलावे यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीणा तसेच पोलीस, महसूल, परिवहन, आरोग्य, अन्न व प्रशासन आदी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

संपूर्ण देशातून मागील वर्षीप्रमाणे १० ते १२ लाखांपेक्षा जास्त नागरिक उपस्थित राहतील. याद्दष्टीने व्यवस्था करतांना विविध यंत्रणांनी समन्वयाने संपूर्ण जबाबदारी पार पाडावी, अशी सूचना बिदरी यांनी यावेळी केली. येणाऱ्या भाविकांसाठी पिण्याच्या पाणी, शौचालय व स्वच्छतेसंदर्भात महानगपालिकेतर्फे व्यवस्था करण्यात आली आहे. दीक्षाभूमी परिसरात यासाठी १२० तात्पुरते नळ उभारण्यात आले असून भोजनदान करणाऱ्या संस्थांसाठी अतिरिक्त ७ टॅंकर सज्ज ठेवण्यात आले आहे. दीक्षाभूमी परिसरात माता कचेरी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आदी परिसरात ९९२ शौचालय उभारण्यात येणार आहे. त्यासोबतच मोबाईल शौचालयाची सुविधा राहणार आहे. पावसाच्या द्दष्टीने परिसरातील शाळांमध्ये राहण्यासाठी अतिरिक्त सुविधा निर्माण करण्यात येत असल्याची माहिती महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी दिली.

दीक्षाभूमी परिसरात सुरक्षेच्या द्दष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत असून मोबाईल टॉवर सुद्धा उभारण्यात आला आहे. संभाव्य गर्दीच्या नियंत्रणासाठी व सुरक्षेच्याद्दष्टीने स्टॉलवर खाद्य पदार्थ तयार करण्यासाठी सिलेंडर, इतर ज्वलनशील साहित्य ठेवता येणार नाही, अशी सूचना जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी दिली. दीक्षाभूमी येथील स्तूपाकडे प्रवेश तसेच दर्शनानंतर बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. व्यवस्थेसंदर्भातील संपूर्ण माहिती सोशल मीडिया व डॅशबोर्डवर उपलब्ध राहणार आहे. रेल्वे स्टेशन व बसस्टॅण्ड तसेच ड्रॅगन पॅलेसला भेट देण्यासाठी परिवहन विभागातर्फे ११० बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. नागपूर शहरातील भाविकांसाठी ११ मार्गांवर ३० सप्टेंबर पासून आपली बस सुरू करण्यात येणार आहे. भाविकांनी या व्यवस्थेचा वापर करावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.

आरोग्य विभागातर्फे रेल्वे स्टेशन, बसस्थानक तसेच परिसरातील महत्वाच्या ठिकाणी वैद्यकीय व्यवस्था सज्ज ठेवण्यात आली आहे. पोलिस विभागातर्फे दीक्षाभूमी परिसरात एक हजारपेक्षा जास्त अधिकारी व कर्मचारी सुरक्षेच्याद्दष्टीने नियुक्त करण्यात आले आहे.

अग्निशमन यंत्रणा, वाहनतळ तसेच हरवलेल्या व्यक्तींसंदर्भातील माहिती देण्यासाठी पोलीस नियंत्रण कक्ष व महानगरपालिकेच्या नियंत्रण कक्षाद्वारे सुविधा राहणार आहे. यावर्षी मागील वर्षापेक्षा जास्त भाविक उपस्थित राहतील, याद्दष्टीने व्यवस्था सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. दीक्षाभूमी स्मारक समितीच्या वतीने दीक्षाभूमी परिसरात ३५० पेक्षा जास्त पुस्तक विक्रीसाठी स्टॉलची व्यवस्था करण्यात आली आहे.

# रोकडे ज्वेलर्सच्या भव्य शोरूमचे आज उद्घाटन




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

रोकडे ज्वेलर्स आज सकाळी ६:०० वाजता विदर्भातील पहिल्या वेळेस अशा लवकर सकाळी खुल्या होणाऱ्या महाल शो-रूमच्या दरवाज्या उघडत ऐतिहासिक पाऊल टाकत आहे. हा भव्य उद्घाटन सोहळा ग्राहक आणि दागिन्यांच्या चाहत्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव देणार आहे.

अचूक २५ वर्षांपूर्वी, रोकडे ज्वेलर्सने महालमध्ये आपला पहिला फ्लॅगशिप शो-रूम सुरू केला, ज्यामुळे ते विदर्भातील दागिन्यांच्या संस्कृतीचे केंद्र बनले. आज, हा वारसा एक भव्य नव्या रूपात पुन्हा सादर केला जात आहे: १६,००० चौ.फु. क्षेत्रफळ असलेला शो-रूम, जो विदर्भातील सर्वात मोठा दागिन्यांचा गंतव्यस्थळ ठरतो, आणि लक्झरी व सेवा यामध्ये नवे मानक स्थापित करतो.

पाच पिढ्यांपासून चालणारा हा कुटुंबीय व्यवसाय महाल, इतवारी, एअरपोर्ट, लक्ष्मीनगर, हिंगणा, कोराडी, भंडारा येथे विस्तारला असून लवकरच गोंदिया येथे देखील येणार आहे. विश्वास, गुणवत्ता, वैविध्य, सेवा आणि पारदर्शकता या मूल्यांनी मार्गदर्शित, रोकडे ज्वेलर्स अनेक पिढ्यांसाठी विश्वासार्हता आणि उत्कृष्टतेचे प्रतीक राहिले आहे. भव्य उद्घाटन सोहळ्यात खास सेलिब्रिटी उपस्थितीही राहणार आहे प्राजक्ता माळी दुपारी १२:०० वाजता आणि सोनाली कुलकर्णी सायंकाळी ५:०० वाजता, ज्यामुळे या ऐतिहासिक प्रसंगात ग्लॅमरची भर पडणार आहे.

### एका दिवसासाठी खास ऑफर्ससह ऐतिहासिक सोहळा

सकाळी ६:०० वाजता येणाऱ्या पहिल्या ग्राहकांसाठी सोनं व चांदीच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ६०% सूट. आणि नंतर प्रत्येक तासाला ५% ने कमी होऊन दुपारी १२:०० वाजता ३०% पर्यंत पोहोचेल व दिवसभर तशीच राहील. डायमंड दागिन्यांवर दिवसभर मेकिंग चार्जेसवर १००% सूट. मासिक बचत योजना सुरु करणाऱ्या ग्राहकांना पाहिल्या हप्ता/किस्तीवर २५% सूट.

"हा फक्त शो-रूम नाही हा २५ वर्षांच्या विश्वास, निष्ठा आणि ग्राहकांच्या साथ यांचा उत्सव आहे. आम्ही सर्वांचे स्वागत करतो की हे ऐतिहासिक क्षण अनुभवावा आणि वारसा व आधुनिकतेचे अप्रतिम मिश्रण पाहावे, असे रोकडे ज्वेलर्सच्या व्यवस्थापनाने सांगितले. सकाळी ६:०० वाजता महाल शो-रूम, बडकास चौक, नागपूर येथे या ऐतिहासिक साजऱ्याचा भाग बना.

# खंडणी मागणारा गुंड गजाआड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

कॅफे मालकाला तलवारीच्या धाकावर धमकावून खंडणी मागणाऱ्या गुंडाला कळमना पोलिसांनी अटक केली आहे. मोहम्मद अयूब उर्फ सोनू मोहम्मद शफीक (२७) रा. भवानीनगर, जुनी कामठी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. फियार्दी आनंदसागर विद्यार्थी पांडे (२६) रा. बालाजीनगर, कळमना याचे जुन्या कामठी रोडवर नाका क्र. ४ जवळ बॅक बेंचर कॅफे नावाने रेस्टॉरंट आहे. गत गुरूवारी सोनू पांडेच्या कॅफेत आला. तलवारीचा धाक दाखवून कॅफे चालवायचा असेल तर ३ हजार रुपये खंडणी मागितली. पैसे मिळाले नाहीतर जिवे मारण्याची धमकी देऊन तो निघून गेला. त्याने घटनेबाबत चूप राहणेच योग्य समजले.

# शरद मैंदला ३० पर्यंत पीसीआर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

हमीदार (गॅरंटर) म्हणून आलेल्या लोकांची मूळ कागदपत्रे घेऊन त्यांच्या नावावर ६ कोटी ६८ लाखांच्या बनावट कर्जाची नोंद केल्याप्रकरणी अजनी पोलिसांनी शरद अप्पा मैंद (५२) रा. पूसद याच्यावर गुन्हा दाखल करून हे प्रकरण गुन्हे शाखेकडे वर्ग केले आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने गुरूवारी मैंद याला न्यायालयात हजर केले असता त्याची ३० सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी करण्यात आली.

बांधकाम व्यावसायी फियार्दी चंद्रसेन गयाप्रसाद यादव (४३) रा. सावंगी मेघे, वर्धा यांच्या तक्रारीवरून मैंदविरुद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला. चंद्रसेन यांची व्हीएमव्ही होम्स आणि सुंदर इफ्रो नावाची फर्म आहे. एफआयआरनुसार, भारती मैंद नागरी सहकारी पतसंस्था, पूसदची एक शाखा नरेंद्रनगरात आहे. या पतसंस्थेत शरद मैंद संचालक आहे. फियार्दी चंद्रसेन यांना कर्जाची आवश्यकता होती. २०२३ मध्ये ते भारती मैंद सहकारी पतसंस्थेत गेले. मैंद याने चंद्रसेन यांना हमीदार म्हणून ओळखीचे लोक आणण्यास सांगितले. चंद्रसेन यांनी आणलेल्या ओळखीच्या १८ लोकांकडून त्याने आधार कार्ड, पॅन कार्ड व इतर कागदपत्रे जमा केली. तसेच त्यांच्या कोऱ्या कागदावर स्वाक्षऱ्या घेतल्या. त्यानंतर पतसंस्थेने चंद्रसेन यांना १ कोटी ९५ लाखांचे कर्ज मंजूर केले. त्यापैकी १ कोटी ८ लाखांचे कर्ज २०२५ मध्ये देण्यात आले. मात्र, चंद्रसेन यांनी जे ओळखीचे लोक आणले होते, त्यांच्या कागदपत्रांचा गैरवापर करून त्यांना कर्ज दिल्याची नोंद करून त्या सर्वांची फसवणूक करण्यात आली. पोलिस कोठडी दरम्यान हमीदार म्हणून आलेल्या अशा किती लोकांची मूळ कागदपत्रे घेऊन त्यांच्या नावावर कर्जाची नोंद केली, याचा तपास गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सागडे करीत आहेत.

# 3 एमडी तस्कर पोलिसांच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

सोनेगाव पोलिस व गुन्हे शाखा युनिट ५ च्या पथकाने वेगवेगळ्या कारवाईमध्ये एमडी पावडर विक्रीसाठी जात असलेल्या तस्करांच्या मुसक्या आवळल्या. शरद कातलाम (२४) रा. चिंचभवन आणि मुकेश ऊर्फ राजा ठाकरे (२७) व राजा मानकर (२३) दोन्ही रा. पारडी असे अटकेतील तस्करांची नाव आहेत. शरद हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर चोरी, घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. न्यायालयाने त्याला पोलिस कोठडी सुनावली आहे. सोनेगाव ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन मगर यांना गोपनीय माहिती मिळाली की, शरद अमली पदार्थाची विक्री करतो. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी शरद याच्यावर पाळत ठेवली. दरम्यान तो दुचाकीने कोणाला तरी अमली पदार्थ देण्यासाठी जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याला पकडण्यासाठी सापळा रचण्यात आला.

# मैत्रिणींवर पैसे उधळण्यासाठी विद्यार्थी बनला चोर

### घरफोडीचे ९ गुन्हे उघडकीस, दागिन्यांसह २० लाखांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २५ :

बी.एस्सी.च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याने मित्र-मैत्रिणींना प्रभावित करण्यासाठी चोरीचा मार्ग पत्करला. चोरीचा माल विकून मिळालेले पैसे मित्र, मैत्रिणींवर उधळायचा. तसेन नव-नवीन मोबाईल, कपडे खरेदी करायचा आणि कारने फिरायचा. मात्र, विनाक्रमांकाच्या दुचाकीने फिरत असताना गुन्हे शाखेच्या पथकाने त्याच्या मुसक्या आवळल्या. त्याच्याकडून १७ तोळे दागिन्यांसह २० लाख १३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत त्याच्याकडून ५ ठाण्यांच्या हद्दीतील घरफोडींचे ९ गुन्हे उघडकीस आले. नमन पेठे (१९) रा. शारदानगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

नमन एका नामांकित महाविद्यालयाचा बी.एस्सी. प्रथम वर्षाचा विद्यार्थी आहे. त्याला आई-वडील आणि एक मोठी बहीण आहे. वडील खाजगी काम करतात. महाविद्यालयात गेल्यापासून नमनमध्ये कमालीचा बदल झाला होता. महाविद्यालयातील मुलींकडे त्याचा अधिक कल होता. त्याची मैत्रीसुद्धा झाली. मात्र, मित्र, मैत्रिणींना प्रभावित करण्यासाठी त्याच्याजवळ पाहिजे तेवढे पैसे नव्हते. यासाठी त्याने चोरीचा मार्ग पत्करला. त्याने बेलतरोडी, अजनी, हुडकेश्वर, सक्करदरा, प्रतापनगर ठाण्यांच्या हद्दीत लागोपाठ घरफोड्या केल्या. या ठिकाणांहून त्याने तब्बल १८.५० तोळे दागिने आणि ७८ हजार रोख चोरली. वितळवून दागिने कवडीमोल भावात सोनाराला विकले. मिळालेल्या ३ लाखांवर त्याने मौजमस्ती केली. मोबाईल, नवीन कपडे खरेदी केले. मित्र, मैत्रिणींना दररोज पार्टी दिली. दररोज भाड्याने नव-नवीन कार घेऊन मित्र, मैत्रिणींना फिरायला घेऊन जात होता. हॉटेलिंग, पार्टी आणि मौजमस्ती करीत त्याने आनंदात दिवस घालवत होता. पाचही पोलिस ठाण्यांत तक्रार होती. मात्र, आरोपी सापडत नव्हता. गुन्हे शाखा युनिट ४ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कमलाकर गड्डीमे आणि त्यांचे पथक या गुन्ह्यांचा समांतर तपास करीत होते.

## वोक्हार्ट हॉस्पिटलच्या सर्व्हेतून धक्कादायक निष्कर्ष

# मध्यमवयीन आणि तरुण रुग्णांमध्ये वाढला हृदयरोगाचा धोका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :




जबाबदार कॉर्पोरेट म्हणून वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर यांनी नागपूर व आसपासच्या भागातील डॉक्टरांमध्ये एक महिन्याचे हार्ट हेल्थ इन्साईट्स सर्व्हेक्षण केले. यात कार्डिओलॉजिस्ट, जनरल प्रॅक्टिशनर्स आणि रेसिडेंट मेडिकल ऑफिसर्स (आरएमओ) सहभागी झाले. या सर्व्हेमुळे मध्ये भारतातील हृदयविकाराशी संबंधित आव्हानांचे संपूर्ण चित्र समोर आले.

या सर्वेक्षणातून निघालेला निष्कर्ष चिंताजनक आहेत: हृदयरोग आता फक्त वृद्धांपुरता मर्यादित राहिलेला नाही. बहुतांश डॉक्टरांच्या मते ४१ ते ६० वयोगटातील रुग्णांची संख्या जास्त आहे, तर अनेकांनी ३० वर्षांच्या आसपासच्या तरुणांमध्येही हृदयरोगाचे प्रकरणे वाढल्याचे नमूद केले.

वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरचे सिनियर कार्डिओलॉजिस्ट डॉ.नितीन तिवारी यांनी सांगितले की आज तणावपूर्ण नोकऱ्या, चुकीची जीवनशैली आणि वेळेवर तपासणी न केल्यामुळे तरुण रुग्ण हृदयविकाराच्या झटक्याने हॉस्पिटलमध्ये दाखल होत आहेत. हा एक मोठा इशारा आहे," असे सांगितले.

झोपेची गुणवत्ता कमी होते आणि यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो असे वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरचे सिनियर सीव्हीटीएस सर्जन डॉ. सुमित नारंग यांनी सांगितले.

"शहरीकरण, बसून काम करण्याची सवय, पोटाभोवती वाढलेली चरबी, आहारातील बदल, वाढते प्रदूषण, ताण, अपुरी झोप, लवकर सुरू होणारा मधुमेह आणि आनुवंशिक कारणे आहेत.

कार्डिओलॉजिस्ट डॉ. दिनेश पडोळे यांनी सांगितले. जागरूकता आणि वेळेवर तपासणी हीच खरी गरज आहे. असे वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरचे इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ.अमित बल्लमवार यांनी सांगितले. रुग्णांना स्वत:चा रक्तदाब, कोलेस्टेरॉल आणि साखरेची पातळी याची पूर्ण माहिती नसते. अध्यार्हून अधिक डॉक्टरांनी असेही पाहिले की रुग्ण हृदयविकाराची सुरुवातीची लक्षणे जसे की, छातीत दुखणे, घाम येणे किंवा श्वास घेणे अवघड होणे ओळखू शकत नाहीत.

वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरचे सेंटर हेड रवी बागली यांनी सांगितले की विदर्भातील रुग्णाचे आरोग्य सुधारणे ही आमची जबाबदारी आहे," संपूर्ण सर्वेक्षणात पश्चिम भारतातील मुंबई शहर, एमएमआर, राजकोट आणि नागपूर यांचा समावेश होता आणि येथील सुमारे ३२६ डॉक्टरांनी सहभाग घेतला. यापैकी ४८ डॉक्टर नागपूरचे होते आणि हा रिपोर्ट त्यांच्या मतांवर आधारित आहे.



# उत्तम प्रशिक्षण देण्यासाठी प्लॅनेट आयटी पुरस्काराने सन्मानित

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. २५ :

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित ( पुणेच्या वतीने नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्वेंशन सेंटर येथे वार्षिक विदर्भ पूर्व विभागीय सम्मेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पूर्व नागपूरच्या ६ जिल्ह्यांतील ६५० संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सावनेर येथील १९ वर्षांपासून कार्यरत प्लानेट आय टी संस्थेला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे संगणक शिक्षण देऊन रोजगार साठी तयार करण्यासारखे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल १००० क्लब पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रसंगी MKCLच्या व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे यांच्या हस्ते संस्थेचे संचालक अभिषेकसिंह गहरवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला.




प्लानेट आय टी सावनेर ही संस्था मागील १९ वर्षांपासून विविध स्तरातील प्रशिक्षणार्थींना आधुनिक व दर्जेदार कौशल्य प्रशिक्षण देत आहे. विद्यार्थ्यांसह व्यावसायिक, महिला आणि सरकारी कर्मचाऱ्यांना तंत्रज्ञानाधारित शिक्षण देऊन सक्षम बनवण्यात या संस्थेचे मोठे योगदान आहे. सारथी संस्था आणि महाराष्ट्र राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने मराठा आणि कुणबी समाजाच्या विद्यार्थ्यांना संगणक कौशल्य प्रदान करून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यात प्लॅनेट आय टी नागपूर जिल्ह्यात अग्रिम राहिली आहे.

पुरस्कार स्वीकारताना अभिषेकसिंह गहरवार यांनी सावनेर तालुक्यातील पालक वर्ग, शिक्षकवृंद आणि सहकाऱ्यांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, संस्थेच्या टीमच्या अथक परिश्रमामुळे हा सन्मान प्राप्त झाला आहे. भविष्यातही दर्जेदार प्रशिक्षण देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. प्लॅनेट आय टी ने बदलत्या काळात ए आय सारखे नवीन टूल्स आपल्या प्रशिक्षणात सम्मिलीत केले आहे, ए आय रोजच्या काळात कसे उपयोगी आहे, आणि ए आय चा वापर करून कसे आपण आणखी दर्जेदार काम कमी वेळात करू शकतो हे सुद्धा शिकवले जात आहे.

विदर्भ पूर्व क्षेत्रातून सलग १४ वर्षांपासून दरवर्षी विविध श्रेणी मध्ये अवार्ड मिळविणारी एक मात्र सावनेर तालुक्यातील या संस्थेच्या यशामुळे स्थानिक आणि विदर्भ स्तरावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

कार्यक्रमाला MKCLचे वरिष्ठ जनरल मॅनेजर अतुल पतोडी, अमित रानडे, विदर्भ पूर्व समन्वयक श्री शशिकांत देशपांडे सर, अविनाश भागवतकर वर्धा जिल्हा समन्वयक, लक्ष्मीकांत कांबळे चंद्रपूर जिल्हा समन्वयक, कलश यादव नागपूर जिल्हा समन्वयक, संजय डोहाळे भंडारा जिल्हा समन्वयक, उमेश वैद्य गोंदिया जिल्हा समन्वयक, आणि प्रशांत मंगलगिरी गडचिरोली जिल्हा समन्वयक यांची उपस्थिती होती.

## विद्यार्थ्यांना रोजगार देण्यासाठी आम्ही कटिबद्ध : अभिषेक सिंह

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे हिंगणा तहसीलदारांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २५ :

महाराष्ट्र शासनाने 2 सप्टेंबर 2025 रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे व हैद्राबाद गॅझेटियर लागू केल्यामुळे ओबीसी आरक्षणाला कुठेही धक्का लागला नाही असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वारंवार सांगत असले तरी शासनातील मंत्री ओबीसी आरक्षणाला मोठा धक्का लागल्याचे सांगत आहे .तर तिकडे मनोज जरांगे पाटील गुलाल उधळून मराठा जिंकल्याचे सांगत आहे .यामुळे ओबीसी समाज द्विधा मनस्थिती मध्ये असून पुरता घाबरलेला आहे.

खरे तर हैद्राबाद गॅझेटियर मध्ये सामूहिक नोंदी आहे, वैयक्तिक नोंदी नाही आणि कुणबी प्रमाणपत्र वैयक्तिक नोंदी शिवाय देता येत नाही. असे असताना सुद्धा 17 सप्टेंबर पासून मराठवाड्यातील जालना, नांदेड हिंगोली, धाराशिव व बीड येथे हैद्राबाद गॅझेटियर वरून कुणबी प्रमाणपत्र वाटल्याचे वेगवेगळे चॅनलवरून सांगितल्या जात आहे. त्यामुळे ओबीसी समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आपण ओबीसी समाजाचे नेते आहात तसेच ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष सुद्धा आहात तरी आपण ओबीसी समाजात पसरलेले भीतीचे वातावरण दूर करावे अशी विनंती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच या संदर्भातील विविध मागण्यांचे निवेदन सादर केले आहे.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष राजुभाऊ चौधरी, रविंद्र आदमने, लिलाधर दाभे,विष्णू कोल्हे, विनायक इंगळे गुरुजी, गजानन काकडे, बाबु शेंडे, नितीन बोडणे, गणेश हागे,विनय लकडे, युवराज काकडे, रमेश धुर्वे व विठ्ठल नगराळे उपस्थित होते.

# सखी मंच सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळात पोलीस निरीक्षक राजेश तटकरे यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २५ :

येथील गजानन प्रसाद नगर मधील सखी मंच सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळात पोलीस निरीक्षक राजेश तटकरे यांनी भेट दिली. यावेळी त्यांना उत्कृष्ट कार्याबद्दल मिळालेला राष्ट्रपती पुरस्कार लक्षात घेता मंडळाचे पदाधिकारी मोहन ठाकरे यांनी मंडळाच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

यावेळी ठाणेदार राजेश तटकरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सायबर गुन्ह्यांपासून सावधान राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला देवराव अखंड, अमित हुसनापुरे, चतुर्वेदी, शेषराव वानखेडे, राजेश जीरापुरे, अविनाश गोटेकर, विनय लांजेवार, सुधीर जंजाळ, विवेक जंजाळ, प्रदीप सातपुते, काळपांडे, बंडू आवारी, देवेंद्र बोपचे, महेंद्र कडू,



भास्कर बिरोले, गजानन सरनाईक, श्रीराम सोनेकर, बबन भिवणकर, कमलाकर ,रूपाली अखंड, निकिता जंजाळ, कोमल राऊत, सुनिता बानखेडे, शारदा गोटेकर, सुनिता ठाकरे, अर्चना बोपचे, नागपुरे, राजश्री पाचपांडे, जया करंगडे, पूजा गोडे, रेखा कात्रे, सोनाली डोंगरे, गीता आवारी, आरती भिवणकर, मनीषा पाटील, माया सोनेकर, अनघा वरगंटीवार, मेघा चव्हाण आदी मान्यवरांसह मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दत्तवाडीतील अंतर्गत रस्ते खड्डेमुक्त करा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २५ :

नगरपरिषद वाडी अंतर्गत दत्तवाडीतील अंतर्गत रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना प्रवास करणे अवघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर माजी ग्रामपंचायत सदस्य राजेश जिरापुरे यांनी नगरपरिषद वाडीला निवेदन देऊन तातडीने रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली आहे. दत्तवाडी वस्तीला जोडणारा हा मुख्य रस्ता असून याच मार्गावर किमान २५ नगर वसलेली आहेत. तसेच या परिसरात १६ नगरसेवक राहतात.

नागरिकांनी वारंवार दुरुस्तीची मागणी करूनही संबंधितांनी याकडे लक्ष दिले नाही, अशी खंत व्यक्त करण्यात आली आहे. दसऱ्याच्या आधी रस्त्यावर डांबर टाकून दुरुस्ती करण्यात यावी, जेणेकरून नागरिकांना दिलासा मिळेल. असेही निवेदनातुन स्पष्ट केले.

# कन्हान येथे भव्य रास गरबा महोत्सवाचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. २५ :

कन्हान- पिपरी शहरात नवरात्र महोत्सवाचा पार्श्वभुमीवर भव्य रास गरबा महोत्सवाला सुरवात झाली आहे. २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी तेजाब कंपनी कानपुर केमिकल मैदानात शहनाज अख्तर यांचे गीत होणार प्रस्तुत होणार आहे.

**जय मानवता सार्वजनिक बहुदेशीय संस्था, कन्हान**

जय मानवता सार्वजनिक बहुदेशीय संस्था कन्हान द्वारे तेजाब कंपनी कानपुर केमिकल मैदानात नवरात्र महोत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार (दि.२२) सप्टेंबर रोजी घटस्थापनेच्या दिवशी देवी मुर्तीची युवा सामाजिक कार्यकर्ता निक्कु पिल्ले सह आदि मान्यवरांचा हस्ते विधिवत पुजा अर्चना करुन स्थापना करण्यात आली. मंगळवार (दि.२३) सप्टेंबर रोजी सायंकाळी संस्थेचे अध्यक्ष वर्धराज पिल्ले, पी.डी.जैस्वाल, कृष्णकुमार अग्रवाल सह आदि मान्यवरांचा हस्ते ज्योत प्रज्वलित करुन भव्य रास गरबा महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. शुक्रवार (दि.२६) सप्टेंबर रोजी सायंकाळी तेजाब कंपनी कानपुर केमिकल मैदानात मशहूर गायिका शहनाज अख्तर यांचे गीत होणार प्रस्तुत होणार आहे. शनिवार (दि.२७) सप्टेंबर रोजी महा आरोग्य शिबाराचे आयोजन करण्यात आले आहे . या रास गरबा महोत्सवात महिलांनी , मुलींनी, आणि इतर स्पर्धकांनी मोठ्या संख्येत सहभागा घेतला आहे. नऊ दिवस गरबा सादर करुन १ ऑक्टोंबर रोजी उत्कृष्ट स्पर्धकांना संस्थे द्वारे बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. या रास गरबा महोत्सवाचा आणि २६ सप्टेंबर रोजी शहनाज अख्तर यांचे गीतांचा नागरिकांनी जास्तीस्त जास्त संख्येत उपस्थित राहुन आनंद घ्यावा, असे आव्हाहन अध्यक्ष वर्धराज पिल्ले यांनी केले आहे.

**नवयुवक दुर्गा उत्सव मंडळ, धरम नगर, कन्हान**

राज राजेश्वरी दुर्गा माता सेवा चॅरी , ट्रस्ट द्वारा संचालित नवयुवक दुर्गा उत्सव मंडळ, धरम नगर, कन्हान येथे मंदिरात नवरात्र महोत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार (दि.२२) सप्टेंबर रोजी घटस्थापनेच्या दिवशी मंदिरात दुध, दही, जल पंचअमृताने देवी मातेचा जलाभिषेक करुन विधिवत पुजा अर्चना, घटस्थापना व आरती करुन नवरात्र महोत्सवाचा मोठ्या उत्साहात शुभारंभ करण्यात आला. दररोज सकाळ व सायंकाळ पुजापाठ, महाआरती, भजन, गरबा आणि रिकॉर्डिंग डांस सह धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार (दि.२९) सप्टेंबर रोजी अष्टमी हवन, बुधवार (दि.१) ऑक्टोंबर रोजी भव्य महाप्रसाद आणि गुरुवार (दि.२) ऑक्टोंबर रोजी घट विसर्जन करुन नवरात्र महोत्सवाची सांगता करण्यात येणार आहे . या विविध कार्यक्रमाच्या शहरातील नागरिकांनी जास्तीस्त जास्त संख्येत उपस्थित राहुन आनंद घ्यावा असे आव्हाहन माजी नगराध्यक्षा करुणाताई आष्टणकर यांनी केले आहे.

**माहेर महिला मंच बहुउद्देशीय संस्था**

माहेर महिला मंच बहुउद्देशीय संस्था कन्हान द्वारे कुलदीप मंगल कार्यालय जवळील मैदानात नवरात्र महोत्सव निमित्त भव्य रास गरबा महोत्सवाचे आयोजना सह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोमवार (दि.२२) सप्टेंबर रोजी घटस्थापनेच्या दिवशी सायंकाळी रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार श्यामकुमार बर्वे यांच्या हस्ते दुर्गा मातेच्या प्रतिमेचे पुजन आणि ज्योत प्रज्वलित आरती करुन महोत्सवाचा मोठ्या उत्साहात शुभारंभ करण्यात आला. पहिल्या दिवशी महिलांनी, मुलींनी मोठ्या संख्येत गरबा नृत्य केले. महाकालीचे कौटी ज्योति नृत्य, रौद्रप्प सिंहासना सारखे महादुर्गा आकर्षणाचे केंद्र ठरले. या रास गरबा महोत्सवात ४५० स्पर्धकांनी सहभाग घेतला. १ ऑक्टोंबर रोजी अंतिम सामना होणार असुन विजेत्यांना रोख रक्कमे सह विविध बक्षीसे वितरण करुन गौरविण्यात येणार आहे. या रास गरबा महोत्सवाचा नागरिकांनी जास्तीस्त जास्त संख्येत उपस्थित राहुन आनंद घ्यावा असे आव्हाहन माहेर महिला मंच बहुउद्देशीय संस्था कन्हान अध्यक्ष सौ.रितांताई बर्वे, जेष्ठ समाजसेवक नरेश बर्वे आणि युवा सामाजिक कार्यकर्ता रोहित बर्वे सह इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

**कन्हान परिसरात २८ सार्वजनिक मंडळात देवी मुर्तीची स्थापना**

कन्हान शहरात आणि ग्रामीण भागात नऊ दिवस नवरात्र महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला आहे. विविध स्पर्धा, भजन, कीर्तन आणि इतर धार्मिक कार्यक्रमाने नवरात्र महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. घटस्थापनेच्या दिवशी सार्वजनिक मंडपात देवी मुर्तीचे आगमन झाले. शहरात ९ आणि ग्रामीण भागात १९ अशा एकूण २८ ठिकाणी देवी मूर्तीची स्थापना करण्यात आली. अशी माहिती कन्हान पोलीस विभागाकडून देण्यात आली आहे. घटस्थापनेच्या दिवशी सकाळपासूनच शहरातील विविध भागातील भक्तांना मध्ये देवी आगमना निमित्त उत्साहाचे वातावरण बघायला मिळले. सार्वजनिक मंडपात देवी मुर्तीची विधिवत पुजा-अर्चना करुन प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. घरोघरी अखंड ज्योत प्रज्वलित करुन पुजा अर्चना करण्यात आली. सतत नऊ दिवस रोज सकाळी आणि सायंकाळी आरती होत असून सार्वजनिक मंडपात आरतीसह विविध सांस्कृतिक कार्यक्रम, विविध स्पर्धा, भजन , कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. नवरात्र महोत्सव निमित्त शहरातील दुर्गा माता मंदिरात विविध कार्यक्रम राबवले जात आहेत . नागरिकांची दर्शनाला प्रचंड गर्दी पाहायला मिळत आहे.

## निधन वार्ता

### अनुसया कोकाटे

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. २५ :



पोलीस नगर, डिगडोह निवासी अनुसया जागोजी कोकाटे (वय ७५) यांचे गुरुवारी(२५) सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर उद्या (२६) सकाळी ११ वाजता डिगडोह येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देवू नका

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २५ :

बंजारा समाजाने एसटी प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीसाठी राज्यभरात ठिकठिकाणी आंदोलन सुरू केले आहे. मात्र, बंजारा समाजाच्या मागणीला देवलापार भागातील अनुसूचित जमातीच्या अनेक ग्राम पंचायतीच्या सरपंचांनी विरोध केला. बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करू नये, अशा मागणीचे निवेदन देवलापारच्या अप्पर तहसिलदार पुनम कदम यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. निवेदन देतेवेळी देवलापारच्या सरपंच सारिका उईके, करवाहीचे सरपंच रंजित कोकोडे, पीपरीयाचे सरपंच प्रवीण उईके, पिंडकापारचे सरपंच विलास उईके,



अप्पर तहसिलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

खनोरा ग्रामपंचायतीचे सरपंच सरला खंडाते, बांद्राचे सरपंच कल्पना भलावी यांची उपस्थिती होती.

# विद्यापीठ कबड्डी स्पर्धेत डॉ. हरिभाऊ आदमने महाविद्यालयाचा विजय

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. २५ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने आयोजित श्री. बिझाणी महाविद्यालय, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन पुरुष कबड्डी स्पर्धेत सावनेर येथिल डॉ. हरिभाऊ आदमने महाविद्यालयाने अतिम सामन्यात भंडारा जिल्ह्यातील देवळी येथिल ज्ञानदेव महाविद्यालयाचा अंतिम सामन्यात ४२-३९पराभव करून डॉ .हरिभाऊ आदमने महावाद्यालयाच्या इतिहासात प्रथमच विजेते पद पटकावले. १९६५ पासून या महावाद्यालयाने नागपूर जिल्हा ग्रामिणमध्ये अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू दिले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य वीरेंद्र जुमडे हे अमरावतीच्या हनुमान शाळेतील कबड्डी, कुस्ती खेळाचे ते चॅम्पियन राहिले आहे.

नागपूर विद्यापीठात त्यांनी अनेक खेळात प्रावीण्य प्राप्त केले आहे. याच अनुभवाच्या तालमीत आदमने महाविद्यालयातील क्रीडा विभागप्रमुख डॉ. दिनेश किमटा हे घडलेले असल्याने अनेक झोन मध्ये आदमनेचे खेळाडू विजेते झाले होते.अनेकवेळा विद्यापीठ उपविजेता संघही राहिले मात्र यंदा विद्यापीठाचे विजेते झाले. त्यामुळेच हा डॉ. हरिभाऊ आदमने महाविद्यालयाचा कारकीर्दित ऐतिहासिक विजय मानला जातो.या विजयाचा शिलेदार संपूर्ण संघच आहे. तरीही अंतिम सामन्यात हुलकावणी देणारा विजय खेचून आणणारा खेळाडू अंकित जुनघरे याची खेळी अष्टपैलू राहिली. टीवची रणनीती तय करून चाणाक्षपणे चाल करणारा भूषण वानखेडे,प्रणय गाडगे, सुहास गवरे यांनी नैपुण्य अशी कामगिरी करत संघाला हे ऐतिहासिक विजेतेपद पटकावून दिले.

विद्यापीठ कबड्डी स्पर्धेत चारही झोनमधूआपले महाविद्यालय अव्वल असून ते अंतिम सामना खेळणार तेव्हा कबड्डी संघाचे आणि क्रीडा प्रमुखांचे मनोबल वाढविन्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. वीरेंद्र जुमडे क्रीडांगणात प्रत्यक्ष उपस्थित होते. त्यांनी सांघिक खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या कबड्डी संघाला प्रोत्साहीत करण्यासाठी डॉ.सचीन वैद्य, डॉ. प्रगटसिंघ बावरा, डॉ. प्रमोद लेंडे हे प्राध्यापक सामना बघायला उपस्थित होते. यावेळी विजेत्या संघाचे प्रशिक्षक व शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. दिनेश किमटा व प्रा.कपिल खुबाळकर यांची प्रशिक्षक म्हणून भूमिका मोलाची राहिली आहे.

सावनेर करिता ही फार अभिमानाची बाब आहे.या महाविद्यालय आम्ही शिक्षण घेतले असून क्रीडा क्षेत्रात सुद्धा महाविद्यालयाच्या वतीने विद्यापीठ स्तरावर प्रावीण्य प्राप्त केले होते.परंतु काल संपूर्ण नागपूर विद्यापीठात आपले वर्चस्व गाजून महाविद्यालयाचे न्हवे तर संपुर नागपूर जिल्ह्यात सावनेर चे नाव लौकीक झाले असल्यामुळे प्राचार्य वीरेंद्र जुमडे व क्रीडा विभागाचे दिनेश किमटा व संपूर्ण कबड्डी चमुचे माजी विद्यापीठ खेळाडू प्रकाश बालपांडे, अमोल हिंगणे, किशोर ढुंढेले, लक्ष्मीकांत दिवटे,अतुल पाटील, किरण दाढे, व निंबाळकर यांनी अभिनंदन केले आहे

# नागपूर विभागात स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत एक दिवस-एक तास-एकत्र कार्यक्रम साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

भारतीय रेल्वे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान स्वच्छ भारत अभियानांतर्गत "स्वच्छता ही सेवा-२०२५" सुरू करणार आहे. देशभरात ही मोहीम "स्वच्छता उत्सव" म्हणून साजरी केली जात आहे. या संदर्भात, आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभागाने स्टेशन, रेल्वे परिसर, कार्यालये, कामाची ठिकाणे, वसाहती आणि गाड्यांमध्ये दररोज वेगवेगळ्या थीमवर स्वच्छता आणि लोककल्याण मोहिमा आयोजित केल्या जात आहेत. जनजागृतीशी संबंधित कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत. आज, या मालिकेतील, सर्वात प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, एक दिवस - एक तास - एकत्र, जो प्रत्येक कर्मचारी, कुटुंबासाठी होता आणि सामान्य नागरिकांना हे लक्षात आणून देणे की स्वच्छता ही केवळ एक दिवसाची परंपरा नसून ती रोजची सवय असावी.

नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी स्थानकावरील या भव्य श्रमदानात, रेल्वे बोर्डाचे अतिरिक्त सदस्य (वाणिज्यिक) राजेश कुमार कश्यप, आग्नेय मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य व्यावसायिक व्यवस्थापक प्रवीण पांडे, नागपूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता, वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक दिलीप सिंह, रेल्वेच्या विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी, संघटनांचे प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, शालेय मुले, वैद्यकीय विभाग, माध्यमे आणि मोठ्या संख्येने स्थानिक लोक



सहभागी झाले होते. सर्व सहभागींनी सुमारे एक तास संपूर्ण स्टेशन परिसर स्वच्छ केला आणि हिरवळ वाढवण्यासाठी झाडे लावली. वातावरण उत्साहाने, उत्साहाने आणि बदल घडवून आणण्यासाठी एकत्र काम करण्याच्या भावनेने भरलेले होते. यावेळी प्रमुख पाहुणे राजेश कुमार कश्यप म्हणाले, स्वच्छता हे फक्त एका दिवसाचे काम नाही तर ते आयुष्यभराचे काम आहे. ही एक जीवनशैली आहे. जेव्हा प्रत्येक नागरिक आपले घर, रस्ता, कामाचे ठिकाण आणि सार्वजनिक जागा स्वतःचे मानेल आणि ती स्वच्छ ठेवेल तेव्हाच खरी स्वच्छता साध्य होईल. स्वच्छ भारत निर्माण होईल. प्रवीण पांडे म्हणाले, रेल्वे परिसर हे लाखो प्रवाशांचे सामान्य घर आहे, त्याची स्वच्छता राखणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. ही एक जबाबदारी आहे. कर्मचारी, त्यांचे कुटुंब आणि सामान्य जनता ही मोहीम पुढे नेण्यासाठी एकत्र काम करत आहेत हे पाहून आनंद होतो.

दीपक कुमार गुप्ता म्हणाले, विभागातील प्रत्येक स्टेशन आणि कॉलनीमध्ये दररोज वेगवेगळ्या थीमवर स्वच्छता केली जाते.

आमचा प्रयत्न हा केवळ एक मोहीम न बनवता सवय बनवण्याचा आहे." दिलीप सिंह म्हणाले, "मुलांचा सहभाग सर्वात प्रेरणादायी आहे. जेव्हा नवीन पिढी स्वच्छतेला प्राधान्य देईल तेव्हा समाजात सुधारणा होईल." कायमस्वरूपी बदल आपोआप येईल. या कार्यक्रमात खालील सामाजिक संस्थांचा सक्रिय सहभाग आंतरराष्ट्रीय भक्तमार उपचार आणि संशोधन फाउंडेशन - सीएमडी डॉ. अनिश जैन (७ सदस्य) राजगृह बहुउद्देशीय सोसायटी, लष्करीबाग, नागपूर - अध्यक्ष आशिष शेंडे (१० सदस्य) सदस्य) सावित्री ज्योतिबा फुले बहुउद्देशीय महिला समिती अध्यक्षा सर्वसाधारणसाठी वर्षा शामकुळे (8 सदस्य) माथाडी कामगार संघटना - अध्यक्ष श्री अमित अंबाडे (६ सदस्य) शरणस्थान चॅरिटेबल सोसायटी, जुनी मंगळवारी अध्यक्ष आयसो डॅनियल (१० सदस्य) परमात्मा एक लोक कल्याण संस्था - अध्यक्ष - रोहित नंदनवार (१० सदस्य) शाळांबद्दल उत्साही उपस्थिती (शांतीनगर इतवारी

# डब्ल्यूसीएल मुख्यालयात अमृत फार्मसीचे उद्घाटन




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय सेवा अधिक बळकट करण्यासाठी, वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूसीएल) ने अलीकडेच दोन प्रमुख उपक्रम सुरू केले.आरोग्य आणि दवाखाना व्यवस्थापन प्रणाली (डीएमएस). दवाखाना व्यवस्थापन प्रणाली अंतर्गत, अमृत फार्मसीची स्थापना २३ सप्टेंबर २०२५ रोजी डब्ल्यूसीएल मुख्यालयात करण्यात आली.

या भव्य उद्घाटन अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक, जे.पी. द्विवेदी यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी संचालक (वित्त) बिक्रम घोष, संचालक तांत्रिक (संचालन/प्रकल्प आणि नियोजन), आनंदजी प्रसाद, संचालक (मानव संसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे आणि मुख्य दक्षता अधिकारी, अजय म्हेत्रे, कार्यकारी सदस्य, आशिष मूर्ती, एस.आर. गबाले, कल्याण मंडळाचे प्रतिनिधी, डॉ. वाय.व्ही. उपस्थित होते. रमणा, आणि ए. पी. सिंह आणि मुख्यालयातील मोठ्या संख्येने विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की अमृत फार्मसी नजीकच्या भविष्यात पाठाखेडा आणि चंद्रपूर भागात देखील उघडली जाईल. हे लक्षात घेण्यासारखे आहे की केंद्र सरकारचा हा अनोखा उपक्रम - परवडणारी औषधे आणि उपचारांसाठी विश्वसनीय रोपण (अमृत) - जीवनरक्षक ब्रँडेड औषधे, जेनेरिक औषधे आणि शस्त्रक्रिया उपकरणे अतिशय परवडणाऱ्या दरात प्रदान करतो आणि एचएलएल लाईफकेअर लिमिटेड द्वारे चालवला जातो.

# शिरपूर शिवारात बिबट्याने केली घोडयाच्या बछडयाची शिकार



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २५ :

खिंडशी जवळील शिरपूर शिवारात बिबटयाने मंगळवारच्या रात्री २३ सप्टेंबरला घोड्याच्या बछडयाची शिकार केली. घोड्याच्या मालकाचे नांव अजय मिताराम सव्वालाखे रा. चिचाळा असे आहे. अजय सव्वालाखे ने सांगितले की त्यांच्या घोडा अवंती फार्म जवळ दुधराम सव्वालाखे यांच्या वाटर पार्क मध्ये बांधला होता. मंगळवारी दि.२३ सप्टेंबरच्या मध्यरात्री बिबटयाने त्यांची शिकार केली. अजय सव्वालाखे यांचे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले. हि माहीती वनविभागाला देण्यात आली.रामटेक चे वनपरीक्षेत्र अधिकारी राहुल शिंदेच्या मार्गदर्शनात वन कर्मचारी अडमाची यांनी पंचनामा केला. या घटनेमुळे शिरपूर, खंडाळा, घोटी या परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# लाव्हयात प्रबुद्ध नागरिक संवाद कार्यक्रम उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २५ :

लाव्हा येथे भाजपा गोधनी मंडळाचा प्रबुद्ध नागरिक संवाद कार्यक्रम बुधवार २४ सप्टेंबर रोजी उत्साहात पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या सेवा पंधरवाडा कार्यक्रमाचे जिल्हास्तरीय समन्वयकपद सुजित नितनवरे यांना सोपविण्यात आले होते.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्राचार्य देवेंद्र खडगी यांनी प्रबुद्ध नागरिकांशी संवाद साधत गावाच्या प्रगतीसाठी विधायक विचार मांडले.

वोकल फॉर लोकल या विषयावर चर्चा करून स्थानिक व्यवसाय, उद्योग आणि शेतमाल यांना प्रोत्साहन देण्याचा संकल्प करण्यात आला. सरकारच्या विविध योजना गावापर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृती करण्याचे सांगितले. आभार सर्कल अध्यक्ष प्रकाश डवरे यांनी मानले. यावेळी जिल्हा महामंत्री आदर्श पटले,भाजपा अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष सुजित नितनवरे, ओबीसी जिल्हा महामंत्री प्रमोद गमे, गोधणी मंडळ अध्यक्ष प्रमोद राऊत, हिंगणा समन्वयक पुरुषोत्तम रागीट, खडगावचे सरपंच देवराव कडू,लाव्हाचे सरपंच ज्योत्सना नितनवरे, माजी मंडळ अध्यक्ष आनंद बाबू कदम, जिल्हा मंत्री दिनेश कोचे, मंडळ उपाध्यक्ष मंगेश खोरखडे,मधुकर बर्वे, आशा हिंगणेकर, प्रकाश डवरे, माजी सरपंच संजय कंपनीचोर, माजी सरपंच नितीन अडसड, मंडळ मंत्री प्रशांत श्रीवास्तव, मंडळ महामंत्री विनोद चाफेकर, जीतेश पीडेकर, राजु पांडे, मंगेश खोरगडे, गोविंदा बाते, सोनु चूटे, छत्रपती शेंद्रे, रामभाऊ पाटील, मोरेश्वर वरठी, आकाश पवार, ओम काळे उपस्थित होते.

# आ. चरणसिंग ठाकूर यांच्या हस्ते भूमिपुजन सोहळा संपन्न

## स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, डोळे तपासणी शिबीर

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. २५ :

नगरपरिषद मोवाड येथे विश्वगुरू देशाचे यशस्वी पतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्म दिवसापासून राष्टनेता ते राष्टपिता महात्मा गांधी यांच्या जयंती पर्यत सेवा पंधरवडा चे आयोजन महाराष्ट्र शासनाकडून करण्यात आलेले असून तसेच भाजपा महाराष्ट्र प्रदेश यांच्या कडून सुध्दा पतप्रधान नरेंद्र मोदीजीच्या स्वच्छ भारत अभियानापासुन प्रेरणा घेऊन हा उपक्रम सुरू करण्यात आलेला आहे.

स्वच्छता अभियान अंतर्गत नगरपरिषद मोवाड येथे आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या हस्ते ३.८५ लक्ष रुपयाचा विविध विकास कामाचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात पार पडले तर सेवा पधरवाडा निमित्त स्वच्छता अभियान बाजार चौक येथे पार पडले. वृक्षारोपण कार्यक्रम विठ्ठल रुक्मिणी मंदीर येथे पार पडला तर भारतीय जनता पक्षाकडून नागरिकांनसाठी डोळे तपासणी शिबीराचे आयोजन सेवा पंधरवडा निमित्त करण्यात आले होते.

या डोळे तपासणी शिबीरात ५०० पेक्षा जास्त नागरिकांनी आपल्या डोळ्याची तपासणी करून घेतली तसेच सेवा पंधरवडा मध्ये मोवाड नगर परिषद, प्राथमिक शाळा कमाक एक, नगरपरिषद हायस्कूल यांनी सुध्दा आपला सहभाग नोंदविला होता. आमदार चरणसिंग ठाकूर यांनी विधानसभा निवडणुकीत दिलेला शब्द ते प्रामाणिक प्रमाणे पार पाडत असुन भरघोस निधी हा मोवाड येथे देतांना दिसत आहे. त्यांनी आपल्या भाषणातून काटोल नगरपरिषद जशी जिल्ह्यात एक नंबर वर आहे.

त्याच प्रमाणे मोवाड नगरपरिषद सुध्दा एक नंबर वर राहिल अशी ग्वाही त्यांनी विधानसभेच्या निवडणुकीत मोवाड वासियांना त्यांनी शब्द दिला आहे त्याची पुतता ते करतांनी दिसत असुन सेवा पंधरवडा निमित्त त्यांनी ३.८५ लक्ष रुपयांचे विविध विकास कामाचे भूमिपूजन मोवाड येथे मोठ्या उत्साहात पार पडले असुन त्याचे मोवाड शहरावर विशेष लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

यावेळी मोवाड नगरपरिषद चे माजी अध्यक्ष सुरेशजी खसारे, जिल्हा मंत्री दिलेश ठाकरे, प्रविण लोहे, सतीश रेवतकर,संदीप सरोदे, समीर उमप, कुणाल ढबाले ,किशोर गाढवे, चेतन ठोंबरे, इस्माईल बारुदवाले, दिनेश पांडे, रवी माळोदे, रवींद्र वैद्य, दीपक बेले, निखिल कठाने, धीरज लाखे, करुणा वाडबुदे, नामदेव वाडबुदे, संदीप पालीवाल, योगेश ठणठण, विवेक लिखार, वासुदेव बानाईत, नीरज बेले,संदीप राकेश,किशोर निमकर,नरेश हेडाऊ, निलेश हाटेकर,जगदीश वाडबुद्धे आदी उपस्थित होते.




# चाकूसह एकाला अटक

नागपूर : पाचपावली पोलिसांनी गस्तीदरम्यान एका तरुणाला चाकू घेऊन फिरताना अटक केली. रोशन उर्फ चेतन उर्फ केला मुन्नालाल गुप्ता (२१) रा. नाईक तलाव, बांग्लादेश असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. रात्री २.२० वाजताच्या सुमारास पाचपावली पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत वैशालीनगर परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान आंबेडकर उद्यानाजवळ रोशन संशयास्पदरित्या फिरताना दिसला. पोलिसांनी त्याला आवाज दिला असता त्याने पळ काढला.

## ट्रांसपोर्टरच्या घरी ५.७० लाखांची चोरी

नागपूर : अज्ञात आरोपींनी एका ट्रांसपोर्टरच्या घराचे कुलूप तोडून रोकड आणि दागिन्यांसह एकूण ५ लाख ७० हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी रॉनिन राजू खुराणा (३१) रा. कोर्टीधर सोसायटी, गंगाबाग पारडीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. रॉनिन यांचा ट्रांसपोर्टचा व्यवसाय आहे. गत ८ सप्टेंबर रोजी ते घराला कुलूप लावून आजीच्या घरी ग्वालियरला गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपींनी मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख ४० हजार, सोन्याचे दागिने आणि चांदीच्या पायपट्ट्या असा एकूण ५ लाख ७० हजार रुपये किंमतीचा माल चोरून नेला. दुसऱ्या दिवशी शेजाऱ्याला रॉनिन यांच्या घराचे कुलूप तुटलेले दिसले. त्याने फोन करून त्यांना याबाबत माहिती दिली.

# सत्यशोधक समाज वर्धापन दिन कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

सत्यशोधक समाज स्थापना दिन कार्यक्रमाचे आयोजन झाशी राणी चौक नागपूर येथील हिंदी मोरभवन येथे करण्यात आलेले होते. यावेळी प्रामुख्याने सत्यशोधक विचारवंत नागेश चौधरी हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते तर प्रमुख अतिथी म्हणून सर्व शाखीय कुणबी कृती समितीचे अध्यक्ष पुरुषोत्तम शहाणे, महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माळी समाजाचे नेते प्रा. अरुण पवार, तेली समाजाचे नेते व जवाहर विद्यार्थी गृहाचे अध्यक्ष शेखर सावरबांधे, दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक मा. संध्या राजुरकर प्रा रमेश पिसे, इत्यादी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.




यावेळी बोलताना मान्यवरांनी सांगितले की महात्मा जोतीराव फुले यांनी काही समतावादी सहका?यांसह 24 सप्टेंबर 1873 ला सत्यशोधक समाजाची स्थापना केली.सर्वांना शिक्षण मिळावे ही सत्यशोधक समाजाची भूमिका होती.

जातीय, धार्मिक विषमता, स्त्री - पुरुष विषमता नष्ट करुन समतावादी व्यवस्था निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम सत्यशोधक समाजाने केले. मानवतावादी समाज निर्माण करण्यासाठी आजही सत्यशोधक समाजाचा विचार प्रत्येक माणसापर्यंत पोहचण्याची गरज आहे. या कार्यक्रमाच्या आयोजना करीता सत्यशोधक समाज, बहुजन संघर्ष समिती, विद्रोही सांस्कृतिक चळवळ, ओबीसी युवा अधिकार मंच, सर्व शाखीय कुणबी कृती समिती, महात्मा फुले शिक्षण संस्था, खैरे कुणबी संघटना, विदर्भ तेली समाज महासंघ, सत्यशोधक महिला महासंघ, नवउन्मेशन साहित्य सभा, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, प्रागतिक कुंभार समाज संघटना, सावित्रीच्या लेकी, सावित्री फातिमा संस्कृती संगिती, शिक्षण बचाव समन्वय समिती इत्यादी संघटनांनी अथक प्रयत्न घेतले.

# सेंटर पॉईट स्कूलच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

सोमलवार स्कूल माँ उमिया शाखा, कापसी रोड येथे नुकत्याच आयोजित आंतरशालेय हिंदी दिवस स्पर्धांमध्ये सेंटर पॉईट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्तम सादरीकरणातून प्रथम क्रमांक पटकावला.




दुसऱ्या वगातील शिवाय अग्रवाल याने वीर रसावर आधारित कविता प्रभावी शैलीत सादर करून काव्यपठण स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. तर चौथ्या वगातील खुशदिल पुनयानी यांनी नारळाचे कल्पक जाहिरात सादरीकरण करून जाहिरात स्पर्धेत पहिल्या क्रमांकाचा बहुमान मिळवला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. सोमलवार होते. प्रमुख पाहुणे शालू जैन व मुख्याध्यापिका राजेश्वरी दत्ता यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. सेंटर पॉईट स्कूलच्या प्राचार्या कांचन उके यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, परिश्रमानेच यश मिळते, परिश्रम हेच यशाची गुरुकिल्ली आहे.या यशानंतर उपप्राचार्या दीपा चक्रवर्ती, जयती चक्रवर्ती, उपविभागाध्यक्षा प्रतीभा जांभुळकर, सुनीता पाटील, रुबी माथुर, मंजुषा गजभिये, वंदना अलमडोहकर, लता पुरोहित, अर्चना ढोक, ज्योती नाईक, वर्षा खोदनकर, वैशाली सातमोहनकर, सुनीता बर्गत, रंजना होले, अकील युसूफ व प्रमोद जांभुळकर यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले.ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य वृद्धिंगत करण्यास मदत करणारी ठरली.

# पोरवाल महाविद्यालयात फरमेंटेनड खाद्यपदार्थ महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २५ :

कामठी येथील सेठ केसरीमला पोरवाल महाविद्यालया तील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाने मायक्रोबायोलोजिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (एम.बी.एस.आय.) विद्यार्थी मंडळाचे गठन आणि आंबवुन तयार केलेल्या खाद्यपदार्थ महोत्सवाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा.डॉ. स्वप्नील डहाट तर प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ .वैशाली पिंपळे प्रादेशिक समन्वयक (एम .बी.एस.आय.) महाराष्ट्र, उपप्राचार्य डॉ. मनीष चक्रवर्ती, डॉ.रेणु तिवारी, डॉ. रेणुका रॉय, डॉ.यशवंत मेश्राम, डॉ.जितेंद्र सावजी तागडे, डॉ. इंद्रजीत बसु, डॉ. महेश जोगी, डॉ.आलोक रॉय, डॉ. विकास कामडी आदी उपस्थीत होते.

दरम्यान एम.बी.एस.आय, पोरवाल कामठी मंडळात आफिका साबा यांची अध्यक्षा तसेच नादिया सानी यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. खाद्य महोत्सवात ५१ विद्यार्थ्यांच्या ३५ गटांनी भाग घेवुन विविध पारंपारिक आणि आधुनिक आंबवुन तयार केलेल्या पदार्थांचे सादरीकरण केले. या स्पर्धेत प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षीस अनुक्रमे नकुल विश्वास, सम्यक फुलझेले व नादिया सानी यांना मिळाले सांत्वना पुरस्कार अनुक्रमे रिफत झारा,आयशा सिद्दीकी आणि सना नाहिद यांना मिळाले. संचालन नादिया सानी, बिशिका मैत्री व सृष्टी बहलपांडे यांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ. आशा रामटेके, डॉ. नेहा देशतीवार, डॉ. दिप्ती भाभडा, तारकेश्वरी मडावी, पल्लवी विघे, डॉ.राहुल भेंडे, श्वेता चावता, महिमा फाळके, श्याम बारापात्रे, शैलेश रामटेके आदींनी सहकार्य केले.

# पालक-शिक्षक संवाद कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात २० सप्टेंबर २०२५ रोजी पालक-शिक्षक संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पालकांसोबत संवाद साधत एमएससी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती आणि कल्याण याविषयी सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यकारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे भाप्रसे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ.वर्षा धुर्वे यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात शिरीन सैय्यद यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर विभाग प्रमुख डॉ. वर्षा धुर्वे यांनी पालकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक-पालक संवाद गरजेचा असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर, विभागातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांची उपस्थिती व शैक्षणिक प्रगती याबाबत माहिती दिली. पालकांनी देखील उत्स्फूर्त सहभाग घेत प्रतिक्रिया व सूचना दिल्या.पालकांनी प्रत्येक सेमिस्टरनंतर असा कार्यक्रम नियमितपणे घेण्याची शिफारस केली. तसेच, विद्यार्थ्यांना ओळखपत्र देण्यात यावे, यामुळे प्रशासन सोपे होईल आणि विभागाविषयी आत्मीयता वाढेल, अशी सूचना त्यांनी मांडली.

# २.७३ लाखांच्या मालावर डल्ला

नागपूर : नवीन कामठी ठाण्यांतर्गत चोरांनी एका बंद घराचे कुलूप तोडून २ लाख ७३ हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला.

या प्रकरणी पोलिसांनी मोहम्मद वसीम मोहम्मद बशीर (३७) रा. सईदनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत १९ सप्टेंबरच्या सायंकाळी वसीम घराला कुलूप लावून पचमढी येथे फिरायला गेले होते. तत्पूर्वी त्यांनी कुटुंबीयांना नातेवाईकाकडे राहायला पाठवले होते. बेडरूमच्या कपाटात ठेवलेली ७० हजारांची रोकड आणि सोन्याचांदीचे दागिने चोरी करून पसार झाला.

# गायत्री मंदिरात २०१ घटांची स्थापना नवरात्रोत्सवाला सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २५ :

रामटेक येथील गायत्री मंदिरात २२ सप्टेंबर रोजी नवरात्रोत्सवाच्या पारंपरिक घटस्थापनेचा कार्यक्रम मोठ्या धार्मिक उत्साहात पार पडला. या प्रसंगी एकूण २०१ घटांची स्थापना करण्यात आली. कार्यक्रमाला मंदिर समितीचे अध्यक्ष शंकरराव चामलाटे, केशव चांपुरकर, हरीचंद्र राऊत, दिलीप रेवतकर, गणपतराव भूरे, नत्थू घरजाडे, रमाकांत कुंभलकर, संजय समरीत, किशोर चामलाटे, बाबुराव रत्नपारखी, त्रिपाठी, गौरीशंकर सुनवानी, वंदना रेवतकर आणि शकुंतला चामलाटे यांसह अनेक भाविक उपस्थित होते. संध्याकाळपासूनच मंदिर परिसरात भक्तांची गर्दी उसळली होती. मंत्रोच्चार आणि वैदिक विधी-विदानांतर्गत घटस्थापना पार पाडण्यात आली. भाविकांनी माता गायत्रीसमोर सुख-समृद्धी आणि मंगलकामनांसाठी प्रार्थना केली. गायत्री परिवाराच्या वतीने कळविण्यात आले की नवरात्र काळात दररोज विशेष पूजन, भजन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# भारतीय राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक सरदार वल्लभभाई पटेल : डॉ श्रीकांत भोवते

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २५ :

रामटेक येथील श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना वरिष्ठ व कनिष्ठ यांच्या संयुक्त विद्यमाने अंतर भारताची एकात्मता व अखंडता यासंदर्भात भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे तर प्रमुख पाहुणे तथा वक्ते म्हणून डॉ. श्रीकांत भोवते, सीनेट सदस्य, रातुम नागपूर विद्यापीठ, नागपूर तसेच डॉ स्वप्नील मनघे मंचावर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. श्रीकांत भोवते यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनाचा वृत्तांत विशद करून भारतीय स्वातंत्र्यपूर्वी आणि भारतीय स्वातंत्र्यानंतर त्यांनी केलेल्या कार्याची महनीय नोंद घेतली. वल्लभभाई पटेल पेशाने वकील होते विशेष म्हणजे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचाराने प्रभावित होते. फाळणीनंतर उफाळलेल्या हिंसाचारानंतर शांती स्थापनेकरीताही त्यांनी कार्य केले. सरदारांनी हिंदुस्थानातील १५८ अर्धस्वायत्त प्रांताचे भारतात विलीनीकरण करवून घेणे हे पटेलांचे सर्वात मोठे कार्य होय.

मुत्सद्देगिरी व वेळ पडल्यास सैन्यबळ वापरून सरदारांनी संस्थाने भारतात विलीन केली आणि म्हणूनच ते भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखले जातात भारताची एकता आणि अखंडता यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांचा जन्मदिवस भारत सरकारने राष्ट्रीय एकता दिन म्हणून घोषित केला आहे. राष्ट्र उभारणीत त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. असे चिंतन डॉ.श्रीकांत भोवते यांनी याप्रसंगी मांडले. यावेळी या कार्यक्रमाचे संयोजन, सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. संतोष जाधव यांनी केले तर याप्रसंगी आभार प्रा. किशोर धांडे, (रासेयो कार्यक्रम अधिकारी कनिष्ठ महाविद्याल)यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ.अमरीश ठाकरे, प्रा. कल्याणी बिटकुरे (टक्कामोरे) तसेच इतर प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्याची व्हॉइस ऑफ मीडियाची मागणी




पत्रकारावर जीवघेणा हल्ला

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २५ :

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे तिन पत्रकारावर शनिवार दिनांक 20 सप्टेंबर रोजी स्वामी समर्थ केंद्र जवळील पार्किंगमध्ये काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून पत्रकार किरण ताजने यांना बेदम मारहाण करून त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला त्यात ते गंभीर जखमी झाले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहे.

शासनाने पत्रकारांवर झालेल्या या हल्ल्याची संवेदनशीलतेने दखल घेऊन महाराष्ट्र पत्रकार संरक्षण कायदा-२०१९ ची तात्काळ प्रभावीपणे अंमलबजावणी करून संबंधित गुन्हेगारांविरुद्ध मकोका खाली कारवाई करावी. होत असलेल्या हल्ल्याबाबत. व्हॉइस ऑफ मीडिया काटोल तालुक्याच्या वतीने तालुकाध्यक्ष राजू राऊत यांच्या नेतृत्वात काटोल पोलीस स्टेशन व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. पत्रकारावर होणारे खाल्ले हे लोकशाहीला काळिमा फासणारी बाब असून शासनाने या बाबीकडे गंभीर लक्ष द्यावे तसेच प्रकरणावरील सर्व हल्लेखोरांना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी व्हाईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष राजू राऊत उपाध्यक्ष भूषण भोयर सचिव कोमल कमेरिया संदीप येवले. प्रशांत पवार तालुका संघटक स्वप्निल राऊत हेमराज सातपुते पंकज शेंडे इतर पत्रकार उपस्थित होते.

# केमिकल गळतीमुळे वैशाली नगरात दहशतीचे वातावरण

■ प्रमोद जांभूळकर
नागपूर दि. २५

प्रभाग क्रमांक ६, वैशाली नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर गार्डनजवळ असलेल्या चेंबरमधून केमिकल गळती झाल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर बिषारी वायू पसरल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या गळतीमुळे परिसरात चार फूट उंच केमिकलयुक्त धूर निर्माण झाला आणि सुमारे एक किलोमीटरपर्यंत चेंबर दर चेंबर हा धूर पसरला.त्यामुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे.



घटनेची माहिती मिळताच माजी नगरसेविका वंदना चांदेकर, सामाजिक कार्यकर्ता सुबोध साखरे, बसपाचे माजी शहराध्यक्ष राजू चांदेकर आणि इतर कार्यकर्ते तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी आशीनगर झोन क्रमांक ९ चे झोनल अधिकारी व मुख्य घनकचरा व्यवस्थापक सुनील तांबे, नागपूर महानगरपालिका अग्निशमन विभाग, वायू प्रदूषण नियंत्रण अधिकारी देशपांडे, पोलीस अधिकारी आणि इतर संबंधित यंत्रणांना घटनास्थळी पाचारण केले.तपासादरम्यान, सुपर केम सप्लायर या कंपनीच्या केमिकल गळतीमुळे ही परिस्थिती उद्भवल्याचे स्पष्ट झाले.

या कंपनीचे मालक सुभाष कुलश्रेष्ठ यांच्याकडून बिषारी केमिकलचे नमुने घेण्यात आले असून, या गळतीमुळे परिसरात दहशतीचं वातावरण निर्माण झालं आहे. नागरिकांच्या मते, ही फॅक्ट्री तात्काळ बंद करण्यात यावी किंवा दुसरीकडे हलवावी, अन्यथा मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

## सुपर केम सप्लायर कंपनी बंद करण्याची नागरिकांची मागणी

आंबेडकर गार्डन परिसरातील नागरिकांनी संताप व्यक्त करत या गळतीमुळे पिण्याच्या पाण्यातसुद्धा रसायन मिसळले जात आहे. यामुळे जीवितहानी होण्याचा धोका आहे. याआधीही वारंवार तक्रारी करूनसुद्धा प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नाही अशी भावना व्यक्त केली. झोन अधिकाऱ्यांच्या आदेशावरून सुपर केम सप्लायर कंपनीला २५,००० रूपयांचा दंड करण्यात आला आहे. मात्र नागरिक व कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, हा दंड पुरेसा नाही. फॅक्ट्री बंद करावी अन्यथा जनआंदोलन उभारण्यात येईल.

घटनास्थळी सामाजिक कार्यकर्ते बशीर भाई, धार्मिक काका, विजय खापेकर, हर्षल करपी, मधू विश्राम, महेंद्र बोबडे, आनंद शेंडे, मोतीलाल नाईक, भास्कर पराते, अशोक गणवीर आणि अनेक स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आता तरी प्रशासन जागं होणार का?

सामाजिक कार्यकर्ते सुबोध साखरे आणि राजू चांदेकर यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर या प्रकारावर कडक कार्यवाही झाली नाही, तर संपूर्ण परिसरातील नागरिकांसह मोठं जनआंदोलन उभारण्यात येईल आणि याला प्रशासनच जबाबदार असेल.

# श्रमदान करीत नागपुरकरांनी दिला स्वच्छतेचा संदेश




## स्वच्छता ही सेवा अंतर्गत दहाही झोन मध्ये एक दिन एक घंटा एक साथ श्रमदान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

केंद्र शासनाच्या 'स्वच्छता ही सेवा या अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकाद्वारे गुरुवारी (ता.२५) सकाळी एक दिन एक घंटा एक साथ उपक्रम राबविण्यात आला. उपक्रमांतर्गत मनपाच्या दहाही झोन मध्ये विविध ठिकाणी श्रमदान करण्यात आले. उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत नागपूरकरांनी श्रमदान केले. मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या फुटाळा तलाव परिसरात श्रमदान करीत स्वच्छ, सुंदर आणि हरित नागपूरसाठी मनपा कार्यरत असल्याची भावना वृद्धिंगत केली.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या नेतृत्वात नागपूर महानगरपालिकेद्वारा 'स्वच्छोत्सव' या संकल्पनेस अनुसरून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत केंद्र शासनाचे स्वच्छता ही सेवा हे अभियान राबविण्यात येत आहे. त्यानुसार, गुरुवारी सकाळी मनपाच्या दहाही झोन मध्ये एक दिन एक घंटा एक साथ श्रमदान करण्यात आले.

श्रमदानाची सुरुवात धरमपेठ झोन येथील फुटाळा तलाव परिसरात मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमन पंत यांनी केली. यावेळी त्यांनी स्वतः परिसराची स्वच्छता केली. यावेळी मार्गदर्शन करीत अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी स्वच्छतेकरिता सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगत स्वच्छता ही आपण सर्वांची जबाबदारी आहे. नागरिकांनी आपल्या घराजवळचे परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. तसेच स्वच्छता अभियानात सहभाग घेतलेल्या मनपा अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, मनपाचे स्वच्छतेचे ब्रँड ॲम्बेसेडर आणि स्थानिक नागरिकांचे आभार सुद्धा मानले.

यावेळी श्रमदान कार्यक्रमात घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले आणि धरपमेठ झोनचे सहायक आयुक्त राजकुमार मेश्राम, विभागीय झोनल अधिकारी लोकेश बासनवार, धरमपेठ झोनचे झोनल अधिकारी श्रीनदयाल टेंभेकर आणि मनपाचे ब्रँड ॲम्बसेडर आणि ग्रीन व्हिजिल फाऊंडेशनचे कौस्तव चटर्जी, मनपाचे ब्रँड ॲम्बसेडर व तेजस्विनी महिला मंचच्या किरण मुंदडा, ग्रीन व्हिजिल फाऊंडेशनचे स्वयंसेवक सुरभी जैयस्वाल, मेहुल कोसुरकर, प्राची यादव, विष्णुदेव यादव, तुषार देशमुख, पार्थ जुमडे, प्रतिक इसमपल्लीवार, रोटरी क्लब ऑफ वायसीसीईचे विद्यार्थी, एजी एनव्हायरोचे ऑपरेशन मॅनेजर प्रवीण चव्हाण तसेच स्थानिक नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

लक्ष्मीनगर झोन अंतर्गत येणाऱ्या दीक्षाभूमी परिसर, हनुमाननगर झोन अंतर्गत येणाऱ्या जुनी शुक्रवारी, धंतोली झोन अंतर्गत येणाऱ्या भगवाननगर, मेन रोड आणि ओमकार नगर चौक, नेहरुनगर झोन अंतर्गत येणाऱ्या गुरुदेवनगर मेन रोड, गांधीबाग झोन अंतर्गत येणाऱ्या कोठी रोड, नवयुग स्कूल परिसर, सतरंजीपूरा झोन अंतर्गत येणाऱ्या इंदर कारखाना मेन रोड, लकडगंज झोन अंतर्गत येणाऱ्या हिरवीनगर यूपीएससी हेल्थ यूनिट ग्राऊंड, आशीनगर झोनअंतर्गत येणाऱ्या गुरुनानकपुरा, मंगळवारी झोन अंतर्गत येणाऱ्या शाहू आटा चक्की येथे सखाले स्वच्छता करण्यात आली.

या मोहिमेसाठी दहाही झोनचे सहायक आयुक्त उपस्थित होते. यामध्ये लक्ष्मीनगर झोनचे सहायक आयुक्त मिलिंद मेश्राम, धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त राजकुमार मेश्राम, हनुमानगर झोनचे सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर, धंतोली झोनचे सहायक आयुक्त प्रमोद वानखेडे, नेहरुनगर झोनचे सहायक आयुक्त विकास रायबोले, गांधीबाग झोनचे सहायक आयुक्त गणेश राठोड, सतरंजीपुरा झोनचे सहायक आयुक्त धनंजय जाधव, लकडगंज झोनेच सहायक आयुक्त वजय थूल, अशीनगर झोनेच सहायक आयुक्त हरीष राऊत, मंगळवारी झोनचे सहायक आयुक्त अशोक गराटे, यांच्यासह लक्ष्मीनगर झोनचे झोनल अधिकारी ऋषिकेश इंगळे, हनुमाननगर झोनचे झोनल अधिकारी दिनेश कलोडे, धंतोली झोनचे झोनल अधिकारी राजेश गायधनी, नेहरुनगर झोनचे झोनल अधिकारी विठोबा रामटेके, गांधीबाग झोनेच झोनल अधिकारी सुरेश खरे, सतरंजीपुरा झोनचे झोनल अधिकारी वामन कयाळकर, लकडगंजचे झोनल अधिकारी मंगेश राऊत, अशीनगरझोनचे झोनल अधिकारी सुनील तांबे, मंगळवारी झोनचे झोनल अधिकारी प्रमोद आत्राम यावेळी उपस्थित होते.

# नागपूर इंटास फाउंडेशन गडचिरोलीतील हिमोफिलिया रुग्णांच्या सेवेत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

कोणत्याही स्पष्ट कारणाशिवाय रक्तस्त्राव होणे, याला हीमोफिलिया हा आजार म्हणतात. हा एक दुर्मिळ आणि गंभीर स्वरूपाचा रक्तविकार आहे. गडचिरोलीसारख्या आदिवासी व दुर्गम भागात या आजाराने ग्रस्त रुग्णांसाठी आवश्यक उपचार आणि 'फॅक्टर' सहजपणे उपलब्ध होत नाही. त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी नागपूरसारख्या शहरात जावे लागते, ज्यामुळे त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक, मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागतो.

ही गरज ओळखून, इंटास फाउंडेशन नागपूर आणि संकल्प फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा येथे हीमोफिलिया पेशन्ट असिस्टन्स प्रोग्राम आयोजित करण्यात आला.




या शिबिरामध्ये फॅक्टर ८ (५०० आयु ) चे ६२ वाईल्सचे मोफत वाटप (एकूण ३१ रुग्णांना) सेल्फ-इन्फ्यूजन (स्वतः इंजेक्शन देण्याचे प्रशिक्षण) फिजिओथेरपी सत्र आणि व्यायामाचे प्रात्यक्षिक यांचा समावेश होता.

या उपक्रमात इंटास फाउंडेशनचे प्रकल्प समन्वयक निखिल वैद्य, समुपदेशक कालिदास वडमे, समुपदेशिका प्रवीणा गेडाम, संकल्प फाउंडेशनचे संस्थापक डॉ. जगदीश बोरकर, फिजिओथेरपिस्ट प्रणव कोडाप, तसेच परिचारिका रुपाली यांचा सक्रिय सहभाग होता.

कार्यक्रमात अनेक हीमोफिलिया रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. गडचिरोली जिल्ह्यात सध्या रक्त गोठवणारे घटक (फॅक्टर) सहज उपलब्ध नाहीत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी वेळेवर उपचार मिळणे हे मोठे आव्हान असते. या पार्श्वभूमीवर, इंटास फाउंडेशनचा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त आणि गरजूंपर्यंत थेट पोहोचणारा ठरला आहे.

फक्त उपचारच नव्हे, तर स्वावलंबन व शारीरिक सशक्ततेचा संदेश देणारा हा कार्यक्रम अनेकांसाठी आशेचा किरण ठरला आहे.

# पोलीस खात्याविषयी ज्ञान, बौद्धिक क्षमतेची होणार चाचणी

## देशभरातील पोलीस दलांचे संघ स्पर्धेत होणार सहभागी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

परीक्षा उत्तीर्ण करून पोलिस अधिकारी, अंमलदार किंवा शिपाई बनले की झाले, एवढेच पुरेसे नाही, तर अधिकारी, कर्मचाऱ्यांना पोलिस खात्याविषयी किती ज्ञान आहे, याचीही चाचपणी केली जाते. त्यांची बौद्धिक क्षमताही तपासली जाते. पोलिस खात्याविषयी असलेले ज्ञान वृद्धिंगत होत राहावे यासाठी पोलिस दलात विविध उपक्रम, स्पर्धा आयोजित केल्या जातात. शहरात २४ ते २९ नोव्हेंबरदरम्यान ६९ वा अखिल भारतीय पोलिस कर्तव्य मेळावा पार पडणार आहे. नागपुरात पहिल्यांदाच होणाऱ्या या मेळाव्यात देशभरातील पोलिस दलांचे संघ सहभागी होणार आहेत. पोलिस दलांना ज्ञान, कौशल्य, शिस्त आणि कार्यक्षमता प्रदर्शित करण्याची ही एक उत्तम संधी आहे.

या स्पर्धेत तोंडी, लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. या माध्यमातून पोलिस दलांची तपास कौशल्ये, तांत्रिक ज्ञान, शिस्त, टीमवर्क आणि तणावपूर्ण परिस्थितीत कार्य करण्याची क्षमता वृद्धिंगत होणार आहे. वैज्ञानिक तपास तंत्रज्ञान, सायबर तपास, संगणक साक्षरता, फोटोग्राफी-व्हिडीओग्राफी, डॉग स्क्वॉड, बॉम्ब स्क्वॉड प्रात्यक्षिक, कमांडो स्पर्धा, नेमबाजी व पोलिस बँड यांचा या स्पर्धेत समावेश असतो. या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांचे पोलिस खात्याविषयी असलेले ज्ञान तपासले जाते.

असे म्हणतात की, गुन्हेगार कितीही हुशार असला तरी घटनास्थळी तो एक तरी पुरावा सोडतो आणि घटनास्थळी एकदा तरी परत येतो. पोलिसांनी घटनास्थळी योग्य वेळात योग्य तपास केला, आवश्यक पुरावे गोळा केले तर एकही गुन्हेगार सुटू शकणार नाही. घटनास्थळावरील नमुने गोळा करताना, बोटांचे ठसे घेताना कोणती काळजी घेतली पाहिजे, गुन्हा उघडकीस आणण्यासाठी कोणते कौशल्य वापरले पाहिजे, किती वेळात गुन्हा उघडकीस आणता येऊ शकतो, बरेचदा पोलिसांची दिशाभूल केली जाते, आरोपी कुटुंबातीलच असतो, आरोपीच पोलिसांना मार्गदर्शन करतो, अशा वेळी तपास अधिकाऱ्याची परीक्षाच असते, अशी परिस्थिती कशी हाताळायची, यासाठी कोणते ज्ञान आवश्यक आहे, हे या ठिकाणी तपासले जाते. अत्यंत चुरशीच्या या स्पर्धेत कोणत्या राज्याचा संघ विजयी ठरतो, याकडे लक्ष राहणार आहे.

### पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी घेतली बैठक

यासंदर्भात पोलिस आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीस राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मिता शुक्ला, अपर पोलिस महासंचालक (सीआयडी) सुनील रामानंद यांच्यासह पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल व इतर वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. यावेळी शुक्ला यांनी सीपी सिंगल तसेच इतर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह पोलिस मुख्यालय आणि हिंगणा मैदानाला भेट दिली. मेळाव्यासाठी सुरू असलेल्या तयारीचा आढावा घेतला. नागपूर जिल्ह्यातील विविध युनिट्सचे अधिकारी व कर्मचारी देखील या वेळी उपस्थित होते. स्पर्धेच्याआयोजनासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

# पसरत आहेत संसर्गजन्य आजार

## शासकीय रुग्णालयात रुग्णसंख्या तिप्पट

## मुले, वृद्धांची संख्या सर्वाधिक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

उपराजधानीत सध्या व्हायरल आजाराचे प्रमाण वाढले आहे. घरोघरी सगळ्याच वयोगटातील व्यक्ती ताप, सर्दी, खोकला व अंगदुखीने त्रस्त आहेत. त्यात सर्वाधिक रुग्ण वृद्ध, लहान मुले आहेत. परीक्षा तोंडावर असताना विद्यार्थी आजारी पडत असल्याने पालकांची चिंता वाढली आहे. हवामानातील बदल आणि दिवस-रात्रीतील तापमानातील फरकामुळे संसर्गजन्य आजार पसरत असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

शहरातील सरकारी व खासगी रुग्णालयात बालरुग्णांची गर्दी वाढली आहे. साधारणतः ५ ते १२ वर्षे वयोगटातील मुले जास्त प्रमाणात बाधित होत आहेत. तीव्र ताप, नाक बंद होणे, सतत शिंका येणे, खोकला, थकवा, अशी लक्षणे रुग्णांमध्ये दिसून येत आहेत. आजारी विद्यार्थी शाळेत आल्यास त्यांच्यापासून इतरांमध्ये संक्रमण वाढते. त्यामुळे शाळांनीही पालकांना संक्रमित मुलांना सोबत न आणण्याच्या सूचना देण्याची गरज आहे. अन्यथा, संक्रमण आणखी वाढण्याची भीती आहे.

मेडिकल, मेयो, डागा या शासकीय रुग्णालयांत रोज सहसा ३०० ते ४०० मुले उपचाराला येत होती. ही संख्या आता तिप्पट होऊन १ हजार ते १ हजार ५०० पर्यंत गेली आहे. सध्या काही शाळेत प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गाच्या परीक्षा सुरू आहेत तर काहींच्या सुरू होणार असताना मुले आजारी पडत असल्याने पालकांची चिंता वाढली आहे. मेडिकल, मेयो, डागातील डॉक्टरांच्या माहितीनुसार, हा हंगामी व्हायरल आजार आहे.

घाबरण्याचे कारण नाही, पण दुर्लक्ष केल्यास न्यूमोनिया किंवा दमा यासारख्या गुंतागुंती निर्माण होऊ शकतात.मुलांना भरपूर द्रवपदार्थ द्यावेत, जड आहार टाळावा व शाळेत पाठवताना मास्कचा वापर करावा, असे डॉक्टरांनी सुचवले आहे.

# वानाडोंगरी परिसरात दांडिया रास गरब्याची धूम

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २५ :

एका तालात थिरकणारे पाय... दांडियाच्या अन कानावर पडणाऱ्या संगीताच्या तालावर घुमणारे विविधरंगी घागरे आणि रास गरब्यांच्या रंगांबरोबर रंगलेली तरुणाई असा नवरात्रोत्सवाचा जल्लोष सध्या रोज लॉन,संगम रोड,वानाडोंगरी परिसरात पहायला मिळत आहे.



नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षी प्रमाणे यंदाही कल्पक कला दालन द्वारा आयोजित गरबा दांडिया रासचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवात नवरात्रीच्या प्रत्येक दिवशी विविध पारंपरिक वेशभूषा परिधान करत गरब्याचा आनंद लुटताना नागरिक दिसत आहे. सायंकाळी ७ वाजल्यापासून वानाडोंगरी, महाजनवाडी व लगतच्या परिसरातील युवक-युवतींसह महिला वर्ग दांडिया खेळण्यासाठी, तसेच गरबा नृत्य करण्यासाठी मोठी गर्दी करत असल्याने नवरात्रोत्सवाची रंगत वाढली आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक आनंद धडांगे व विजय घोडमारे तर मुख्य आयोजक म्हणून कल्पक कला दालनचे संचालक सचिन नारनावरे हे उपस्थित होते. यावेळी अश्विनी उईके, स्विटी कोडापे सौम्या नारनवरे, कार्तिक सोनवणे,अनिकेत बारापात्रे, थुलिका उमाळे, यश पाटील, आयुष चौधरी, प्रज्वल तिवसकर व इतर मंडळींचे सहकार्य लाभत आहे.

# विजेच्या धक्क्याने शेतकऱ्याचा मृत्यू

# कुटुंबास ४ लाखांची मदत



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २५ :

११ ऑक्टोबर रोजी नांदा (शिंदे) येथील शेतकरी राजू वासुदेव सहारे (वय ३९ वर्षे) यांचा २५ सप्टेंबर रोजी शेतात काम करताना विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. घरातील एकमेव कमावणारा व्यक्ती गमावल्याने कुटुंबावर उपासमारीची वेळ आली होती. अखेर सततच्या पाठपुराव्यानंतर शासनाकडून त्यांच्या कुटुंबास ४ लाख रुपयांची मदत मिळाली आहे.

ही मदत मिळवून देण्यासाठी शिवसेना विदर्भ सहसंघटक नमाजी अली यांनी पुढाकार घेतला. वीज वितरण कंपनी व प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून मदतीचा निर्णय त्वरित अमलात आणण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला.

या मदतीनंतर दिवंगत सहारे यांची पत्नी वनिता राजू सहारे, कुटुंबातील सदस्य लोकेश कोहळे, तसेच मुलं ज्ञानेश्वरी व देवांशू यांनी नमाजी अली त्यांच्या सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. या प्रसंगी दिलीप गायकवाड (शिवसेना, नागपूर जिल्हा संघटक), प्रशांत बारई (कामगार समन्वय, नागपूर जिल्हा), किशोर खोजरे, सरफराज शेख, विक्रम सावरकर व जितेंद्र बंजारी उपस्थित होते. या निर्णयामुळे सहारे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून संपूर्ण गावात समाधान व्यक्त केले जात आहे.

**महासागर प्रभाग वार्ता**

# उत्तर नागपूरमधील मयूर एकता सोसायटी अजूनही मूलभूत सुविधांपासून वंचित

प्रभू गजभिये,
नागपूर दि. २५

प्रभाग क्र. २ येथील मयूर एकता सोसायटी, जी की ने अधिकृतपणे सैनसन केलेली असून खसरा क्रमांक १४/२,३ आयशा अंतर्गत येते, येथील नागरिक आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. रोड, गटार, सीवर लाईनसारख्या अत्यावश्यक सुविधांचा पुरवठा अजूनही झालेला नाही, हे वास्तव नागरिकांच्या संतापाचा कारण बनले आहे. कडून फक्त रु.१,९५,०००/-इतका निधी या सेंटरसाठी असल्याचे सांगण्यात आले असले, तरीही या रकमेतील कामकाज केवळ दाखवण्यासाठी असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. इतक्या कमी निधीत १० लाईन्सच्या संपूर्ण विकासाची अपेक्षा करणे धूर्तपणा असल्याचे मत माजी बसपा महासचिव विवेक किशोर सांगोडे यांनी व्यक्त केले.

२० वर्षांपासून लेखी निवेदने दिली जात असूनही परिस्थितीत काहीही बदल झालेला नाही. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांच्या काळात अनेक राजकीय पक्षांच्या आमदार व नेत्यांनी येथे येऊन "विकासाचे वारे" वाहण्याची ग्वाही दिली होती. परंतु एक वर्ष उलटून गेल्यानंतरही एक मुरूमाचा ट्रक देखील सोसायटीत आलेला नाही, हे नागरिक स्पष्टपणे सांगत आहेत.गुलाब राहुले, अक्षय अंबादे,



चंद्रशेखर कोटांगले, अमर कोटांगले, सुशील मारापे, अमन पाटील, नरेश जनवंधु, विक्रम गणवीर, आणि अनिल गजभिए यांसह अनेकांनी एकत्र येऊन एन आय टी आणि मनपा प्रशासनाविरुद्ध रोष व्यक्त केला.

त्यांचा स्पष्ट सवाल आहे की "इतक्या वर्षांच्या मागणीनंतरही जर रस्ते, गटार, सीवर, दवाखाना, कीटकनाशक फवारणी इत्यादी सुविधा मिळत नसतील, तर आमदार, खासदार व नगरसेवकांनी दिलेल्या आश्वासनांचा उपयोग काय?घाणीने भरलेल्या गल्ल्या, उघड्यावरून वाहणारे सांडपाणी, कीटकांचा उपद्रव यामुळे नागरिकांना रोजच्या आयुष्यात अडचणींचा सामना करावा लागत आहे. कोणत्याही प्रकारचे दवाखाने, स्वच्छता मोहिमा किंवा कीटकनाशक फवारणी न झाल्याने रोगराईचा धोका वाढला आहे. मयूर एकता सोसायटीच्या नागरिकांनी एकमुखाने संपूर्ण रोड कॉंक्रिटीकरण आणि डांबरीकरण करावे, सीवर लाईन आणि गटाराचे बांधकाम तातडीने करावे, नियमित कीटकनाशक फवारणी आणि स्वच्छता मोहिम राबवावी, मागील निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची चौकशी करावी, व यांच्याकडून निधीचे पारदर्शकतेने वितरण करावे जर लवकरच कारवाई झाली नाही, तर नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. आता आम्ही प्रश्न विचारू, उत्तर न मिळाल्यास रस्त्यावर उतरू, असा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला.

# कुंदनलाल गुप्ता नगरमध्ये सांडपाण्याच्या समस्येने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

प्रदीप पौनीकर,
नागपूर दि.२५

प्रभाग क्रमांक ५ कुंदनलाल गुप्ता नगरमध्ये बाराही महिने वाहत असलेल्या सांडपाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. नागरिकांना विविध आजारांचा सामना करावा लागत आहे आणि त्यांचे जीवन त्रस्त झाले आहे.सतरंजीपुरा झोन चे सहाय्यक आयुक्त याना अनेकदा निवेदने देण्यात आले आहे. तरी मनपा प्रशासनाने दखल घेतली नाही, जर प्रशासनाने लक्ष दिले नाही तर आम आदमी पक्षाचा वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. यावेळी प्रदिप पौनिकर, किशन निमजे,विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, आरती दलाल
संदीप साखरे, किशोर मौंदेकर, केतन ठाकूर, दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, दिलीप रामटेककर, हरी निखारे,मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर हरिहर पराते, कृष्णा पाठराबे,प्रिती पौनिकर, स्वाती तारवानी, अंशु बिरेवार, अमोल उके, संजू पटले राजकुमार किटाळीकर जयघोष कोटांगले, गोविंदा केळवदकर, अनिल चांदेकर, अरुण गुणारकर, बाबुराव निमजे व आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# सेमिनरी हिल्स परिसरात कुत्र्याच्या शौचाने नागरिक त्रस्त

नमिता चोपकर,
नागपूर दि. २५

सेमिनरी हिल्स परिसरात सकाळ, संध्याकाळ आपल्या पाळीव कुत्र्यांना फिरायला नेणारे त्यांचे मालक त्यांना या परिसरातच शौचास बसवितात.त्यामुळे संपूर्ण परिसरात घाणीचे साम्राज्य असून नागरिक त्रस्त आहेत.





याशिवाय गजानन सोसायटी येथे प्लॉट नं. ३५ येथे खंडाळकर यांच्या घराच्या दोन्ही बाजूला असलेल्या वॉकिंग स्ट्रीटवर अनेक दिवसांपासून कचरा टाकला आहे.याची कोणतीही विल्हेवाट लावली जात नाहीआहे. शिवाय येथे वाहने पार्क करण्यात येत असल्याने पादचाऱ्यांची गैरसोय होत आहे. तेव्हा प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी नागरिक करीत आहेत.